CMYK

सोलापूर

तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १६ जुलै २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २४७ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विचारपुष्प

आपला हिंदू धर्म म्हणजे विश्वकल्याणाचा मार्ग. तो कर्म, भक्ती आणि ज्ञान यांचा संगम आहे. त्याचा अर्थ कट्टरता नाही, तर सर्वसमावेशकता आहे.

- माधवराव मुळे, रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

मोहीम फत्ते; 'शुभ' आगमन!

कॅलिफोर्नियाच्या समुद्रात झाले स्पेसक्राफ्टचे लॅण्डिंग
४१ वर्षांनंतर अंतराळात गेला होता भारतीय

कॅप्सूलमधून बाहेर पडताना अंतराळवीर शुभांशु शुक्ला

- **दुपारी ४:४५ वाजता आयएसएसवरून पृथ्वीकडे रवाना**
- **१४ जुलै रोजी दुपारी २:१५ वाजता क्रू ड्रॅगन अंतराळयानात पोहोचला**
- **दुपारी ४:४५ वाजता आयएसएसच्या हार्मनी मॉड्यूलमधून अंतराळयान अनडॉक झाले**
- **१५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर स्प्लॅशडाऊन झाले.**
- **पृथ्वीवर पोहोचण्यासाठी २२ तास २५ मिनिटांचा कालावधी**

१० दिवस राहणार विलगीकरणात

अंतराळवीर शुभांशु आणि ॲक्स-४ टीमला आरोग्य तपासणीसाठी आणि अंतराळाच्या परिणामांमधून बरे होण्यासाठी वेळ मिळावा, यासाठी १० दिवस विलगीकरणात राहावे लागेल. ■

ॲक्सिओम-४ मोहिमेद्वारे तब्बल २० दिवस अंतराळात राहून सुखरूप पृथ्वीवर परतलेल्या शुभांशु शुक्ला यांची कामगिरी भारतीय अंतराळ क्षेत्रात मैलाचा दगड ठरली आहे. या मोहिमेत सहभागी असलेल्या सर्वांचेच अभिनंदन.

द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती

शुक्ला यांनी त्यांच्या समर्पण, धैर्य आणि अग्रगण्य भावनेने अज्ञावधी स्वप्नांना प्रेरणा दिली आहे. ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला त्यांच्या ऐतिहासिक अंतराळ मोहिमेतून पृथ्वीवर परत येत असताना त्यांचे मी राष्ट्रासोबत स्वागत करतो.

नरेंद्र मोदी, पंतप्रधान

मातेचे आनंदाश्रू ओघळले

शुभांशुच्या आगमनाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले असताना एक व्यक्ती मनातल्या मनात देवाचा धावा करीत त्याच्या सुखरूप येण्यासाठी सर्वाधिक आतुरली होती आणि ती व्यक्ती म्हणजे शुभांशुची आई आशा शुक्ला. शुभांशुचे यान पृथ्वीवर सुरक्षित उतरताच त्या माऊलीच्या अश्रूंचा बांध फुटला आणि त्याला यानातून बाहेर येताना पाहून संपूर्ण देश जल्लोष करत असताना तिने आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. ■

◆ **नवी दिल्ली, १५ जुलै**

कॅमेऱ्यांसमोर हात हलवत आणि हसत शुभांशु शुक्ला आणि 'ॲक्सिओम-४' मोहिमेतील तीन इतर अंतराळवीर मंगळवारी ड्रॅगन ग्रेस अंतराळयानातून बाहेर पडले. त्यांनी २० दिवसांचा अंतराळ प्रवास पूर्ण केल्यानंतर ताज्या हवेचा श्वास घेतला.

शुभांशु शुक्ला, कमांडर पेगी व्हिटसन आणि मिशन तज्ज्ञ पोलंडचे स्लाव्होस उझनान्स्की-विस्निव्स्की आणि हंगेरीचे टिबोर कापू यांना मोहिमेसाठी वाहतूक करणाऱ्या स्पेसएक्सच्या ग्राउंड स्टाफने अंतराळयानातून बाहेर काढले. शुभांशु यांनी या मोहिमेत 'मिशन पायलट' म्हणून काम केले. ही नासा, स्पेसएक्स आणि इस्रोची संयुक्त मोहीम आहे.

पृथ्वीवर परतल्यानंतर शुभांशु आणि त्यांच्या चमूतील सदस्यांना अंतराळ प्रवासाच्या परिणामांमधून बरे होण्यासाठी सात दिवस लागणार आहेत. या दिवसात त्यांचे पृथ्वीवरील वातावरणात पुनर्वसन करावे लागेल. हा कालावधी वैद्यकीय देखरेखीखाली असेल जेणे करून ते पुन्हा पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेऊ शकतील.

ड्रॅगन अंतराळयान भारतीय वेळेनुसार दुपारी ३:०१ वाजता दक्षिण कॅलिफोर्नियातील सॅन डिएगो किनाऱ्यावरून खाली उतरले, ज्याने २० दिवसांचा अंतराळ प्रवास पूर्ण केला, ज्यापैकी १८ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात घालवले.

स्प्लॅशडाऊन झाल्यानंतर लगेचच, अंतराळयान रिकव्हरी जहाज शॅननवर नेण्यात आले, जिथे ॲक्सिओम-४ चा क्रू एका छोट्या स्लाईडवरून बाहेर आला आणि ग्राउंड स्टाफने त्यांना पायावर उभे राहण्यास मदत केली.

शुभांशु शुक्ला आणि तिन्ही अंतराळवीरांनी अंतराळ स्थानकावर तीन आठवडे वजनरहित अवस्थेत घालवल्यानंतर पृथ्वीवर गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेताना काही पावले उचलताना दिसले. ॲक्सिओम-४ चा क्रू हेलिकॉप्टरमध्ये किनाऱ्यावर नेण्यापूर्वी रिकव्हरी व्हेईकलवर वैद्यकीय तपासणी करत होते.

(वृत्तसंस्था)

● संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड हल्ला प्रकरण

१८ जुलै रोजी अक्कलकोट बंदची हाक; आरोपींना मकोका लावा

● गैरसमजातून मराठा समाजाच्या बैठकीत वाद
● आरोपी दिपक काटेसह दोघांना पोलिस कोठडी

तभा वृत्तसेवा
सोलापूर दि.१५ जुलै -

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्यातील आरोपींना मकोका लावा या मागणीसाठी येत्या शुक्रवारी १८ जुलै रोजी अक्कलकोट बंदची हाक मराठा समाजाच्या वतीने देण्यात आली आहे. मंगळवारी सायंकाळी सोलापुरातील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत गैरसमजुतीने मराठा समाजात वाद झाला. परंतु समाजातील वरिष्ठ आणि पोलिसांनी हा वाद आवरता घेतला.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या हल्ल्याच्या निषेधार्थ पुढील दिशा ठरविण्याबाबत या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये येत्या शुक्रवारी, १८ जुलै रोजी अक्कलकोट बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. जोपर्यंत सर्व आरोपींना अटक होत नाही व त्यांच्यावर मकोका लावण्यात येत नाही. तोपर्यंत वेगवेगळे आंदोलन सुरूच राहिल. १८ तारखे नंतरच्या आंदोलनाची पुढील दिशा आम्ही सांगू. अक्कलकोट येथे जाऊन बंद बाबतची पुढील दिशा बुधवारी ठरवणार असल्याचे माऊली पवार यांनी सांगितले.

यावेळी अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, वटवृक्ष मंदिराचे महेश इंगळे, दिलीप कोल्हे, मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील, पद्माकर काळे, राजन जाधव, सोमनाथ राऊत, ॲड. रोहित फावडे, चेतन चौधरी, शाम कदम, दत्तात्रय मुळे, राम गायकवाड, प्रशांत बाबर, श्रीकांत डांगे, शेखर जगदाळे, सुनंदा साळुंखे, मनीषा नलावडे, रवी मोहिते, मतीन बागवान, प्रशांत भगरे, नदीम डोणगावकर, शौकत पठाण सादिक नदाफ, युवराज पवार आदींसह मराठा समाजाचे अनेकजण उपस्थित होते. दरम्यान, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर काळे टाकून हल्ला केल्या प्रकरणातील आरोपी दिपक काटे व भवानेश्वर शिरगिरे या दोघांना न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली आहे.

> बैठकीमध्ये ज्या कारणाने वाद झाला. अक्कलकोट मध्ये जे घडले होते त्याची माहिती फावडे यांना संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी दिली. गैरसमजातून हा प्रकार घडला. वाद संपुष्टात आला आहे.
>
> **- दिलीप कोल्हे**

> प्रविण गायकवाड यांच्यावरील हल्ल्यातील आरोपींचा आमच्याशी सुतराम संबध नाही. प्रविणदादांना कोणी तरी आमच्या विषयी गैरसमज करून देत आहे. माझे चिरंजीव अमोलराजे यांनी हल्ला प्रकरणातील आरोपी दीपक काटेला चांगला सज्जड दम दिला, तू जे केला आहे ते बरोबर नाही, असे ते त्याच्या कानात म्हणत होते. काही कार्यकर्त्यांना याची कल्पना नसेल यामुळे गैरसमजुतीतून हा प्रकार घडला. मराठा समाज बैठकीमध्ये जो निर्णय घेईल मला मान्य असेल.
>
> **- जनमेजयराजे भोसले**
> संस्थापक अध्यक्ष, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट

महत्त्वाचे

यूपीएससी मुख्य परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

नवी दिल्ली : यूपीएससी सीएसई मुख्य परीक्षा २२ ते ३१ ऑगस्टदरम्यान दोन सत्रात घेतली जाणार आहे. ज्यांनी पूर्व परीक्षा उत्तीर्ण केली आहे, ते आता या मुख्य परीक्षेला सामोरे जाणार आहेत. मुख्य परीक्षा २२,२३,२४, ३० आणि ३१ ऑगस्ट रोजी घेतली जाणार आहे. दर दिवशी परीक्षेचे दोन सत्र असतील. पहिले सत्र सकाळी ९ ते दुपारी १२ तर दुसरे सत्र दुपारी २.३० ते ५.३० असे असणार आहे. यूपीएससीने यंदा ९७९ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. प्राथमिक परीक्षा १० लाख उमेदवारांनी दिली होती. त्यातील १४,१६१ जण मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

वरिष्ठ अधिकारी हनी ट्रॅपमध्ये अडकले?

नाशिक : राज्यातील ७२ वरिष्ठ अधिकारी आणि माजी मंत्री हनी ट्रॅपमध्ये अडकले असल्याचा दावा नाशिकमध्ये एका नेत्याने केला आहे. पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना त्याने पंचतारांकित हॉटेलमध्ये हनी ट्रॅपचा प्रकार घडल्याची माहिती दिली. विशेष असे की, नाशिकच्या मुंबई नाका पोलिस ठाण्यात एका महिलेने यासंदर्भात पुराव्यासोबत तक्रार दाखल केली आहे. चित्रफीत प्रसारित होण्याच्या भीतीने अधिकारी आणि नेते उघडपणे बोलण्यास घाबरत आहे आणि या प्रकरणाचा नाशिकसह मुंबई आणि पुण्यातील बड्या अधिकाऱ्यांशीही संबंध असल्याचे सूत्रांनी सांगितले.

धनिकबाळावर 'अल्पवयीन' म्हणूनच खटला चालणार

पुणे : कल्याणी नगरमधील दोन संगणक अभियंत्यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या पोर्शे कार अपघातप्रकरणी अल्पवयीन चालकावर प्रौढांप्रमाणे खटला चालवावा, यासाठी पुणे पोलिसांनी केलेला अर्ज बाल न्याय मंडळाने अखेर फेटाळला आहे. त्यामुळे आता या १७ वर्षीय धनिकबाळावर बाल न्याय कायद्याअंतर्गत बाल न्याय मंडळापुढेच खटला चालवला जाणार आहे. महागड्या पोर्शे कारने दोन दुचाकीस्वार यांना धडक दिली. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल मैंदर्गीत वादग्रस्त स्टेट्स

तीन तरुणांविरोधात अक्कलकोटमध्ये गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
अक्कलकोट दि. १५ जुलै-

मैंदर्गी येथे एकाने इंस्टाग्रामवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त स्टेट्स व व्हिडीओ प्रसारीत करून बदनामी केल्याबाबत दक्षिण पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उप विभागीय पोलीस अधिकारी विलास यामवार व पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांनी मैंदर्गी येथे घटनास्थळी तात्काळ भेट देऊन अमन अखिल हवालदार व रुमन शकील हवालदार यांना ताब्यात घेतले आहे.

या बाबत पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी, श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत वादग्रस्त स्टेट्स इन्स्टाग्राम या सोशल मिडियावर ठेवून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रकार समाजकंटकांनी केला आहे. सकल हिंदु समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या असल्या संदर्भात अनिल बसवणप्पा पाटील (वय ४८ वर्षे व्यवसाय शेती स.गौरी कट्टा मैंदर्गी ता. अक्कलकोट) यांनी फिर्याद दिले असल्याने अमन अखिल हवालदार, रुमन शकील हवालदार, सोहेल रुस्तुम (तीघे रा. मैंदर्गी ता. अक्कलकोट) यांच्या विरोधात अक्कलकोट दक्षिण पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरिक्षक बदे यांचेकडे वरीष्ठांचे आदेशान्वये दिला आहे.

समाजात तेढ निर्माण करणाऱ्या काही प्रवृत्ती आणि समाजकंटकांविरोधात पोलिसांकडून सातत्याने कठोर कारवाई सुरु असल्याने सामाजिक सलोख्यासाठी असे प्रकार टाळण्याची गरज आहे.

भीमा नदीत अकरा बंधारे बांधणार

आ. मोहिते पाटील यांची मागणीनुसार जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांची घोषणा

मुंबई, दि. १५ जुलै-

सोलापूर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे सोलापूरच्या पाण्यासाठी उजनी धरणातून भीमा नदीत यापूर्वी केला सतत केला जाणारा विसर्ग आता बंद झाला आहे. पण, भीमा नदीच्या पाण्यावर असलेल्या सिंचन आणि पिण्याच्या योजना सुरू ठेवण्यासाठी धरणाच्या खाली भीमा नदीत अकरा बंधारे बांधण्याचे नियोजन आहे, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले.

आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी अर्धा तास चर्चेत वाढत्या पाण्याची मागणी पूर्ण करण्याची सूचना केली होती. कृष्णा मराठवाडा प्रकल्पासाठी अंदाजे २१ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. यासाठी ११५ टीएमसी पाण्याच्या फेर नियोजनाचा निर्णय घेण्यात आला आहे. या सोबतच, उजनी धरणातून २३.७ टीएमसी पाणी धाराशिव जिल्ह्यात वळवले जाणार आहे.

या प्रकल्पासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने 'महाराष्ट्र रेसिलियन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (एमआयडीपी) राबवण्यात येत आहे. कृष्णा नदीला येणाऱ्या पुराचे पाणी वळिवणे (फ्लड डायव्हर्जन) ही मुख्य योजना असून, १३ मार्च २०२४ रोजी त्याला मान्यता देण्यात आली आहे. दोन महिन्यांच्या कालावधीत पुराच्या पाण्याचा उपयुक्त वापर होईल, असेही विखे म्हणाले. प्रकल्पाचा सर्वेक्षण अहवाल लवकरच अपेक्षित असून, पुढील पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. कृष्णा खोऱ्यातून भीमा खोऱ्यात सुमारे ५५ टीएमसी पाणी आणण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सर्व्हेक्षण झाल्यानंतर वस्तुस्थिती सादर करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांच्या प्रकल्पावर सुमारे चार हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, परंतु जागतिक बँकेच्या निधीमुळे आता अडथळा उरलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. या वर्षी प्रकल्पाच्या निविदा निघतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच, उजनी, जायकवाडी, कोयना आदी धरणांमधील गाळ काढण्यासाठी नवीन धोरण तयार करण्यात येत आहे. हे धोरण लवकरच मंत्रिमंडळासमोर मांडण्यात येणार असून, मान्यता मिळवण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. उजनीचे सुमारे २५ टीएमसी पाणी वाहून जात होते. सोलापूर महापालिकेसाठी स्वतंत्र पाईपलाईन उपलब्ध झाल्याने आता नदीपात्रात पाण्याचा प्रवाह थांबेल. त्यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांसाठी जलसिंचन अडचणीत येऊ नये म्हणून भीमा नदीवर अकरा नवीन बंधारे प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यांचे काम लवकरच सुरू केले जाईल, असेही जलसंपदा मंत्री यांनी यावेळी सांगितले.

मंत्री नितेश राणे दिसताच

आदित्य ठाकरे म्हणाले, शी..शी..शी...

मुंबई, दि. १५ जुलै-

महाराष्ट्राचे पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या आठवड्यात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर आज विधानसभेच्या परिसरात माध्यमांशी संवाद साधण्यासाठी आलेल्या ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मंत्री नितेश राणे यांना डिवचले आहे. नितेश राणे यांना पाहताच शी.. शी.. शी.. म्हणत ठाकरेंनी घेतली माघार. मंत्री नितेश राणे माध्यमांशी संवाद साधत असताना, ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे देखील तिथेच मीडिया स्टँडजवळ आले. यावेळी त्यांनी तिकडे कोण आहे? असे म्हणत राणे यांच्या दिशेने पाहिले.

नितेश राणे दिसताच आदित्य ठाकरे यांनी शी शी शी असे उद्गार काढले. यानंतर, त्यांच्यासोबत असणाऱ्या आमदार भास्कर जाधव यांना उद्देशून ते म्हणाले, जाऊ नका... कचरा साफ करण्याचे काम सुरु आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी नितेश राणे यांनी देखील विधानभवनाच्या परिसरात आदित्य ठाकरे यांना डिवचले होते.

पत्रकारांशी संवाद साधून निघत असताना समोरून आदित्य ठाकर आले. यावेळी राणे-ठाकरे समोरा-समोर आल्याचे पाहायला मिळाले. यावेळी नितेश राणे यांनी ठाकरेंची मिमिक्री करत ये चला.. ये चला.. असे म्हटले होते.

तीन वर्षांत एसटी बसेसचे राज्यात १० हजारांवर अपघात

१,२६६ जणांचा मृत्यू तर १४, १५३ वाहन चालक जखमी

मुंबई, दि. १५ जुलै-

सर्वाधिक सुरक्षित प्रवास एसटी महामंडळाच्या बसेसचा समजला जातो. मात्र, गेल्या तीन वर्षांत एसटी बसेसचे १०,२४३ अपघात झाले आहेत. या अपघातांमध्ये १,२६६ जणांचा मृत्यू झाला, तर १४,१५३ जण जखमी झाले. मानवी चुका आणि तांत्रिक कारणांमुळे अपघातांची संख्या वाढली असल्याची माहिती समोर आली आहे.

राज्यातील गुळगुळीत महामार्ग आणि राज्यमार्गांवरून वाहने भरधाव चालविण्यात येतात. त्यात खाजगी बसेसह एसटी महामंडळाच्या बसेसचाही समावेश आहे. कमी वेळेत पोहोचता यावे यासाठी खाजगी बसेसना प्रवासी प्राधान्य देतात. मात्र, सुरक्षित प्रवासासाठी महिला, वृद्धांसह विद्यार्थी आजही एसटी बसेसचा उपयोग करतात. एसटी विभागात भंगार गाड्यांची संख्या वाढली होती. त्यामुळेही बसेसचे अपघात वाढल्याचे चित्र होते. गेल्या तीन वर्षांत रस्त्यांवर धावत असताना तांत्रिक बिघाड आल्याने १,९७,९९६ वेळा बसेस बंद पडण्याच्या घटना समोर आल्या आहेत. २०२३-२४ मध्ये सर्वाधिक ६७ हजार घटना बसेस बिघडण्याच्या झाल्याची नोंद आहे. या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत गेल्या तीन वर्षांत राज्य महामंडळाने एसटीच्या ताफ्यात २,२१५ नव्या बसेस दाखल केल्या आहेत. त्यात ३७९ बसेच वातानुकूलित आहेत. गेल्या वर्षीपासून प्रत्येक बसचालकाच्या आरोग्य तपासणीसह हायटेक प्रशिक्षणसुद्धा देण्यात आले आहे. असे असतानाही एसटी बसेसच्या अपघाताच्या संख्येत घट होताना दिसत नाही. माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांना प्राप्त आकडेवारीनुसार, २०२४ या वर्षात बसेसचे सर्वाधिक ३,५६३ अपघात झाले आहेत.

या कालावधीत सर्वाधिक ४७० मृत्यू झाल्याची नोंद आहे. 'लाडक्या बहिणीं'मुळे एसटीला संजीवनी राज्य महामंडळाने २०२३ पासून महिला सन्मान योजना सुरू केली. या योजनेमुळे महिला प्रवाशांची संख्या वाढली. गेल्या तीन वर्षांत ७५ कोटी २३ लाख महिलांनी एसटी बसेसमधून प्रवास केला. महिला प्रवाशांना ५० टक्के सवलत देऊनही महिला सन्मान योजनेतून ४,४७१ कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या आहेत. त्यामुळे याचा सर्वाधिक लाभ शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना झाला आहे.

'पहलगाम' मागे आयएसआयचा हात

● सॅटेलाईट फोनमुळे पितळ उघडे

मुंबई, दि. १५ जुलै-

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता. हा हल्ला कोणी घडवून आणला, याची माहिती आता समोर आली आहे. पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआय आणि दहशतवादी संघटना लष्कर-एतोयबा यांनी मिळून हा हल्ला घडवला. या हल्ल्याचा कट पाकिस्तानम धील राजकीय आणि लष्करी अधिकाऱ्यांच्या निर्देशावरून रचण्यात आला आणि दुसरे तिसरे कोणी नसून केवळ पाकिस्तानी दहशतवाद्यांनीच तो घडवून आणल्याचा दावा सुरक्षा यंत्रणेतील सूत्रांनी केला.

हा हल्ला २६/११ च्या मुंबई हल्ल्यासारखाच लष्कर-ए-तोयबा आणि आयएसआयचा संयुक्त कट होता. आयएसआयने पाकिस्तान स्थित तोयबाचा कमांडर साजिद जट्टला पहलगामच्या बैसरनम धील हल्ल्यासाठी केवळ विदेशी दहशतवाद्यांना तैनात करण्याचे विशिष्ट निर्देश दिले होते. या हल्ल्याच्या कट उघड होऊ नये म्हणून कोणत्याही काश्मिरी दहशतवाद्याला या कटात सहभागी करून घेतले नाही.

त्याऐवजी, जम्मूकाश्मीरम ध्ये कार्यरत तोयबाच्या विदेशी दहशतवाद्यांना हे हत्याकांड घडवून आणण्यास सांगण्यात आले, अशी माहिती समोर आली आहे. पहलगाम हल्ल्याला भारताने चोख प्रत्युत्तर देत ऑपरेशन सिंदूर राबविले. यात पाकिस्तानचे वायुतळ उद्ध्वस्त झाले. अपरिमित नुकसान झाले आहे. पहलगाम हल्ला सुलेमानच्या नेतृत्त्वाखाली घडवून आणण्यात आला. तो पाकिस्तानच्या स्पेशल फोर्सेसचा माजी कमांडो होता, असा संशय आहे.

महत्त्वाचे...

नागणेवाडी व धर्मगावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पायरी सारखा कट्टा

मंगळवेढा दि. १ ५ जुले

मंगळवेढा प्रतिनिधी मंगळवेढा .शहरातील दामाजी मंदिराजवळील दामाजीच्या विहिरीपासून नागणेवाडी व धर्मगावाकडे जाणारा जो रस्ता आहे. तिथे पायरी सारखा कट्टा तयार झाला आहे. त्यामुळे वाहतूक करताना अडथळा निर्माण होत आहे. मोटार सायकल आदळून वृद्ध माणसांना किंवा चालकांना सुद्धा धक्का बसत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे. येथून वाहनांना जाणे येणे अवघड झाले आहे. धर्मगाव एसटी बस याच मार्गाने जात आहे. या रस्त्याने दररोज शंभर चार चाकी वाहने व पाचशे मोटरसायकल जात असतात. यामुळे अपघाताची दाट शक्यता होत आहे. सदरचा रस्ता तातडीने दुरुस्त केल्यावर कायमस्वरूपी याचा बंदोबस्त होऊ शकतो.

अपघात होण्याची शक्यता; दुरुस्तीची मागणी

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चरण कोल्हे हे या रस्त्यावरून गेले असल्यास त्यांना शंभर टक्के लक्षात येईल अशी अपेक्षा आहे. नगरपालिका कार्यालय सोडून आठवड्यातून किमान एक ते दोन दिवस प्रभागांमध्ये फिरून समस्या जाणून घेतल्यास जनसेवा हीच ईश्वरसेवा म्हणजे संताच्या भूमितील दामाजीपंताची सेवा होय.

- ॲड. रमेश जोशी, मंगळवेढा

करमाळा पोलिसांनी दोन वेगवेगळ्या गुन्ह्यातील आरोपींना केली अटक

करमाळा, दि.१५ जुलै-

करमाळा पोलिसांनी दोन चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक केली आहे.यातील पहिला चोरीचा गुन्हा हा करमाळा तालुक्यातील पोमलवाडीच्या अमोल काळे व आरकिसन काळे यांच्यावर नोंद झाला आहे.त्यांनी पुणे रेल्वे स्टेशनवर धारशिवचे निशांत ईश्वर कांबळे यांच्याशी ओळख करून आमच्याकडे सोने आहे ते आम्ही स्वस्तात देतो अशी खोटी माहिती दिली.व कांबळे या प्रवाशाला सुनियोजित कट करून पोमलवाडी या आपल्या गावी बोलावले आणि घरी चला असे सांगून निर्मनुष्य जागी अडवून मारहाण केली व त्यांच्याकडील अष्टयात्तर हजार रुपये किमतीचा आयफोन १५ हा मोबाईल चोरला. या चोरीची फिर्याद करमाळा पोलीस ठाण्यात नोंद झाली होती. त्याचा तपास करण्यासाठी पोलीस निरीक्षक रणजित माने यांनी पथक नेमून शोध घेतला व आरोपींना पकडून मुद्देमाल जप्त केला आहे. तर दुसरी चोरी करमाळा शहरात घडली. कर्जत तालुक्यातील शिगुर गावचे रहिवासी संतोष शिवाजी पवार हे बाजार करण्यासाठी करमाळयात आले होते त्यांच्याबरोबर त्यांची नात वैष्णवी ही होती तिच्या गळ्यात सोन्याचा गणपती हा दागिना होता हे पाहून घारगाव तालुका करमाळा येथील युवराज अण्णा पवार यांनी गर्दीचा फायदा घेत वैष्णवीच्या गळ्यातील पाच हजार दोनशे रुपये किमतीचा सोन्याचा गणपती असलेला दागिना चोरला या प्रकरणाची नोंद करमाळा पोलीस स्टेशनला झाली असता पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी दोन टीम तयार करून करमाळा शहरातील सीसीटीव्ही फुटेज तपास सुरू केला काही खबऱ्यांच्या माहितीनुसार हा गुन्हा युवराज पवार या चोराने केल्याचे कळाले त्याला ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली करमाळा पोलिसांनी तत्परतेने हे दोन्ही गुन्हे उघडकीस आणले व गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांना अटक केली आहे त्यामुळे करमाळा पोलिसांची कार्यतत्परता प्रकर्षाने जाणवत आहे.

सोलापूर शहर कचरामुक्त कधी होणार?

- **आ. विजयकुमार देशमुख यांचा विधानसभेत सवाल**
- **कचरा डम्पिंग स्टेशन शहराबाहेर हलविण्याची मागणी**

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

घनकचरा व्यवस्थापनासाठी स्वच्छ भारत योजनेअंतर्गत सरकारकडून मोठा निधी सोलापूर महापालिकेला मिळतो, तरीदेखील शहरात कचऱ्याचे साम्राज्य कायम आहे. तेव्हा सोलापूर शहर कचरामुक्त कधी होणार? असा परखड सवाल आ. विजयकुमार देशमुख यांनी विधानसभेत केला. याचवेळी त्यांनी शहरात असलेले कचरा डम्पिंग स्टेशन शहराबाहेर हलविण्याचीही मागणी केली.

आ. विजयकुमार देशमुख यांनी विधानसभेत सोलापुरातील कचऱ्याच्या समस्येकडे लक्ष वेधताना म्हटले की, मागील १० वर्षांपासून सोलापूर शहरात कचरा व्यवस्थापनासाठी म हापालिकेने खासगी मक्तेदारांची नेमणूक केली आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत मोठा निधी केंद्र सरकारकडून महापालिका प्रशासनाला मिळतो. तरीही शहरातील कचऱ्याचे साम्राज्य कायम आहे. हे लक्षात घेता सोलापूर शहर कचरामुक्त करण्यासाठी महापालिका प्रशासन काही उपायोजना करणार आहे का ? असा सवाल आमदार विजयकुमार देशमुख यांनी केला.याचवेळी त्यांनी शहरातील कचरा डम्पिंग स्टेशनबाबतदेखील प्रश्न उपस्थित केला. पूर्वी कचरा डम्पिंग स्टेशन हे शहराबाहेर असायचे, पण शहर वाढल्याने आता हे स्टेशन शहरात आहेत. त्यामुळे रोगराईची समस्या उद्भवली असून त्याचा त्रास नागरिकांना होत आहे. अनारोग्याच्या समस्येने नागरिक संतप्त झाले आहेत. हे विचारात घेता हे डम्पिंग स्टेशन शहराबाहेर हलवणार का ? असा सवालदेखील आमदार विजयकुमार देशमुख यांनी केला.

मंत्र्यांनी दिले असे स्पष्टीकरण

आमदार विजयकुमार देशमुख यांच्या प्रश्नाला उत्तर देताना संबंधित मंत्र्यांनी सांगितले की, सोलापूर शहरातून दररोज ३०० टन कचरा संकलित केला जातो. या कचऱ्यावर बायो-एनर्जी प्लांटमध्ये प्रक्रिया केली जाते. शहरात घंटागाड्या फिरवून कचरा संकलित केला जातो. मात्र झोपडपट्टी, दाट नागरीवस्ती भागात घंटागाडी फिरवूनदेखील कचऱ्याची समस्या कायम आहे. डंपिंग स्टेशनठिकाणी सुमारे सात लाख टन कचरा साचला होता. त्यापैकी पाच लाख टन कचरा हटविण्यात आला असून उर्वरित कचरा हटवण्याचे काम सुरू आहे. या ठिकाणी दुर्गंधी पसरू नये म्हणून स्प्रे मारण्यात येत आहे. कचरा डम्पिंग स्टेशन हटविण्याच्या मागणीसंदर्भात पाहणी करून निर्णय घेण्यात येईल.

बळीराजा प्रकल्प संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी विठ्ठल राठोड

सोलापूर, दि. १५ जुलै-

बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्यावतीने उपलप मंगल कार्यालयामध्ये जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांचा संवाद मेळावा संपन्न झाला. यावेळी सोलापूर जिल्हा बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी विठ्ठल चोखा राठोड यांची निवड संघटनेचे संस्थापक, प्रदेशाध्यक्ष मनोज चव्हाण यांनी केली.

यावेळी संघटनेचे प्रवक्ते अरुण पाटील-तायडे, जिल्हाध्यक्ष विठ्ठल राठोड, कार्यकारणी सदस्य राजू लोणकर, शुभम डोणालकर, विजय पाटील, अमोल गायकवाड, शिवराज गायकवाड, नांदुरकर, बोबडे, गोपाळ पवार, अशोक राठोड, संभा जाधव, अशोक कराळे, श्याम जाधव, प्रकाश गायकवाड, दिपक पवार, सातप्पा कोरे, करीम शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक विठ्ठल राठोड यांनी केले तर सूत्रसंचालन रेखा टाकळीकर यांनी केले. आभार बोबडे यांनी मानले.

आत्मविश्वासाने मेहनत केल्यास यश नक्की

- **संजीव निमकर : माढ्यात शालेय साहित्याचे वाटप**

तभा वृत्तसेवा,
माढा, दि.१५ जुलै-

संघर्ष कोणालाही टळला नसून आत्मविश्वासाने कठोर मेहनत केली यशापासून तुम्हाला कोणीही रोखू शकत नसल्याचे प्रतिपादन आर. आर. ग्लोबल कंपनीचे सीईओ संजीव निमकर यांनी केले.

येथील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद हायस्कूलमधील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप समारंभात ते बोलत होते. श्री. निमकर यांनी गेल्या वर्षीपासून आई केशरबाई व वडील मारुती यांच्या स्मरणार्थ केशमा शिष्यवृत्ती देण्याचा उपक्रम सुरू केला. यंदाही ज्या विद्यार्थ्यांना आई किंवा वडील नाहीत, ज्यांची गरीब परिस्थिती आहे अशा विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक नागेश खेडकर यांनी केले. श्री. निमकर यांनी जीवनात शिस्त, चांगल्या सवयी, सुसंगत यशासाठी गरजेची असल्याचे सांगितले. संभाषण कला, योग्य आहार, नियमित व्यायाम करण्याचे आवाहन त्यांनी केले. उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, गुरूराज कानडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे यांनी मनोगत व्यक्त केले. माजी नगरसेवक शहाजी साठे, शिवाजी जगदाळे, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा माधुरी साठे, सदस्य विनोद साळुंखे, देवीदास खरात, किरण पवार, विद्या कवडे यांच्यासह शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन भरत डुचाळ यांनी तर आभार प्रदर्शन किरण शेलार यांनी केले. शीतल चव्हाण, लक्ष्मण राऊत, किरण भांगे, रविंद्र चव्हाण, मिनाक्षी काशिद, प्रताप शहाणे, दिपक राठोड, संगीता क्षीरसागर यांनी परिश्रम घेतले.

सुप्रसिद्ध अभिनेता, निर्माता धीरजकुमार कालवश

मुंबई, १६ जुलै-

हिंदी चित्रपटसृष्टी आणि टीव्ही जगतातील सुप्रसिद्ध अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक धीरजकुमार यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. गेल्या तीन दिवसांपासून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. मंगळवारी त्यांची प्राणज्योत मालवली. धीरज कुमार यांना न्यूमोनियाचा संसर्ग झाला होता.

त्यांना अंधेरीतील कोकिळाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सोमवारी रात्रीपासून त्यांची प्रकृती जास्त बिघडल्याने त्यांना जीवन रक्षक प्रणालीवर ठेवण्यात आले. त्यातच मंगळवारी सकाळी पावणेबारा वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. धीरजकुमार लोखंडवाला परिसरात वास्तव्यास होते. त्यांच्या मागे पत्नी जुबी कोचर आणि मुलगा आशुतोष आहे. गेल्या काही काळापासून त्यांच्या पत्नीचीही प्रकृती ठीक नाही. बुधवारी त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी निवासस्थानी ठेवण्यात येईल आणि त्यानंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार केला जाईल.

शेंद्री फाटा येथे शेतकरी संघटनेचा रास्ता रोको

- **पीकविमा, ऊस एफआरपी आणि कर्जमाफीच्या मागण्या**

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १५ जुलै-

बार्शी तालुक्यात शेतकरी संघटनेने सोमवारी बार्शी-कुर्डूवाडी रस्त्यावरील शेंद्री फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले. तालुका अध्यक्ष हनुमंत भोसले पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी पीकविमा, उसाची थकीत एफआरपी, कर्जमाफी आणि अनुदानाच्या मागण्यांसाठी निदर्शने केली. आंदोलनामुळे रस्त्यावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली.

पीक विम्याची थकबाकी सन २०२३-२४ आणि २०२४-२५ च्या पीक विम्याची थकबाकी तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करावी. उसाची एफआरपी रक्कम सन २०२४-२५ मधील साखर कारखान्यांकडील उसाच्या थकीत एफआरपी रक्कम त्वरित द्यावी. शेतकरी कर्जमाफी-शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांचे कर्ज उतारे कोरे करावेत. श्रावण बाळ व संजय गांधी योजनेचे अनुदान त्वरित द्यावे आदी मागण्या करण्यात आले.

शेकडो शेतकऱ्यांनी सकाळी १० वाजता शेंद्री फाटा येथे घोषणाबाजी करत आंदोलन केले. तहसीलदारांना निवेदन सादर करुन मागण्यांची पूर्तता करण्याची मागणी केली. निवेदनाच्या प्रती राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री, समाजकल्याणमंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि ग्रामीण पोलीस स्टेशनला पाठवण्यात आल्या. तहसीलदारांनी निवेदन स्विकारुन वरिष्ठांशी चर्चा करुन कार्यवाहीचे आश्वासन दिले. हनुमंत भोसले पाटील यांनी सांगितले की, मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन छेडले जाईल आणि राजकीय पक्षांवर बहिष्कार टाकला जाईल. शेतकरी दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि आर्थिक संकटांना तोंड देत असून, शासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी आहे.

आकृतिबंध सुधारणामध्ये

लाड कमिटीतील वारसांचा समावेश करावा

- **महापालिका काम गार संघटना कृती समितीच्या वतीने मागणी**

सोलापूर, दि. १५ जुलै-

आकृतिबंध व सेवाप्रवेश नियमात सुधारणा करताना रोजंदारी बदली, कंत्राटी व मानधनावरील कामगार आणि सन १९७५ पासूनच्या लाड कमिटीतील



वारसांचा समावेश करावा, अशी मागणी महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कामगार नेते अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, सोलापूर महानगरपालिकेचा आकृतिबंध दि.२८ डिसेंबर २०२० रोजी मंजूर करण्यात आला आहे आणि दि.१५ डिसेंबर २०२१ रोजी सेवा प्रवेश नियम मंजूर करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरून म.न.पा. ने महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने पदभरती प्रक्रिया राबविली आहे. म.न.पा. अधिकारी, कर्मचारी यांना पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देताना काही त्रुटी असल्याचे आणि कालसुसंगत नसल्याचे त्यात सुधारणा करणे आणि मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसांच्या कार्यक्रमात सेवाविषयक बाबीच्या कार्यक्रम राबविणेसाठी शासनाने कळविल्याने सो.म.न.पा. चा आकृतिबंध २०२१ व सेवाप्रवेश २०२२ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहेत.

सोलापूर महापालिकेचा आकृतिबंध २०२१ व सेवाप्रवेश नियम २०२२ मध्ये सुधारणा करताना सोलापूर महापालिकेत गेल्या अनेक वर्षापासून रोजंदारी बदली कामगार, जलशुद्धीकरण केंद्राकडील कंत्राटी मजूर व इतर पदे, घंटागाडीवरील कंत्राटी मजूर वाहनचालक, उद्यान विभागातील कंत्राटी मजूर, मानधनावरील संगणक कर्मचारी, दवाखाने, प्रसुतिगृहाकडील आया, मेट्रेन इत्यादी पदाचा संख्येत वाढ करणेसाठी तसेच सन १९७५ पासूनच्या लाड कमिटी वारसांच्या अर्जाचा सुधारित आकृतिबंधात सर्व पदांचा समावेश करून सदर सेवकांना न्याय द्यावा. म हापालिकेच्या खाते प्रमुखांकडून आपल्या विभागात आवश्यक असलेला सर्व संवर्गातील पदांची संख्या आयुक्तांनी मागवून घ्यावी व सुधारित आकृतिबंधात समाविष्ट करून शासनाच्या मंजूरीसाठी पाठवावी. सेवाप्रवेश नियमात सुधारणा करतांना सोलापूर शहरातील उमेदवारांना प्राधान्य देण्याचे धोरण निश्चित करावे, असे कामगार नेते अशोक जानराव यांनी निवेदनात म्हटले आहे.

जल जीवन मिशन प्रशिक्षण उपक्रमास प्रतिसाद

- **सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्राचे वितरण**

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

केंद्र शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला जल जीवन मिशन अंतर्गत स्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण या विषयीचे प्रशिक्षण पंचायत समिती उत्तर सोलापूर येथे ९ ते १५ जुलै २०२५ या कालावधीत झाले. त्याचा समारोप आज करण्यात आला.

या प्रशिक्षणाचे आयोजन ज़िल्हा परिषद सोलापूर, पंचायत समिती उत्तर सोलापूर व पृथ्वीसंग्राम ग्रामविकास संस्था(कडेपूर, सांगली) आणि परिश्रम ग्रामीण विकास संस्था (मंगळवेढा) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी उत्तर सोलापूर तालुक्यातील प्रशिक्षणार्थिनींना गटचर्चा, खेळ या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या

प्रशिक्षणाचे उद्घाटन उत्तर पंचायत सोलापूर समितीचे गट विकास अधिकारी राजाराम भोंग यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशिक्षणात यशदाचे प्रशिक्षक राजेंद्र वारगड, भीमराव तुळजापूरे, सौदागर देवघन, उषा चव्हाण , कल्पना चव्हाण आणि सिद्धांत बाबरे यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान, या प्रशिक्षणाचा समारोप प्रसंगी निवासी संपादक सिद्धाराम पाटील , सोलापूर महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे आणि भीम प्रतिष्ठानचे संस्थापक बाबा बाबरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी तालुका समन्वयक मोनिका, गजघाटे , पाणी गुणवत्ता सल्लागारचे सोनाली कुलकर्णी, माणकेश्वर वाघे, विकास कानकृती यांनी परिश्रम घेतले. तसेच संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब यादव, रजाक शेख व पंचायत समिती उत्तर सोलापूर यांचे सहकार्य लाभले.

राष्ट्रवादीची मंगळवेढा तालुका आढावा बैठक संपन्न

मंगळवेढा,दि.१५ जुलै :

मंगळवेढा येथे राष्ट्रवादी (अजित पवार गट) काँग्रेसची आढावा बैठक सोमवारी दि. १४ जुलै रोजी झाली. यावेळी पक्ष संघटनेच्या बळकटीकरणावर विशेष भर देण्यासह स्थानिक पातळीवरील जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणे तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या रणनीतीवर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीसाठी जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, रामेश्वर माशाळ, अजित जगताप, भारत बेदरे,प्रवीण खवतोडे, ज्ञानेश्वर भगरे, वर्षा शिंदे, अभिषेक आव्हाड, ऋतुजा सुर्वे,अक्षय भांड, अरुण किल्लेदार,रेखा साळुंखे, माधुरी हजारे, पांडुरंग ताड, बसवेश्वर सुडके, संभाजी घुले, निलेश स्वामी नजिर इनामदार, सिद्धेश्वर डोके, विठ्ठल डोके, अप्पू पाटील, भरत नागणे, आशाताई मिटकरी आदी उपस्थित होते.

छावणी मालकांना सात दिवसांत बिले देण्याचे आश्वासन

- **आ. समाधान आवताडे यांच्या मागणीला यश**

तभा वृत्तसेवा,
मंगळवेढा, दि. १५ जुलै-

मंगळवेढा तालुक्यात चालवण्यात आलेल्या छावणी मालकांना देण्यात येणारे अनुदान अद्याप अदा करण्यात आलेले नाही. तरी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणारे छावणी अनुदान मिळेल या प्रतिक्षेत असणाऱ्या तत्कालीन छावणी चालक मालकांना हे बिल देण्यात यावे अशी मागणी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी विधिमंडळ पावसाळी अधिवेशन दरम्यान केली आहे केली आहे.

यासंदर्भात आमदार समाधान आवताडे यांनी प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले, तसेच लवकरात लवकर निधी वितरित करण्याची मागणी केली. आमदार आवताडे यांच्या या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री ना.मकरंद पाटील यांनी येत्या सात दिवसांत निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले आहे.

तत्कालीन दुष्काळी परिस्थितीमध्ये या छावणी चालकांनी तालुक्यात मोठ्या प्रमाणात असणारे पशुधन जगण्यासाठी स्वखर्चाने छावण्या चालवून अनेक पशुपालक शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला होता. त्यामुळे सध्या मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडलेल्या या छावणी मालकांची आर्थिक बाजू लक्षात घेऊन त्यांना त्यांचे बिल तात्काळ देण्यात यावे अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून छावणी कालावधीत खर्ची केलेले अनुदान आज ना उद्या मिळेल या आशेवर आम्ही सर्व छावणी चालक जगत आहोत. मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी आमच्या भावना लक्षात घेऊन या मागणीवर शासन दरबारी वेळोवेळी आवाज उठवला आहे. आमदार आवताडे यांच्या या संवेदनशील नेतृत्वामुळे छावणी चालकांना वेळोवेळी दिलासा प्राप्त झाला आहे.

-निलेश आवताडे, छावणी चालक, आंधळगाव

पावसासाठी बळीराजाचे डोळे आभाळाकडे

- **पाऊस लांबल्याने खरीप वाया जाण्याची भीती**

तभा वृत्तसेवा,
वैराग, दि. १५ जुलै-

बैराग (ता. बार्शी) परिसरात पेरण्या पूर्ण झाल्या असून हवा तेवढा पाऊस न आल्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पावसाने सध्या उघडीप दिल्यामुळे चिंतेत आणखी भर पडली आहे. काही ठिकाणी शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागत आहे. त्यामुळे आता जर पाऊस पडला नाहीतर खरीप पिकांचे कांही खरे नाही या चिंतेने बळीराजा धास्तावला आहे. त्यामुळे आता त्यांचे डोळे पावसासाठी आभाळाकडे लागले आहेत.

सध्या शेती करणे म्हणजे जुगार खेळण्याइतकं कठीण बनले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ येतो. तरीही प्रत्येक हंगामात शेतकरी नव्या उमेदीने प्रत्येक संकटाला सामोरे जात शेती करत असतो. मात्र सध्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी मूग, उडीद, सोयाबीन, मका, तूर या पिकांची पेरणी केली आहे. मे- जून महिन्यामध्ये दररोज पाऊस पडत गेल्याने शेतकऱ्यांना शेतीची उन्हाळी मशागतीची कामे चांगल्या प्रकारे करता आली नाहीत परिणामी शेतजमिनीमध्ये गवताचे प्रमाण वाढले. त्यामुळे शेतकऱ्यांना रोटर मारून खरीप पिकांची पेरणी करावी लागली. रान रोटरल्यामुळे जमिनीमध्ये हवा खेळती झाली आणि पाऊसही पडला नाही. त्यामुळे

आता खरीप पिकांना विशेषतः सोयाबीन पिकाला पाण्याची गरज भासू लागली आहे. बळीराजा पावसासाठी देवाला नवस साकडे घालत असून चातकाप्रमाणे तो पावसाची वाट पहात आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा अधिक असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. परंतू त्यांचा अंदाज फोल ठरला आहे. बार्शी तालुक्यामध्ये पडलेल्या पावसावरच शेतकऱ्यांनी सोयाबीन, मूग, उडीद, तूर, मका पेरणी केलेली आहे. पाऊस पडेल या आशेवर पेरणीचे धाडस केले पण आता पाऊसच गायब झाला असून वैराग भागातील शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. मागील तीन वर्षापासून पावसाने सोलापूर जिल्ह्यावर अवकृपा केल्याने शेतकरी मोठया आर्थिक संकटात सापडला आहे. या लहरी पावसाचा फटका दुष्काळी बार्शी तालुक्याला बसला असून याही वर्षी खरीपाची पेरणी अडचणीत सापडली आहे. सुरुवातीला पडलेल्या पावसावरच शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या मात्र आता पाऊस लांबू लागल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढू लागली आहे.

महत्त्वाचे...

वाळवा तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीवर चर्चा करा

मुंबई, दि.१५ जुलै-

वाळवा तालुक्यात द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, त्यांच्या नुकसान भरपाईबाबत कोणताही विचार होत नसल्याने सभागृहाचे कामकाज बाजूला ठेवून वाळवा तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीवर चर्चा करावी,,अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी विधानसभेत केली. ते म्हणाले की, २०२३-२४ साली ऐन पिक छाटणी घेतलेली असताना माझ्या वाळवा आणि आजूबाजूच्या परिसरात अवकाळी पाऊस झाला आणि या अवकाळी पावसाने द्राक्षबागेचे प्रचंड नुकसान झाले. जवळपास २५० हेक्टर बाग बाधित झाली आहे. शासनाने याचे पंचनामे तर केले पण अद्याप कोणतीही नुकसानभरपाई मिळाली नाही. यंदाही मे महिन्यातच पाऊस सुरू झाल्याने द्राक्षबागांची काडीच तयार झाली नाही. त्यामुळे यंदा हजारो एकर द्राक्ष बागांना घड पडणे शक्य नाही. त्यामुळे शेतकरी आणखी अडचणीत सापडला असल्याचे असे त्यांनी सांगितले

जयंतराव पाटील यांची मागणी

प्रकल्पासाठी जमिनी दिलेल्यांवर कोणताही अन्याय होणार नाही

तभा वृत्त सेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ जुलै:

प्रकल्प क्षेत्राबाहेर पाणी जाणार नाही अशी शासनाची भूमिका असून प्रकल्पासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांवर कोणताही अन्याय होणार नाही, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली.सदस्य रामराजे नाईक-निंबाळकर यांनी नीरा देवघर प्रकल्पाच्या पाण्याबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते म्हणाले, नीरा देवघर प्रकल्पाच्या ६५ ते १५८ किलोमीटर लांबीचे काम बंद नलिका वितरण प्रणालीने करण्यात येत आहे. तसेच खुल्या कालव्याचे अस्तरीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सुमारे तीन टी. एम. सी. पाणी वाचणार आहे. तसेच सीसीए आणि आयसीए मधील तफावत दूर करण्यासाठीही कार्यवाही करण्यात येत आहे. याबरोबरच प्रकल्पाबाहेर क्षेत्राला पाणी देण्याची शासनाची कोणतीही भूमिका नसल्याचेही मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

राज्यातील अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाईचे आदेश : मंत्री डॉ. उदय सामंत

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ जुलै :

मालेगावसह राज्यातील सर्वच अनधिकृत कत्तलखान्यांवर कारवाईचे आदेश देण्यात येत असल्याची माहिती मंत्री डॉ. उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली. मालेगाव येथील अनधिकृत कत्तलखान्यांच्या संदर्भात विधानपरिषदेत सदस्य विक्रांत पाटील यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते म्हणाले की, मालेगावमधील कुरेशी मोहल्ला ते सरदार चौक या भागात कत्तलखान्यांची स्थिती चिंताजनक आहे. अनधिकृतपणे चालणाऱ्या कत्तलखान्यांवर कारवाई करणे अपेक्षित असून, काही ठिकाणी कारवाई झाली आहे. यासंदर्भात पोलिस प्रशासनाला आणखी कडक सूचना दिल्या जातील आणि जेथे अवैध कत्तलखाने सुरू आहेत, तिथे तातडीने कारवाई करण्यात येईल. सणांच्या दिवशी महानगरपालिका व नगरपालिकांच्या माध्यमातून काही ठिकाणी तात्पुरते कत्तलखाने उभारले जातात. अशा ठिकाणी वाळू-मातीचा वापर करून रक्तवाहन थांबवण्याची काळजी घेतली जाते, असेही मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले. मोसम नदीत रक्तमिश्रित पाणी सोडल्याचा पुरावा सदर झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी सभागृहात चुकीची माहिती दिल्याबद्दल चौकशी करून कारवाई केली जाईल. मोसम नदीच्या संवर्धनासाठी राज्य सरकारने १० कोटी ५२ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून त्यातील ५ कोटी २६ लाख रुपये मालेगाव महानगरपालिकेला देण्यात आले आहेत, असेही त्यांनी सांगितले.



पवित्र पोर्टलमध्ये सुधारणा करणार : शालेय शिक्षण राज्यमंत्री

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ जुलै:

पवित्र पोर्टल रद्द केले जाणार नाही, मात्र त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा केल्या जातील. तसेच राज्यातील शिक्षक भरती प्रक्रिया सुरूच राहील, अशी माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधानपरिषदेत दिली. राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेसंदर्भात सदस्य जयंत आसगावकर यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी सदस्य सर्वश्री ॲड. निरंजन डावखरे, अभिजित वंजारी, किशोर दराडे, भावना गवळी, प्रवीण दरेकर यांनी चर्चेत सहभाग घेतला. राज्यमंत्री डॉ.भोयर म्हणाले की, २०१७ पासून उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित शाळा व विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षक पदे भरण्यासाठी पवित्र पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. या पोर्टलच्या माध्यमातून रिक्त पदांनुसार उमेदवारांची नियुक्ती केली जाते. मात्र, अनेक वेळा उमेदवार उपस्थित राहत नाहीत किंवा पात्र ठरत नाहीत, अशी समस्या निर्माण झाली आहे. उच्च गुणवत्ता असलेल्या उमेदवारांना संधी मिळावी यासाठी उपाययोजना केली जाणार आहे. पोर्टल बंद ठेवणे उचित नसून प्रक्रिया सुरूच ठेवण्यात येणार आहे. आधीच नियुक्त उमेदवारांची नावे पोर्टलवरून हटवण्याचे निर्देश विभागाला देण्यात येणार आहेत. संस्थाचालकांना पारदर्शक, कार्यक्षम आणि सुलभ भरती प्रक्रिया सुनिश्चित केली जाईल.

महाराष्ट्र देशातले सर्वात मोठे इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेले राज्य ठरणार : मुख्यमंत्री

टेस्लाची भारतात अधिकृत एंट्री

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ जुलै-

महाराष्ट्र देशातले सर्वात मोठे इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेले राज्य ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी टेस्ला एक्सपीरियन्स सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केला. जगप्रसिद्ध इलेक्ट्रिक कार निर्माता टेस्लाने भारतीय बाजारात प्रवेश केला आहे. त्यांच्या पहिल्या एक्सपीरियन्स सेंटरचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, मुख्यमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ धवसे व टेस्ला कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः मुंबईसाठी ही आनंदाची गोष्ट आहे, की जगातील सर्वात स्मार्ट कार भारतात येत आहे. याची सुरुवात महाराष्ट्रातून होत असून केंद्राच्या माध्यमातून टेस्लाने भारतात आपली सुरुवात करत असल्याची अधिकृत घोषणा केली आहे.

मुंबईतील टेस्लाचे सेंटर केवळ एक्सपीरियन्स सेंटर न राहता, डिलिव्हरी लोकेशन, लॉजिस्टिक सेंटर आणि सर्विसिंग युनिट देखील येथे सुरु करण्यात आले आहे. टेस्लाच्या कार्सचे बुकिंगही याठिकाणी सुरु झाले आहे. टेस्लाचे जगप्रसिद्ध मॉडेल ‘‘ ’’ आज भारतात लाँच करण्यात आले असून, या कारला १५ मिनिटांत चार्ज करता येते आणि ती एकदा चार्ज केल्यानंतर ६०० किमी धावू शकते. ही कार शून्य प्रदूषण करणारी असून, तिचे सेफ्टी फीचर्स जागतिक स्तरावर सर्वोत्तम मानले जातात, असे सांगून ते म्हणाले, राज्य शासनाने इलेक्ट्रिक वाहने प्रोत्साहनासाठी अत्यंत डायनॅमिक पॉलिसी राबवली आहे. यामध्ये चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर, कर सवलती व मॅन्युफॅक्चरिंगसाठी विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. येत्या काळात महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन उद्योगात देशात आघाडीवर असेल. तसेच मुंबईनंतर भारतातील आणखी दोन शहरांमध्ये सेवा विस्तारित केली जाणार असून, मुंबईत चार मोठे चार्जिंग हब आणि ३२ चार्जिंग स्टेशन उभारली जात आहेत, असेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे

पक्षाच्या बैठकीत पवाराकडून घोषणा

तभा वृत्तसेवा । जमीर काझी
मुंबई, दि. १५ जुलै:

जेष्ठ नेते शरद पवार यांनी आपल्या पक्षाची भाकरी फिरवली असून अपेक्षेप्रमाणे शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्ष कार्यकारिणीच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत जयंत पाटील यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर पक्षाचा धुरा शशिकांत शिंदे यांच्या खांद्यावर एकमताने सोपविण्यात आली. संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात झालेल्या पक्षाच्या बैठकीत मावळते प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या कारकिर्दीचा तपशीलवार आढावा घेत राजीनामा देत असल्याचे जाहीर केले. त्यांनीच शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी अनुमोदन दिले. या पदासाठी त्यांचे एकमेव नाव आल्याने बिनविरोध निवड करण्यात आली. शिंदे हे राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून शरद पवारांसोबत आहेत. विधान परिषदेत पक्षाचे मुख्य प्रतोद आहेत. संघटनात्मक बांधणीमध्ये त्यांना मोठा अनुभव आहे.

कोण आहेत शशिकांत शिंदे?

शशिकांत शिंदे हे मूळचे जावळी तालुक्यातील हुमगाव येथील रहिवासी आहेत. ते वाणिज्य शाखेचे पदवीधर असून माथाडी कामगारांचे प्रभावी नेते म्हणून ओळखले जातात. १९९९ साली शशिकांत शिंदे यांनी प्रथम जावळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढववून विजयी झाले. त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाचे जलसंपदामंत्री म्हणून काम पाहिले आहे. २००९ ते २०१४ या कालावधीत त्यांनी कोरेगाव मतदारसंघातून विजयी झाले. दोन पंचवार्षिक जावळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राहिले असून त्यानंतर दोन पंचवार्षिक कालावधीसाठी कोरेगावचे आमदारही होते.

पवार साहेबांसोबत राहणार

गेली २६३३ दिवस मी प्रदेशाध्यक्ष म्हणून काम पहिले असून या काळात पक्षाला बरे वाईट दिवस आले. पण पवार साहेबाच्या आदेशानुसार काम करत राहिलो, राज्यभर दौरे करून पक्ष वाढविण्याचा प्रयत्न केला. यापुढेही पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली पक्षासाठी कार्यरत राहणार आहे. हा शेवट नसून नवीन सुरवात आहे.

-जयंत पाटील (मावळते प्रदेशाध्यक्ष)

आर.आर.पाटलांप्रमाणे संधीचे सोनं करणार: शिंदे

पक्षामध्ये अनेक दिग्गज नेते पात्र असतानाही मला प्रदेशाध्यक्षपदाची संधी मिळाली. या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न करणार. सर्वसामान्य नेत्याला संधी मिळाल्यावर कसं काम करता येते हे आर. आर. पाटलांनी दाखवून दिलं. मी देखील त्यांच्या प्रमाणे काम करीत शासनाच्या चुकीच्या धोरणांविरोधात आवाज उठवणार, राष्ट्रवादीचा पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या सत्तेमध्ये आणण्यासाठी दिवसरात्र कष्ट करणार. महिन्याभरात राज्याचा दौरा करून पक्ष संघटना मजबूत करणार आहे. वेगवेगळ्या घटकांना सोबत घेऊन नवीन तरुणांना संधी देण्यावर आपला भर असेल.

- शशिकांत शिंदे (नूतन प्रदेशाध्यक्ष)

सोलापुरातील अश्विनी हॉस्पिटलमध्ये

डॉ. परळे पितापुत्रांनी पहिल्यांदाच स्वतंत्रपणे केलेली शस्त्रक्रिया यशस्वी

सोलापूर, दि. १५ जुलै-

डॉ. चिन्मय परळे आणि डॉ. गुरुनाथ परळे यांनी सोलापुरातील पहिली independent TAVI (Transcatheter Aortic Valve Implantation) शस्त्रक्रिया अश्विनी सहकारी रुग्णालय येथे यशस्वी पणे पार पाडली आहे. डॉ. चिन्मय परळे यांनी या प्रक्रियेसाठी लागणारे विशेष ट्रेनिंग यूनिवर्सिटी हॉस्पिटल, डेन्मार्क येथे घेतलेले असून, ते सोलापूरचे पहिले qualified heart valve स्पेशालिस्ट बनले आहेत. ही अश्विनी हॉस्पिटल मध्ये झालेली आठवी TAVI शस्त्रक्रिया आहे.

आतापर्यंत सोलापूर मधे झालेल्या शस्त्रक्रियांपेक्षा आज केलेल्या शस्त्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्वी या शस्त्रक्रियेसाठी म्हणजे विशेष तज्ञ बोलवावे लागत असत. मात्र आता डॉ चिन्मय परळे यांनी यासंबंधीचे विशेष प्रशिक्षण घेतल्याने कोणत्याही प्रॉक्टर शिवाय स्वतंत्र पणे डॉ परळे यांनी ही शस्त्रक्रिया केली. यासाठी सर्व स्टाफ आणि भूलतज्ञ डॉ कलशेट्टी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

तसेच अश्विनी रुग्णालयाचे चेअरमन श्री बिपीनभाई पटेल आणि सर्व संचालक यांचे सदैव प्रोत्साहन आणि पाठिंबा असल्यानेच हे शक्य झाले. हृदयातील झडपांच्या आजारांवर उपाययोजना म्हणून ओळखली जाणारी TAVI (Transcatheter Aortic Valve Implantation) ही एक अत्याधुनिक उपचारपद्धती आहे, जिच्यात Open Heart Surgery न करता, म्हणजेच छाती उघडण्याची गरज न पडता, धमनीमार्गे कृत्रिम झडप हृदयात पोहोचवून

खराब झालेल्या झडपाऐवजी बसवली जाते. ही प्रक्रिया प्रामुख्याने एओर्टिक स्टेनोसिस (हृदयातील एओर्टिक झडप अरुंद होणे) असलेल्या रुग्णांमध्ये केली जाते .सोलापूरसाठी एक मैलाचा दगड ठरणारी ही शस्त्रक्रिया सोलापूर आणि परिसरातील रुग्णांसाठी आशेचा किरण ठरली आहे. आता मोठ्या शहरात किंवा परदेशात जाण्याची आवश्यकता न पडता, जागतिक दर्जाची ही उपचारपद्धती सोलापुरातच उपलब्ध झाली आहे.त्यामुळे अश्विनी रुग्णालय सोलापूरमधील अग्रगण्य हृदय उपचार केंद्र ठरले असून, भविष्यात अजून अधिक रुग्णांना या अत्याधुनिक प्रक्रियेचा लाभ मिळावा, यासाठी हॉस्पिटल प्रयत्नशील आहे

क्सिओम-४' यशस्वी अंतराळ मोहिम भारतीयांसाठी प्रेरणादायी : मुख्यमंत्री

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ जुलै:-

स्वागतम् कॅप्टन शुभांशू , आपण तमाम भारतीयांचे अभिमान ठरला आहात. या यशस्वी मोहिमेसाठी आपले आणि आपल्या सहकाऱ्यांचे अभिनंदन..! अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांचे आज पृथ्वीवरील आगमनासाठी स्वागत आणि यशस्वी मोहिमेसाठी अभिनंदन केले आहे.

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात पोहोचलेले पहिले भारतीय अंतराळवीर कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि त्यांचे सहकारी 'क्सिओम-४' ही अंतराळ मोहिम यशस्वी करून पृथ्वीवर परतले. या यशस्वी मोहिमेमुळे भारतीयांचा अवकाश संशोधन क्षेत्रातील आत्मविश्वास दुणावला आहे. भारतीय तरुणांसाठी ही मोहीम प्रेरणादायी ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दृष्टीक्षेपातील अवकाश संशोधन क्षेत्राच्या विकासासाठी टाकले गेलेले हे महत्त्वाचे पाऊल तमाम भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. त्यासाठी कॅप्टन शुभांशू यांचे आणि त्यांच्या या साहसाला पाठबळ देणाऱ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचेही मनापासून अभिनंदन, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत जलसंपदा विभागाचे चार सामंजस्य करार

३१,९५५ कोटींची गुंतवणूक आणि १५,००० रोजगार संधी

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ जुलै :

महाराष्ट्राच्या उदंचन जलविद्युत प्रकल्प (पंप स्टोरेज) क्षेत्राला नवे बळ देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा विभागाने उदंचन जलविद्युत प्रकल्पांसंदर्भात मंगळवारी चार सामंजस्य करार केले. या करारामुळे नवीकरणीय ऊर्जा निर्मितीसह औद्योगिक व सामाजिक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य हे पंप स्टोरेज प्रकल्पात देशात अग्रणी राज्य ठरले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

विधानभवन येथील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण विकास महामंडळ) गिरीश महाजन, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने पंप स्टोरेज धोरणामध्ये खूप गतिशील धोरण स्वीकारले असून, प्रकल्पांची संख्या, गुंतवणूक आणि प्रस्तावित वीजनिर्मितीच्या बाबतीत संपूर्ण देशात आघाडी घेतली असून, नवीकरणीय उर्जेकडे वाटचाल करत आहोत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला 'नेट-झिरो' देश बनवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे. यासाठी आम्ही २०३० पर्यंत ५० टक्के पेक्षा अधिक वीज नवीकरणीय स्त्रोतांमधून मिळवण्याचा निर्णय घेतला आहे.

गुजरात आणि राजस्थान या राज्यांमध्ये भौगोलिक परिस्थितीमुळे एक लाख मेगावॉट सौरऊर्जेची निर्मिती शक्य आहे. महाराष्ट्रात मात्र भौगोलिक मर्यादेमुळे ३० ते ५० हजार मेगावॉट इतकीच सौरऊर्जा निर्माण शक्य आहे. जैवविविधतेमुळे आणि महाराष्ट्राला लाभलेल्या सह्याद्री पर्वतरांगांमुळे पंप स्टोरेज क्षेत्रामध्ये प्रचंड क्षमता असून या क्षमतेचा उपयोग करून घेतला जात असल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रकल्पांद्वारे एकूण ६,४५० मेगावॅट क्षमतेची वीजनिर्मिती अपेक्षित असून, सुमारे ३१,९५५ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १५,००० रोजगार संधी निर्माण होणार आहेत. यापूर्वी राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने १६ विविध अभिकरणांसोबत ४६ प्रकल्पांसाठी करार केले आहेत. आजच्या करारानंतर एकूण ५० प्रकल्प झाले असून त्यातून ६८,८१५ मे.वॅ. वीज निर्मिती, ३.७५ लाख कोटींची गुंतवणूक, आणि १.११ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

धोरणातील महत्त्वाच्या तरतुदी :

- जलाशयाचा वापर केल्यास ११.३३ लाख रुपये प्रति मे.वॅ. प्रतिवर्ष भाडे
- औद्योगिक दरानुसार पाणी शुल्क आकारणी
- जागेचे वार्षिक भाडे प्रचलित दरांनुसार

पाणी वापर व महसूल :

- प्रथम पाणीसाठ्याकरिता : १९.२९ टीएमसी पाणी लागणार
- पुनर्भरणासाठी : दरवर्षी ३.२४ टीएमसी पाण्याची गरज

महसूल उत्पन्न :

- प्रथम भरावासाठी अंदाजे १७६२.२१ कोटी रुपये
- वार्षिक पुनर्भरणासाठी ११२८.३२ कोटी रुपये

चार कंपन्यांबरोबर सामंजस्य करार

राज्य शासनाने २० डिसेंबर २०२३ रोजी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर उदंचन जलविद्युत प्रकल्पांची उभारणी करण्याचे धोरण जाहीर केले होते. याच धोरणाच्या अनुषंगाने चार कंपन्याबरोबर सामंजस्य करार करण्यात आले.

१. ग्रीनको एमएच-०१ आयआरईपी प्रा. लिमिटेड -

- नयागाव ऑफ स्ट्रीम क्लोजलूप उदंचन जलविद्युत प्रकल्प, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर - स्थापित क्षमता (मे.वॅ) - २,०००
- गुंतवणूक (रु.कोटी) - ९,६००
- रोजगार निर्मिती - ६,०००

२. ऋत्विक कोल्हापूर पीएसपी प्रा. लिमिटेड -

- ऑफस्ट्रिम क्लोजलूप उदंचन जलविद्युत प्रकल्प, ता. चांदगड, जि. कोल्हापूर स्थापित क्षमता (मे.वॅ) - १,२००
- गुंतवणूक (रु.कोटी) - ७,४०५
- रोजगार निर्मिती - २,६००

३. अदानी हायड्रो एनर्जी टेन लिमिटेड -

- अडनदी उदंचन जलविद्युत प्रकल्प, ता. चिखलदरा, जि. अमरावती स्थापित क्षमता (मे.वॅ) - १,५००
- गुंतवणूक (रु.कोटी) - ८,२५०
- रोजगार निर्मिती - ४,८००

४. मे. वॉटरफ्रंट कन्सट्रक्शन प्रा. लिमिटेड -

- कासारी- मुचकुंदी उदंचन जलविद्युत प्रकल्प, ता. लांजा, जि. रत्नागिरी स्थापित क्षमता (मे.वॅ) - १,७५०
- गुंतवणूक (रु.कोटी) - ६,७००
- रोजगार निर्मिती - १,६००
- एकूण - स्थापित क्षमता (मे.वॅ) - ६,४५०
- गुंतवणूक (रु.कोटी) - ३१,९५५
- रोजगार निर्मिती - १५,०००

अग्रलेख...

अभिव्यक्तीवर अत्याचार आणि आपण सारे...

लोकशाही ही केवळ निवडणुकांच्या दरम्यान जिवंत होणारी व्यवस्था नसते. लोकशाही अमूर्त असली तरी लोकतांत्रिक देशातील मुक्त, निर्भय नागरिकांच्या रूपात ती सतत जिवंत असते. ती आपल्या दैनंदिन वर्तनात, परस्पर संवादात आणि समाज माध्यमांवरील आचारधर्मातही प्रकट होणारी व्यवस्था असते. लोकशाहीचा सर्वांत महत्त्वाचा पाया म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य. मात्र, हा अधिकार कितीही मौल्यवान असला, तरी तो अमर्याद नाही, हे अनेकांना लक्षात येत नाही आणि त्यामुळे समाजात ताण-तणाव निर्माण होतात. सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्याच्या निमित्ताने यासंदर्भात दिलेला अभिप्राय समजून घेण्याजोगा आहे. नागरिकांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर करताना संयम आणि स्वनियमन (सेल्फ रेग्युलेशन) पाळणे आणि सोशल मीडियावरील द्वेषजनक अभिव्यक्तीवर नियंत्रण आणणे गरजेचे असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राहावे, असे नागरिकांना वाटते. सरकारने त्यात हस्तक्षेप करू नये, अशीही नागरिकांची अपेक्षा असते. मात्र, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग संयमाने केला नाही तर सरकारला हस्तक्षेप करण्यावाचून पर्याय उरत नाही, याकडे सर्वोच्च न्यायालयाने लक्ष वेधले. 'मी तुझ्या मताशी सहमत नसलो तरी ते मांडण्याचा तुझा हक्क अखेरच्या श्वासापर्यंत मी जपेन,' असे फ्रेंच विचारवंत वॉल्टेअर म्हणाला होता. ही भावना आपल्या राज्यघटनेतील अभिव्यक्तीच्या तरतुदीचा प्राण आहे. आपल्या अभिव्यक्तीसाठी आग्रही असलेली व्यक्ती इतरांच्या अभिव्यक्तीचा आदर करेल आणि समाजात भांडणे उद्भवणार नाहीत, याची काळजी घेईल, ही यामागील अपेक्षा. भारतात मत मांडण्याचा अर्थात अभिव्यक्तीचा हक्क राज्यघटनेच्या माध्यमातून नागरिकांना दिला गेला आहे. राज्यघटनेतील कलम १९(१)(अ) नुसार प्रत्येक नागरिकाला आपले विचार व्यक्त करण्याचा स्वातंत्र्य आहे. इतरही अनेक अधिकार नागरिकांना घटनेने दिलेले आहेत. अभिव्यक्तीचा अधिकार अमर्याद नाही. याच कलमाच्या दुसऱ्या भागात म्हणजे कलम १९(२) मध्ये सरकारला ''वाजवी निर्बंध'' लावण्याचा अधिकार देण्यात आला आहे, याची अनेकांना माहिती नाही. त्यामुळेच आपल्याला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे म्हणजे आपण अभिव्यक्ती, संस्कृती, सभ्यता या साऱ्यांवर अत्याचार करायला मोकळे आहोत, असा अनेकांचा समज होतो. असे लोक वाट्टेल ते लिहितात-बोलतात आणि त्यातून समाजात अप्रिय घटना घडतात. खरे तर देशाच्या सार्वभौमत्वाला आणि एकात्मतेला धोका, देशाची सुरक्षा, मैत्रीपूर्ण आंतरराष्ट्रीय संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता व नैतिकता, न्यायालयाचा अवमान, बदनामी, गुन्ह्यांना प्रोत्साहन अशा काही मुद्यांच्या अनुषंगाने सरकार अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणू शकते. सर्वोच्च न्यायालयाने याकडेच लक्ष वेधले आणि अभिव्यक्तीच्या अधिकारासोबत आलेल्या जबाबदाऱ्यांची अशा आगाऊ लोकांना आठवण करून दिली आहे. पूर्वी अभिव्यक्तीची साधने मर्यादित होती. आता डिजिटल युगात सोशल मीडियामुळे अभिव्यक्तीचे अवकाश मोकळे झाले आहे. अभिव्यक्तीचे लोकतांत्रिकीकरण झाले आहे. एका अर्थाने हे चांगलेही झाले. पण, दुसऱ्या अंगाने पाहिले तर याचे अनेक धोके आता दिसू लागले आहेत. समाज, संस्कृती, राज्यघटना, सरकार एवढेच नव्हे तर अभिव्यक्तीबद्दलही मुळात काहीच माहिती नसलेले असंख्य लोक काय वाट्टेल ते सोशल मीडियावर लिहितात-बरळतात. यातून समाज बिघडत असतो. त्यामुळे अशा सर्व उच्छृंखलांचा सरकारने बंदोबस्त केलाच पाहिजे. तशी वेळ आली आहे. परंतु, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संदर्भातील सामाजिक व सरकारी समंजसपणामुळे त्यांचे फावते आहे. कुणी जातीय विद्वेष पसरवितो. कुणी महिलांविषयी अभद्र उल्लेख करतो. विनोदाच्या नावाने कुणी तरी एखाद्याच्या शारीरिक व्यंगावर बोट ठेवत असभ्यपणाचे प्रदर्शन करतो. कुणी कुणाच्या नावाची मोडतोड करून त्याला चिडवितो. हे सारे समंजस अभिव्यक्तीमध्ये येत नाही. हा तद्दन आगाऊपणा आहे आणि तो समाजविघातकही आहे. मुद्दा असा की, भारतीय राज्यघटनेने आधी अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आणि त्याच्या पाठोपाठ त्याबद्दलच्या जबाबदाऱ्या सांगण्याचा प्रयत्न केला. याबाबत सरकारने एक पाऊल जरी उचलले तरी सेंसॉरशिप सुरू झाली, अशी बोंब सुरू होते. उद्या या विषयावर स्वयंस्पष्ट आणि प्रभावी असा कायदा बनवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले तरी अभिव्यक्तीवर अत्याचार करीत आलेले अनेक लोक आक्षेप घेतील. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर काही घटनात्मक निर्बंध आधीपासून असल्यामुळे आणि अन्य कायद्यांतही अभिव्यक्तीच्या गैरवापराला प्रतिबंध करू शकतील, अशा तरतुदी असल्यामुळे अशा वेगळ्या कायद्याची गरज नाही. परंतु, अभिव्यक्तीवरील हे अत्याचार थांबणारच नसतील तर तशा कायद्याचे सुजाणांना स्वागतच करावे लागेल. ते व्हायचे नसेल तर अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा वापर करणाऱ्या प्रत्येकाने त्याला लागून त्यांच्यावर येत असलेल्या जबाबदाऱ्यांचे भान ठेवले पाहिजे. लोकशाहीत अभिव्यक्ती हा मूलभूत हक्क असला तरी त्याच्या वापरादरम्यान आपण विवेक गमावला तर सरकार त्यावर बंधन आणण्याचा हक्क वापरेल, हे प्रत्येकाला कळले पाहिजे.

अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हे तलवारीच्या धारेवर चालण्यासारखे असते. त्यात स्वातंत्र्य आणि जबाबदारी यांचा समतोल साधावा लागतो. सतत स्फोटक भाषा, चिथावणीखोर शब्दांचा उल्लेख, बदनामी, नकारात्मक भावना आणि द्वेषयुक्त मजकूर असा उद्रेक अभिव्यक्तीच्या नावाने होत राहिला तर अशी अभिव्यक्ती कधी ना कधी कायद्याचा बडगा वापरून रोखावीच लागेल. तसे या देशात घडेल, तो दिवस दुर्दैवीच असेल. तो लोकशाहीच्या प्राणाला नख लागण्याचा दिवस असेल. अभिव्यक्तीचा अधिकार हा सर्वोच्च आणि मूलभूत अधिकार आहे. तो आपल्याला भारतीय राज्यघटनेने दिलेला आहे आणि त्यामुळे त्याला एक विशिष्ट प्रतिष्ठा आहे. तो लोकशाहीचा प्राण आहे. परंतु, या अधिकाराला असलेल्या प्रतिष्ठेची चाड अनेकांना नसते, मर्यादांचे भानही नसते. 'मला काय वाटतं ते मी बोलणारच!', असे वाक्य समाजमाध्यमांवर, व्हॉट्सअप ग्रुप्समध्ये आणि टेलिव्हिजनच्या चर्चांमध्येही ऐकायला मिळते. राजकारणातले लोक एरवी संविधानाच्या शपथा घेतात, पण ते देखील अभिव्यक्तीच्या अधिकारांचा अनेकदा गैरवापर करतात. त्यांचे काही बिघडत नाही तर आपले काय बिघडेल, असा विचार करून अन्य लोकही सोकावतात व सुटतात. अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे काय आणि त्याला काही मर्यादांची चौकट आहे का, याचा फारसा विचार असे लोक करीत नाहीत. ते अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या नावावर धुडगूस घालत असतात. आता ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब ही केवळ वैयक्तिक व्यासपीठे राहिलेली नाहीत. तिथे जर संयमी व जबाबदार वर्तन नसेल तर त्यांचे रूपांतर रणांगणात व्हायला वेळ लागत नाही. एखादी पोस्ट अचानक व्हायरल होते. त्यावर द्वेषजनक प्रतिक्रिया येतात. मग कुणी तरी कुठल्या तरी दैवताचा, महापुरुषाचा अपमान करणारी पोस्ट करतो. हे सारे अव्याहत सुरू असते. त्यातून मारामाऱ्या होतात, दंगली होतात. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. गतकाळात अशा किती तरी घटना घडलेल्या आहेत. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दंगली घडवण्यासाठी, भांडणे लावण्यासाठी दिलेले नाही. ते लोकतांत्रिक व्यवस्था चांगल्या पद्धतीने सुरू राहावी, यासाठी दिलेले आहे. लोकांना मोकळ्या मनाने आपली मते, विचार व्यक्त करता आले तर लोकतांत्रिक व्यवस्थेत आपल्याला चांगले जगता येत असल्याची भावना निर्माण होते. मुक्त अभिव्यक्तीचा दुसरा फायदा असा की, जे मुद्दे किंवा ज्या भावना सरकार, प्रशासन, न्यायपालिका किंवा माध्यमे यांच्या लक्षात येत नाहीत, ते त्यांच्या लक्षात आणून देण्याचे काम सामान्य नागरिक या अधिकाराच्या माध्यमातून करू शकतो. त्याबद्दल त्याच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. एकप्रकारे लोकशाहीतील मुक्त अभिव्यक्ती हे लोकशाहीचेच अधिष्ठान आहे. त्याचा स्वैर आणि आक्षेपार्ह पद्धतीने वापर करून आपणच हे स्वातंत्र्य धोक्यात घालणार असू आणि स्वतःवर आणखी एका कायद्याचे किंवा नियमांचे जोखड घेणार असू तर आपल्यासारखे करंटे आपणच ठरू, हे अभिव्यक्तीच्या पावित्र्याविषयी जागरूक असलेल्या प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे. ■

विशेष

बुलेट ट्रेन आली कुठपर्यंत?

प्रा. सुखदेव बखळे

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बांधकामात एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. या प्रकल्पासाठी वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) ते शिळफाटा दरम्यान बांधण्यात येत असलेल्या बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. हा बोगदा २१ किलोमीटर लांबीचा आहे. या अंतर्गत एका २.७ किलोमीटर लांबीच्या अखंड बोगद्याचेही बांधकाम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाअंतर्गत एकूण पाच किलोमीटरचे बांधकाम शिळफाटा आणि घणसोली दरम्यान 'न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड' (एनएटीएम) वापरून केले जात आहे. यासोबतच उर्वरित १६ किलोमीटरचे बांधकाम 'टनेल बोरिंग मशीन' (टीबीएम) वापरून केले जाईल. या बोगद्यात ठाणे खाडीखालील सात किलोमीटर लांबीचा समुद्राखालील भागदेखील समाविष्ट आहे. 'एनएटीएम' विभागात बोगद्याचे बांधकाम जलद करण्यासाठी, घणसोली आणि शिळफाटा येथे एकाच वेळी उत्खनन करण्यास परवानगी देणारा एक अतिरिक्त 'ड्रिव्हन इंटरमीडिएट टनेल' (एडीआयटी) बांधण्यात आला. आतापर्यंत शिळफाटा येथून सुमारे १.६२ किलोमीटर उत्खनन झाले आहे. याशिवाय 'एनएटीएम' विभागातील एकूण प्रगती सुमारे ४.३ किलोमीटर आहे. प्रकल्पाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवू नये, म्हणून व्यापक सुरक्षा उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. या सुरक्षा उपायांमध्ये 'ग्राऊंड सेटलमेंट मार्कर', 'पायझोमीटर', 'इनक्लिनोमीटर', 'स्ट्रेन गेज' आणि 'बायोमेट्रिक ॲक्सेस कंट्रोल सिस्टिम'चा समावेश आहे. असे म्हटले जाते की यामुळे आजूबाजूच्या संरचनांना नुकसान होऊ न देता सुरक्षित आणि नियंत्रित बांधकाम सुनिश्चित केले जात आहे.

या बांधकामाबद्दल 'एनएचएसआरसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक विवेककुमार गुप्ता म्हणाले की, आम्ही २१ किलोमीटरपैकी २.७ किलोमीटरचे बांधकाम पूर्ण केले आहे. यानंतर बोगद्याच्या अस्तरीकरणाचे काम सुरू होईल. त्यानंतर आरसी ट्रॅक बेड टाकले जाईल आणि ट्रॅक बसवण्याचे काम त्वरित सुरू केले जाईल. पावसाळ्यानंतर लगेचच बुलेट ट्रेन प्रकल्पाचे महाराष्ट्र विभागातील काम जलद गतीने व्हावे आणि नियोजित वेळेनुसार पूर्ण व्हावे, असा आमचा प्रयत्न असेल. दुसरीकडे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडॉरसाठी दमणगंगा नदीवरील पुलाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी बांधण्यात आलेला हा सोळावा नदी पूल आहे. गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील दमणगंगा नदीवर हा पूल बांधण्यात आला आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत गुजरातमध्ये एकूण २१ पूल बांधले जाणार आहेत. 'एनएचएसआरसीएल'ने सोळा नदी पूल पूर्ण केले आहेत. वलसाड जिल्ह्यात असलेल्या पाच नदी पुलांपैकी पाचही पूल आता पूर्ण झाले आहेत. अहमदाबाद ते मुंबई या संपूर्ण कॉरिडॉरवर २५ नदी पूल बांधले जात आहेत. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन हा भारतातील 'पहिला हाय-स्पीड' रेल्वे प्रकल्प आहे. तो मुंबई आणि अहमदाबाद शहरांना जोडेल. हा ५०८ किलोमीटर लांबीचा मार्ग आहे. बुलेट ट्रेनचा कमाल वेग ताशी ३२० किलोमीटर असेल.

वलसाड जिल्ह्यातील एमएएचएसआर मार्ग (दादरा आणि नगर हवेलीतील ४.३ किलोमीटरसह) सुमारे ५६ किलोमीटर लांब आहे. तो जरोली गावापासून सुरू होतो आणि वाघलदरा गावावर संपतो. या मार्गात वापी बुलेट ट्रेन स्टेशन, ३५० मीटर लांबीचा बोगदा, पाच नदी पूल आणि एक पीएससी पूल (२१० मीटर लांबीचा) यांचा समावेश आहे. वलसाडमध्ये पूर्ण झालेल्या पुलाची लांबी ३६० मीटर आहे. त्यात नऊ पूर्ण स्पॅन गर्डर (प्रत्येकी ४० मीटर) समाविष्ट आहेत. येथे चार मीटर आणि ५ मीटर व्यासाचा प्रत्येकी एक आणि ५.५ मीटर व्यासाचे आठ वर्तुळाकार खांब समाविष्ट आहेत. हा पूल बोईसर आणि वापी बुलेट ट्रेन स्टेशन दरम्यान आहे. या दोन स्टेशनदरम्यान आणखी एक नदी पूल बांधण्याचे काम दारोठा नदीवर पूर्ण झाले आहे. ही नदी वापी बुलेट ट्रेन स्टेशनपासून एक किलोमीटर आणि बोईसर बुलेट ट्रेन स्टेशनपासून सुमारे ६१ किलोमीटर अंतरावर आहे. वलसाड जिल्ह्यात इतरही नदी पूल पूर्ण झाले आहेत. दमणगंगा नदी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील वालवेरी गावाजवळील सह्याद्री टेकड्यांमधून उगम पावते. ती महाराष्ट्र, दादरा आणि नगर हवेली आणि दमणमधून सुमारे १३१ किलोमीटर वाहते आणि अरबी समुद्रात विलीन होते. ही नदी सिंचनाचे स्रोत आहे. ही नदी पिण्यासाठी, सिंचनासाठी आणि औद्योगिक वापरासाठी पाण्याचा एक महत्त्वाचा स्रोत आहे. वापी, दादरा आणि सिल्वासासारखी औद्योगिक शहरे तिच्या काठावर आहेत. नदीवर बांधलेले मधुबन धरण हा एक प्रमुख जलसंपदा प्रकल्प आहे. त्याचा फायदा गुजरात, दादरा-नगर-हवेली आणि दमण-दीवला होतो.

भारतीय बुलेट ट्रेनच्या इतिहासात सात जुलै या तारखेला फार महत्त्व आहे. रेल्वेमंत्र्यांनी सात जुलै रोजी सादर केलेल्या २०१४-१५ च्या रेल्वे अर्थसंकल्पात भारताच्या पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची घोषणा केली. यापूर्वी 'हाय स्पीड रेल कॉरिडॉर'चा प्रस्ताव बुलेट ट्रेन प्रकल्प म्हणून ओळखला जात होता. अर्थसंकल्पीय भाषणात मुख्य शहरांमधील प्रवास वेळ कमी करणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट होते. गुजरातमध्ये मुंबई-अहमदाबाद रेल्वे कॉरिडॉरचे काम वेगाने झाले. महाराष्ट्रातले काम तुलनेने मंद होते; परंतु अलिकडेच या कामाला गती आली आहे. कॉरिडॉरमध्ये बांधल्या जाणाऱ्या बारापैकी गुजरातमध्ये असलेल्या आठपैकी सहा स्थानकांवर स्ट्रक्चरल काम पूर्ण झाले आहे, तर महाराष्ट्रातील चारपैकी तीन उन्नत स्थानकांवर आणि मुंबईत भूमिगत स्थानकाचे काम सुरू आहे. महाराष्ट्रात १५६ किलोमीटर ट्रॅक बांधण्यात आला आहे. रेल्वेस्थानक बांधल्या जात असलेल्या बारा शहरांपैकी मुंबई, ठाणे, विरार, बोईसर ही स्थानके महाराष्ट्रात असून गुजरातमध्ये वापी, बिलीमोरा, सुरत, भरूच, वडोदरा, आणंद, अहमदाबाद आणि साबरमती अशा स्थानकांचा समावेश आहे. मुंबई-अहमदाबाद 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर'साठी शंभर टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र, गुजरात आणि दादरा आणि नगर हवेली येथून एकूण १३८९.४९ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. कोरोना काळामुळे आणि शेतकऱ्यांच्या विरोधामुळे संपादनास विलंब झाला.

प्रकल्पाअंतर्गत बहुतेक, म्हणजेच एकूण सुमारे ४६८ किलोमीटर उन्नत आहे. त्यामुळे भूसंपादनाची आवश्यकता कमी झाली. मुंबई-अहमदाबाद 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर' प्रकल्पाची अंदाजित किंमत १.०८ लाख कोटी ते १.६५ लाख कोटी रुपयांच्या दरम्यान असल्याचे सांगितले जात आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे आठ तासांचा प्रवास दोन तासांमध्ये पूर्ण होईल असा दावा केला जात आहे. 'जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी' (जेआयसीए) ने या प्रकल्पासाठी ८० टक्के कर्ज दिले आहे. जपानमधून बरीच यंत्रसामग्री आयात केली जात आहे. भविष्यात हा 'हाय-स्पीड रेल कॉरिडॉर' दिल्लीपर्यंत वाढवण्याची योजना आहे. त्याचा फायदा राजस्थान आणि हरयाणालाही होईल. मुंबई-अहमदाबाद मार्गावर चालवण्यात येणाऱ्या बुलेट ट्रेनची जपानमध्ये अंतिम चाचणीही झाली आहे. ती पुढील वर्षी भारतात आणली जाऊ शकते. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सुरू झाल्यानंतर भारतात लगेचच नवी दिल्ली-पाटणा, मुंबई-हैदराबाद आदी मार्गावरही बुलेट ट्रेन सुरू करण्याचे घाटत आहे. त्यापैकी मुंबई-हैदराबाद मार्गाची घोषणा पूर्वीच झाली आहे; परंतु या योजनेचे सर्वेक्षणच अजून झालेले नाही. मुंबई-नागपूर मार्गाचाही विचार केला जाऊ शकतो. आता नवी दिल्ली-पाटणा मार्गाची घोषणा झाली आहे. त्यानंतर मुंबई-चेन्नई, बंगळुरू, कोलकत्ता आदी शहरांसाठीही बुलेट ट्रेनच्या घोषणा केल्या जाऊ शकतात. ■

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

वेध

गिरीश शेरेकर

विदर्भाची सांस्कृतिक राजधानी कलंकित!

विदर्भाची सांस्कृतिक राजधानी म्हणून अमरावतीची ओळख आहे. ही ओळख अनेक दिग्गजांच्या योगदानातून व त्यांनी केलेल्या कार्यातून मिळाली आहे. विदर्भातल्या अन्य कोणत्याही जिल्ह्यापेक्षा अमरावती शहर व जिल्ह्यात धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक घडामोडी मोठ्या प्रमाणात होतात. जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत. त्याचे दाखले विविध धर्मग्रंथांमध्ये सापडतात. देवी, देवतांचा, संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज, संत अच्युत महाराजांसह अन्य संत, महंतांचा हा जिल्हा आहे. दादासाहेब खापर्डे, शिवाजीराव पटवर्धन, देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख व इतर महापुरुष जिल्ह्यात होऊन गेलेत. त्यांच्या शाश्वत विचारांवरच वाटचाल होत असल्याने जिल्ह्याचा लौकिक वाढला आणि विदर्भाच्या सांस्कृतिक राजधानीपर्यंत तो पोहोचला. हा बहुमान कलंकित होईल, अशा काही घटना अलिकडच्या काळात बेलगाम झालेल्या तरुणाईमुळे सातत्याने घडत आहेत. त्याची चर्चा विदर्भातच काय राज्यात व देशाच्या कानाकोपऱ्यात होत आहे.

अमरावतीत कालच 'फेक वेडिंग पार्टी'चे प्रकरण उघड झाले. अमरावतीकरांसाठी हे नाव नवीनच आहे. यापूर्वी बॅचलर पार्टी, रेन डान्स पार्टी, कॉकटेल पार्टी अशी नावे ऐकायला मिळाली. अशा पार्ट्यांवर कारवाई झाल्याने ही नावे बदनाम देखील झाली. बदनाम नावांना पुन्हा प्रतिसाद मिळत नाही म्हणून नाव बदलून युवकांना आकर्षित करण्याचा फंडा म्हणजे 'फेक वेडिंग पार्टी' होय. पोलिसांकडून कारवाई झाल्यावरच या पार्टीचे वास्तव सर्वांच्या समोर आले. एका बारच्या हॉलमध्ये १६ ते २१ वयोगटातल्या जवळपास १५० युवक-युवती या पार्टीत सहभागी झाले होते. ते सर्व विद्यार्थी आहेत. समाज माध्यमावरून या पार्टीचा प्रचार व प्रसार झाला. मुलांसाठी ५०० रुपये शुल्क होते तर मुलींना मोफत प्रवेश होता. म्हणजे एकवर एक फ्री! फ्री कशासाठी हे येथे सांगण्याची गरज नाही. कल्पना करा फक्त २० बाय २५ फुटाच्या हॉलमधले चित्र कसे असेल. पोलिसांनी जेव्हा या पार्टीवर छापा टाकला, तेव्हा तेथील कर्णकर्कश संगीतावरचा धिंगाणा पाहून ते चक्रावून गेले. एकही सुस्थितीत त्यांना आढळला नाही. पोलिसांनी नियमानुसार पुढची कारवाई केली. या पार्टीत जे सहभागी होते, त्यांना किती लाज वाटली हे माहीत नाही. पण, सामाजिक भान जपणाऱ्यांना या बातमीने अस्वस्थ केले. मागच्या वर्षी मे महिन्यात 'पब'वरून अमरावतीत वादळ उठले होते. काही काळ ते शांत होते. आता थेट 'पब' न म्हणता वेगवेगळ्या नावाने तो तमाशा सुरूच आहे. 'फेक वेडिंग पार्टी' हा त्यातलाच प्रकार आहे. अमरावतीसह राज्यातली अशी सर्व ठिकाणे तोकड्या कपड्यांवर नृत्य करत मद्यपान करण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. अश्लीलतेचा कळस त्यांनी तर केव्हाच गाठला आहे. आता गांजापासून एमडी ड्रग्सपर्यंतची नशा येथे करता येते आणि हवे असल्यास शरीरसुख देखील सहजतेने मिळते, अशी माहिती आहे. हुक्का पार्लर यापेक्षा वेगळे नाही. हे सर्व प्रकार गंभीर आहेत आणि समाज व्यवस्थेला पोखरत आहे.

पूर्वी धनाढ्य कुटुंबातल्या युवकांचा वावर येथे प्राधान्याने होता. आता मध्यमवर्गीय पण दिसतात. त्यात शिक्षण घेणाऱ्यांची संख्या मोठी आहे आणि हाच खरा चिंतेचा विषय आहे. मोठ्या शहरात नोकरी व शिक्षणाच्या निमित्ताने आलेले युवक या चक्रव्यूहात अडकत आहेत. आपली मुले काय करतात, याची पुसटशी कल्पना सुद्धा अनेक पालकांना नाही.

अमरावती शहरासह जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून दिवसाआड हत्या, हाणामारी, चोरी, बलात्कार यासारख्या गंभीर घटना घडत आहेत. विशेष म्हणजे त्यात अल्पवयीनांचा सहभाग दिसतो आहे. गांजा व एमडी ड्रग्स जप्तीच्या घटना सातत्याने समोर येत आहे. याचाच अर्थ या दोन्ही अमली पदार्थांची मागणी शहरात वाढत आहे. त्या तुलनेत घेणाऱ्यांची संख्याही वाढली असेलच! अमली पदार्थ कोणताही असो तो सेवन केल्यानंतर आपले खरे स्वरूप दाखवतो. गुन्हेगारीत युवकांचे वाढलेले प्रमाण किंवा मदहोश जीवनशैलीची त्यांना लागलेली सवय हे त्याचेच एक रूप आहे. शहरात अलिकडच्या काळात झालेल्या हत्या म्हणा किंवा अन्य गुन्हेगारी घटनांमध्ये ९० टक्के आरोपी हे कोवळी मुले आहेत. एखाद्याचा खून किंवा दुसरे कोणते गुन्हेगारी कृत्य करेपर्यंत जर कोणाची मजल जात असेल तर त्याच्यात हा भाव निर्माण होण्याला अमली पदार्थांचे सेवन खूप पूरक ठरते. तेच पदार्थ जर अगदी सहजतेने मिळायला लागले तर गुन्हेगारी आहे, त्यापेक्षाही वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. विदर्भाची सांस्कृतिक राजधानी कलंकित होऊ नये, यासाठी पोलिसांनी, सामाजिक संघटनांनी व पालकांनी हा विषय गंभीरतेने घेण्याची गरज आहे. ■

९४२०७२१२२५

धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

ॐ नमो चित्कला आदिशक्ती मुक्ताई

'ॐ नमो चित्कला आदिशक्ती मुक्ताई, ॐ नमो चित्कला संत मुक्ताबाई' या सिद्धमंत्राचा जप वारकरी संप्रदायात सर्वत्र होतो. संत मुक्ताबाई म्हणजे आदिशक्ती, ब्रह्मचित्कला, त्रिभुवनपावनी, आदिमाया, आद्यत्रयजननी अशा विविध उपाध्यांनी नटलेली परब्रह्म परमात्म्याची निर्गुण निराकार आद्या शक्ती. ती शक्ती सगुण साकार होऊन भूतलावर अवतीर्ण झाली आहे, असे विविध अधिकारी संतांनी आपल्या अभंगातून स्पष्ट केले आहे. का दिल्या असतील या उपाध्या? खरं सांगायचं तर प्रवृत्तीतून निवृत्त झाल्यावरच ज्ञान मार्ग सोपान होतो आणि जीव मुक्त होतो. संन्याशाची पोरं म्हणून ज्यांचा छळ झाला ते चौघे भावंडं निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर माउली, सोपानदेव आणि आदिशक्ती मुक्ताई हे समाजाचे सन्मार्ग पथदर्शी आहेत. विष्णुपुराणात 'सा विद्या या विमुक्तये' ज्ञान हेच मुक्तीचा मार्गसोपान आहे; मात्र त्यासाठी निवृत्त होणे गरजेचे आहे.

आश्विन शु. प्रतिपदा शके १२०१ शुक्रवार म्हणजे घटस्थापनेच्या दिवशी अवतीर्ण झालेली मुक्ताई चारही भावंडांत सर्वांत लहान आणि महानही; म्हणूनच तिला 'आदिशक्ती' म्हटले आहे. १४०० वर्षांच्या महान योगी असलेल्या चांगदेवांनी तर तिचे गुरुत्व स्वीकारलेच; पण आर्तभावाने वर्णनही केले-

'मुक्ताई मुक्तरूप मुक्तीची चित्कला । नित्य मुक्तलीला दावी अंगी !'

मुक्ताईला 'ब्रह्मचित्कला' म्हटले आहे. ब्रह्मचित्कला म्हणजे ब्रह्माची प्रकाशमान, देदीप्यमान आणि रचनात्मक आद्याशक्ती. म्हणजे निर्माण, पालन आणि लय जिच्या हातात आहे ती परब्रह्म परमात्म्याची आदिशक्ती. ब्रह्म म्हणजे वैश्विक चेतना, जो सर्वव्यापी, अनंत आणि शाश्वत आहे असा परमेश्वर. हा परमेश्वर सत् चित् आनंद स्वरूप आहे. 'चित्कला'मधील चित् म्हणजे परब्रह्माची चित्शक्ती, चैतन्य शक्ती आणि कला म्हणजे अभिव्यक्ती, कलात्मक शक्ती. ब्रह्मचित्कला म्हणजे ब्रह्माची अशी शक्ती जी विश्वात चैतन्य आणि रचनात्मकता भरते. ब्रह्मचित्कला म्हणजे परब्रह्माची जाणीव शक्ती आणि रचनात्मक शक्ती, जी विश्वाची निर्मिती, पालन आणि लय करते. जिच्यात अवघे विश्व सामावले आहे ती त्रिगुणात्मिका जगदंबा म्हणजे ब्रह्मचित्कला होय. उदाहरण जर घेतले तर एखाद्या झाडाचे बी आपल्या मुठीत मावते म्हणून ते न्यून समजू नये. त्या बीजात प्रचंड वृक्ष सामावलेला असतो. ती त्या बीजाची शक्ती होय. सूर्य उगवल्यावर सर्वत्र प्रकाशमान करण्याची क्षमता असते. आपण डोळ्यावर हात ठेवला तर सूर्य आपल्याला दिसत नाही, पण तो विश्वव्यापक आणि चैतन्यस्वरूप आहे, हे विसरता कामा नये.

'जैसें बिंब तरी बचके एवढेंपरि प्रकाशा त्रैलोक्य थोकडें ।'

तद्वतच मुक्ताई लौकिकार्थाने चार भावंडात लहान असल्या, तरी ब्रह्मचित्कलाच आहेत. मुक्ताई चार भावंडांत सर्वांत धाकट्या म्हणून सगुण साकार रूपात जन्माला आल्या असल्या, तरी त्या त्रिभुवन पावनी आणि आद्यत्रय जननी आहेत. संत शिरोमणी श्रीनामदेव महाराज असोत, महाविष्णू ज्ञानेश्वर महाराज असोत की १४०० वर्षांचे योगी चांगदेव असोत; या सर्वांना आईसारखे रागावणे, नाराजी व्यक्त करणे, प्रसंगी फटकारण्याचा अधिकार आदिशक्ती मुक्ताबाई आईसाहेबांनाच होता. हा अधिकार दोन प्रकारे आहे. एक तर योगिया दुर्लभ आदिशक्ती आदिमाया आहेत. हे विश्व तिच्यातूनच निर्माण झाले आणि तिच्यातच विलीन होणार आहे आणि दुसरे म्हणजे त्या लौकिकार्थाने स्त्री आहेत. स्त्रीच्या अंगी प्रगल्भता, विवेक, आत्मशक्ती पुरुषांपेक्षा निसर्गतःच अधिक असते, हे विज्ञान सांगते. शिवाय स्त्रीचे मानसिक वय हे तिच्या शारीरिक वयापेक्षा पाच वर्षांनी मोठे असते, हेही मानसशास्त्र सांगते.

ताटीचे अभंग लिहून ज्ञानेश्वर माउलींना अधिकार वाणीने ताटी उघडा सांगणारी मुक्ताई आईसाहेब या त्यावेळी शारीरिक वयाने केवळ ८ वर्षांच्या आणि ज्ञानेश्वर १२ वर्षांचे होते. शारीरिक वयाने ज्ञानदेव चार वर्षांनी मोठे होते, पण मानसिक वयाचा विचार केला तर मुक्ताबाई आईसाहेब या १३ वर्षांच्या म्हणजे माउलीपेक्षा मानसिक वयाने एक वर्षाने मोठ्या होत्या. त्यामुळेच चित्कला असलेल्या मुक्ताईंनी माउलींना ताटीचे अभंग सांगून एका अर्थाने आईची भूमिका घेतली. ज्ञानेश्वरांना स्पष्ट शब्दात अधिकारवाणीने ताटी उघडण्यास भाग पाडले. ताटीचे अभंग वाचताना त्यांचा अधिकार सामान्य माणसालाही कळतो. उच्च दुःख आठवले तर कनिष्ठ दुःख गौण होते. 'माझ्या पायात चपला नव्हत्या म्हणून मला दुःख होते, पण मी बाजूला पाहिले तर त्याला पायच नव्हते' यात जसे स्पष्ट होते की, त्याच्या दुःखापुढे माझे दुःख गौणच आहे. हेच तर आईसाहेब ज्ञानोबांना सांगतात, ''अरे दादा, आपल्याला केवळ शब्दक्लेश दिला

कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी : आयुक्त डॉ. ओम्बासे

भारत पेट्रोलियम आणि महापालिकेच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि.१५ जुलै-

सध्याच्या धावपळीच्या जीवनात मधुमेह (डायबिटीस) आणि रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे महानगरपालिकेतील प्रत्येक कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, सकस आहार घ्यावा आणि नियमितपणे शरीराची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि सोलापूर म हापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आज सोलापूर महानगरपालिका येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर व नेत्र तपासणी शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या स्वच्छता पंधरवडा कार्यक्रमांतर्गत बीपीसीएलच्या सहकार्याने या मेगा आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन सोलापूर म हापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बीपीसीएलचे टेरिटरी मॅनेजर सौरभ शर्मा, वरिष्ठ प्रबंधक सचिन रावत, सोलापूर म हापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त. शशिकांत भोसले, गिरीष पंडित,आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने आणि एम.सी.एच. न्यूरोसर्जन डॉ. करुणा कबाडी आदी मान्यवर उपस्थित होते.

बीपीसीएलचे सौरभ शर्मा म्हणाले की, महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी या सेवेचा लाभ घ्यावा आणि शासनाचे सर्वांसाठी सदृढ आरोग्याचे प्रयत्न सुरू आहेत. ज्यात बीपीसीएल नेहमीच सहकार्य करेल.यावेळी अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी विशेषतः सफाई कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे, यावर भर दिला. अशा शिबिरांमधून त्यांनी आपली आरोग्य तपासणी करावी, जेणेकरून त्यांना होणाऱ्या लहान-सहान आजारांची माहिती होऊन स्वतःच्या प्रकृतीची काळजी घेता येईल. तसेच उपायुक्त आशिष लोकरे यांनी बदलत्या हवाम नामुळे आणि योग्य आहाराच्या अभावामुळे होणाऱ्या आजारांवर प्रकाश टाकत आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला एक पेड माँ के नाम या उपक्रम ांतर्गत वृक्षारोपण विषयी जनजागृती करण्यात आली. प्राथमिक स्वरूपामध्ये क्षयरोग रुग्णांसाठी आरोग्यदायी किटचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. तन्वंगी जोग यांनी केले तर बीपीसीएलचे फिल्ड सेल्स ऑफिसर विद्याधर हतागळे यांनी आभार प्रदर्शन केले. पालिकेतील कर्मचारी आणि नागरिकांना मोफत आरोग्य तपासणीचा लाभ मिळाला.

या शिबिरात वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुंधती हाराळकर, डॉ. तन्वंगी जोग, डॉ. गीता गावडे,डॉ. वैशाली म्हसवेकर, डॉ. सुधा फडके, आनंद भंडारे, प्रदीप वेदपाठक, शंकर मंदोलू, जाईबाई जाधव, अनुपमा राठोड, व्ही. जी. गायकवाड, शिवलीला धन्ना, बावेश नाईक आदी डॉक्टर्स व वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले होते.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

वीज उपकेंद्रासाठी जागा पाहिजे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, बार्शी तर्फे निवेदन करण्यात येते की, खालील ठिकाणी नवीन 33/11 केव्ही उपकेंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. या उपकेंद्रासाठी किमान 40 ते 60 आर क्षेत्रफळ व शक्यतो चौकोनी आकार असलेली तसेच सार्वजनिक रस्त्या लगतअसणारी जमीन आवश्यक आहे. अशा प्रकारच्या जागा देऊ इच्छिणाऱ्या जमीन मालकांनी आपल्या जागेच्या प्रमाणित कागदपत्रासह जाहिरात दिलेल्या दिनांकापासून 15 दिवसाच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., विभागीय कार्यालय, बार्शी आझाद चौक (पॉवर हाऊस), बुरूड गल्ली, बार्शी येथे जमिनीच्या अपेक्षित दरासह संपर्क साधावा.

अ.क्र.	अ.क्र.33/11 के.व्ही. उपकेंद्राचे नाव
1	ढोकरी ता.करमाळा जि.सोलापूर
2	कुंभेज ता.करमाळा जि.सोलापूर
3	फपाळवाडी रोड ता.बार्शी जि.सोलापूर

कार्यकारी अभियंता महावितरण,
विभागीय कार्यालय,बार्शी

PRO/BMTZ/065/2025-26

जाहीर प्रसिध्दीकरण

अर्ज वारस दाखला मिळणेबाबत
दि.कि. अर्ज नं. ७५/२०२४ नि.नं. ९

बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात
(श्रीमती रेवती प्र. बगाडे, ४थे दिवाणी न्यायाधीश)

शांताबाई केशव शिराळकर,
वय - ७० वर्षे, धंदा - घरकाम,
रा. गौडगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

१) उत्तेश्वर केशव शिराळकर,
वय - ४३ वर्षे, धंदा - मजुरी,
रा. गौडगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) रामेश्वर केशव शिराळकर,
वय - ४५ वर्षे, धंदा - मजुरी,
रा. गौड़गाव, ता. बार्शी, जि. सोलापूर — **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांची सख्खी चुलत सासू, सुभद्राबाई वामन शिराळकर आहे. ती दि. ०७/०९/२०२२ रोजी मयत झालेली आहे. सुभद्राबाई वामन शिराळकर यांचे पश्चात यातील अर्जदार ही जवळची व कायदेशीर वारस आहे. यातील अर्जदार यांचे शिवाय मयत सुभद्राबाई वामन शिराळकर यांना दुसरे कोणीही जवळचे वारस नव्हते व नाहीत. मयत सुभद्राबाई वामन शिराळकर यांचे नावे मौजे गौडगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे ग्रामपंचायत मिळकत नं. १२९५ याचे क्षेत्र ३२.१२ चौ.मी. याचे फुट ३७८ पक्के बांधकाम घर दगड विटाचे चुना किंवा सिमेंटचे घर तसेच ६६.०५ चौ.मी. याचे चौ.फुट ७११, अशी खुली जागा याचे एकूण क्षेत्रफळ १०८९ चौ. फुट याचा जमिन गट नं. ११/१/१९ असा आहे याची चतुःसिमा :- पुर्वेस - प्लॉट नं. २०, दक्षिणेस - रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. १८, व उत्तरेस - गट नं. ३२ याची पाणी व वागणूक दक्षिण बाजुचे रस्त्याने जाते व आहे. अर्जदार यांना सदर मिळकतीचे वारसा हक्काने नावे लावण्यासाठी अर्जदारांना वारस दाखला मिळणे जरुरीचे आहे. त्यासाठी सुभद्राबाई वामन शिराळकर यांचे पश्चात यातील अर्जदार हिच जवळचे व कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना त्यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस दाखला मिळणे न्यायाचे दृष्टीने जरूरीचे झाले आहे. त्यासाठी प्रस्तुतचा अर्ज आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत सुभद्राबाई वामन शिराळकर, यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. १४/०८/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. कळावे हे जाहिर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्कयानिशी दिले असे. ता. १४/०७/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय
कनिष्ठ स्तर बार्शी ता. बार्शी

जि.प. मराठी शाळा सलगरमध्ये शालेय साहित्यांचे वाटप

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ जुलै-

एमक्युर फार्मासिटीकल्स लि. पुणे यांच्याकडून जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सलगरमध्ये विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन, पेन्सिल, साहित्यासह कंपास पेटी, जेवणाचा डबा यांचे वाटप झाले. 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धात्मक उपक्रमात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या जि.प. प्राथमिक मराठी शाळा सलगरमध्ये मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याची गरज ओळखून एम क्युर फार्मासिटीकल्स लि. पुणे कंपनीचे अमित जाधव, गिरीष धनवट, कौस्तुभ केंजाळे, दिगंबर सोमवंशी अधिकाऱ्यांकडे संपर्क केला तसेच त्यांची वेळोवेळी भेट घेऊन शालेय साहित्यांची मागणी केली. शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा रुपाली म्हेत्रे, सदस्य सैपन बागवान, रंजना महिंद्रकर तसेच पालक विजयकुमार फुलारी, अशोक बिराजदार यांच्या उपस्थितीत याचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन शिक्षिका हाजराबी बागवान यांनी केले. याप्रसंगी हणमंतराव गुंडरगी, हाजराबी बागवान, संध्या बशेट्टी, दिनकर भारती, सोनाली भारती, मयुरी फुलारी, समर्थ गावडे उपस्थित होते.

खरेदीपूर्व / हस्तांतरण पूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोनगिरी व ता. परंडा, जि. धाराशिव (उस्मानाबाद) येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डी. धाराशिव, सब डी. व ता. परंडा पैकी मौजे सोनगिरी येथील, ग्रामपंचायत हद्दीतील जागा याचा ग्रामपंचायत अनु. क्र. १४१ याचा मिळकत नं. ५९/१ याचे क्षेत्र १३५९.०० चौ. फ ूट याचे चौमी १२६.३० आहे, याचे मोजमाप पूर्व-पश्चिम लांबी ६६.०० फूट, दक्षिण उत्तर रुंदी २०.६ फूट., यासी चतुःसीमा :- पूर्वेस - ग्रामंचायत रस्ता, दक्षिणेस - रणजीत वेताळ यांची जागा, पश्चिमेस - ग्रामंचायत रस्ता, उत्तरेस - राणी वेताळ यांची जागा, येणे प्रमाणे चतुःसीमापूर्वक जागा, सदर जागेत १२६.३० चौ.मी. आर.सी.सी. स्वरूपाचे बांधकाम असून स्वतंत्र वीज व नळ कनेक्शन आहे. जाणेयेणेसाठी रस्ता व पाणी वागणूक जागेच्या पूर्व व पश्चिम बाजूच्या ग्रामंचायत रस्त्याने जाते व आहे. येणे प्रमाणे तदंगभूत वस्तू हक्कासह घरजागा.

सदर घरजागा ही श्री. तानाजी बापूसाहेब वेताळ यांच्या वडीलोपार्जीत मालकीची कब्जे वाहिवाटीची मिळकत असून ग्रामपंचायत मिळकत उताऱ्यास त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरची घरजागा श्री. तानाजी बापूसाहेब वेताळ त्यांच्या पत्नीच्या नावे हस्तांतरीत करू इच्छितात व ती जागा बँकेकडे तारण ठेऊन कर्ज घेऊ इच्छितात, तरी सदर घरजागा / मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही, असे गृहीत धरून मिळकत बिनबोजाची, क्लेअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत त्यांच्या पत्नीच्या नावे हस्तांतरीत करतील. खरेदी / रजी. बक्षिसपत्र अथवा तसा दस्त नोंदणी केल्यानंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व /हस्तांतरण पूर्व जाहीर नोटीस दिली. दि. १५/०७/२०२५

सही -
ॲड कुलदिप संजय क्षीरसागर,
ऑफिस ३९४५/१, भवानी पेठ. सोलापूर रोड,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली.
प्रधान कार्यालय: 404, खणभाग, सांगली 416 416 फोन: (0233) 2376236/37/38 (Scheduled Co-Op. Bank)
sublegal@sangliurbanbank.com | subsachiv@sangliurbanbank.com | www.sangliurbanbank.in

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ अन्वये अधिकार प्राप्त वसुली अधिकारी,
फोन नं.०२३३-२३७६२३६/२३७६२३७/२३७६२३८ शाखा : कुर्डूवाडी

फॉर्म 'झेड'
(पहा - नियम १०७ चा उपनियम (११(ड-१)))
स्थावर मिळकतीची जाहीर ताबा नोटीस

ज्याअर्थी वरील **बँकेचे वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नुसार** दिनांक ०५-०७-२०२२ रोजी **कर्जदार १.निता बलभिम शिंदे २. दत्ता बलभिम शिंदे ३. गणपत दत्तात्रय शिंदे ४.बलभिम दत्तात्रय शिंदे ५. कपिल बलभिम शिंदे ६. कार्तिक बळीराम पाटील ७. प्रसाद ज्ञानदेव जाधव** यांना नोटीसीत नमूद केलेली **रक्कम रु.७,८७,६१,०६३/- (अक्षरी रुपये सात कोटी सत्याऐंशी लाख ऐकसष्ठ हजार त्रेसष्ठ मात्र**) अधिक पुढील व्याज अधिक सरचार्ज दि.२८-०७-२०२२ अखेर भरणेबाबत कळविले होते. तरी सुध्दा कर्जदार **१.निता बलभिम शिंदे २. दत्ता बलभिम शिंदे ३. गणपत दत्तात्रय शिंदे ४.बलभिम दत्तात्रय शिंदे ५. कपिल बलभिम शिंदे ६. कार्तिक बळीराम पाटील ७. प्रसाद ज्ञानदेव जाधव** यांनी आजअखेर बँकेच्या मागणी नोटीसीप्रमाणे येणे रक्कम भरलेली नाही. म्हणून या नोटीसीद्वारे कर्जदार १.निता बलभिम शिंदे २. दत्ता बलभिम शिंदे ३. गणपत दत्तात्रय शिंदे ४.बलभिम दत्तात्रय शिंदे ५. कपिल बलभिम शिंदे ६. कार्तिक बळीराम पाटील ७. प्रसाद ज्ञानदेव जाधव तसेच जामीनदार श्री. बलभिम दत्तात्रय शिंदे, दत्ता बलभिम शिंदे, गोकुळ दत्तात्रय शिंदे, कपिल बलभिम शिंदे व गणपत दत्तात्रय शिंदे आणि तमाम जनतेस कळविणेत येते की, मे. हायकोर्ट मुंबई यांचे कंन्टेम्प्ट पिटीशन नं.२१८३१ /२०२५ रिटपिटीशन नंबर ४५१/२०२४ च्या आदेशान्वये खाली सही करणार कपिल बलभिम शिंदे कर्जदार व जामीनदार यांच्या वतीने तसेच कार्तिक बळीराम पाटील यांनी दि.१४-०७-२०२५ रोजी प्रत्यक्ष जागेवर हजर राहून प्रत्यक्ष कब्जा वसुली अधिकारी, सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली. यांच्या ताब्यात दिला आहे.

तरी वरील कर्जदार, जामीनदार व तमाम जनतेस कळविणेत येते की, मे. हायकोर्ट मुंबई यांचे कंन्टेम्प्ट पिटीशन नं.२१८३१ /२०२५ रिटपिटीशन नंबर ४५१/२०२४ च्या आदेशान्वये त्यांनी सदर मिळकतीबाबत बँकेचे वसुली अधिकारी यांचे लेखी परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. जर कोणी सदर मिळकतीसंबंधी कोणत्याही प्रकारे व्यवहार करतील तर अशाप्रकारे केलेल्या व्यवहाराबाबतची त्याची / तिची जबाबदारी राहील. अशाप्रकारे केलेला व्यवहार बँकेवर बंधनकारक राहणार नाही आणि **वसुली अधिकारी, सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,सांगली यांचा तारणाचा बोजा रु.९,९८,२५,१२०/- (अक्षरी रुपये नऊ कोटी आठ्यानऊ लाख पंचवीस हजार एकशे वीस मात्र**) अधिक दि.०१-०४-२०२५ पासूनचे व्याज अधिक कॉस्ट ऑफ प्रोसेस इतक्या रक्कमेसाठी तसाच पुढे कायम चालू राहील.

जप्त केलेल्या मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे ---

१. निता बलभिम शिंदे यांची मौजे दहीटणे, ता.अक्कलकोट येथील गट नं.१०/२ क्षेत्र हे.२.७ आर पो.ख.0.७६ आर
२. कार्तिक बळीराम पाटील यांची मौजे सांगवी बुद्रुक ता.अक्कलकोट येथील गट न.११३/३/ड क्षेत्र हे.१.९५ आर पो.ख.0.0९ आर
३. प्रसाद ज्ञानदेव जाधव यांची मौजे दहीटणे, ता.अक्कलकोट येथील गट नं.६/३/ब/२ क्षेत्र हे.२.00 आर पो.ख.00 आर
४. कपिल बलभिम शिंदे मौजे दहीटणे, ता.अक्कलकोट येथील गट नं. ६/२/ब क्षेत्र हे.१.८६ आर पो.ख.0.१५ आर
५. दत्ता बलभिम शिंदे मौजे दहीटणे, ता.अक्कलकोट येथील गट नं.७२/२/ब/१ क्षेत्र हे.३.११ आर पो.ख.0.३0 आर, गट नं.७४ क्षेत्र हे.२.८२ आर पो.ख.00 आर
६. गणपत दत्तात्रय शिंदे मौजे दहीटणे, ता.अक्कलकोट येथील गट नं.३८/३ क्षेत्र हे.0.९0 आर पो.ख.0.१0 आर, गट नं.५३ क्षेत्र हे 0.५८ आर पो.ख.00 आर, गट नं.५५/२ क्षेत्र हे.0.३१ आर पो.ख.0.१४ आर, गट नं.२५७/२ क्षेत्र हे.२.८0 आर पो.ख.0.४0 आर
७. बलभिम दत्तात्रय शिंदे व कपिल बलभिम शिंदे मौजे दहीटणे, ता.अक्कलकोट येथील गट नं.७२/२/ब क्षेत्र हे.३.१२ आर पो.ख.0.३0 आर, गट नं.१५/३ क्षेत्र हे.0.८७ आर पो.ख.0.00 आर, गट नं.३१/२/ब क्षेत्र हे.२.४८ आर पो.ख.0.0३ आर, गट नं.५0/४ क्षेत्र हे.0.८३ आर पो.ख.0.00 आर गट नं.५१/२ क्षेत्र हे.१.२५ आर पो.ख.0.00 आर

सही/-
दिनांक : **१४-०७-२०२५** **(एम. ए. चौगुले)**
ठिकाण : **मौजे दहीटणे व मौजे सांगवी बुद्रुक, ता. अक्कलकोट, जि, सोलापूर** **वसूली अधिकारी**
सांगली अर्बन को-ऑप.बँक लि.,सांगली

Sun Advtg.

मध्य रेल्वे
कॅसनब बोगींची पीओएच दुरुस्ती
खुली निविदा सूचना क्रमांक: केडब्ल्यूव्ही-पीओ-बोगी-POH-1
दिनांक - 10/07/2025

कामाचे नाव : सी अँड डब्ल्यू वर्कशॉप कुर्डुवाडी येथे 1 वर्षाच्या कालावधीसाठी सर्व प्रकारच्या वॅगनच्या मालवाहतूक स्टॉकच्या पीओएच कॅसनब बोगींची POH दुरुस्तीचे काम अंदाजे किंमत : रु 65,85,172/- निविदा फॉर्मची किंमत (रु.) : शून्य ईएमडी (रु.): 1,31,700/- पूर्ण कालावधी: 12 महिने. वरील ई-निविदा सादर करण्याची वेळ आणि तारीख 31/07/2025 रोजी सायंकाळी 5.30.00 वाजेपर्यंत असेल. ई-निविदेचा संपूर्ण तपशील रेल्वेच्या अधिकृत वेबसाइट http://www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे 254

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
निविदा सूचना

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम). मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहे. निविदा सूचना क्रमांक: 24-2025-SrDENC कामाचे नाव: पंढरपूर (PVR) स्थानकावर गर्दी व्यवस्थापनासाठी सर्व प्रवासी सुविधांसह होल्डिंग एरिया आणि इतर कामांच्या तरतूदींसंदर्भात कैरेज वॉटरिंग सुविधा, ड्रेनेज व्यवस्था, रिटायरिंग रूम आणि आरपीएफ पोस्टची तरतूद (भाग-2) कामाची अंदाजे किंमत: 4,86,38,579.68 रुपये बयाणा रक्कम: रु. 3,93,200.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 06 महिने देखभाल कालावधी: 12 महिने निविदा सूचना क्रमांक: 25-2025-SrDENC कामाचे नाव: ट्रॅक मशीन डेपो सोलापूरच्या नवीन शेडमध्ये 5 टन क्षमतेच्या ईओटी क्रेनचा पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वित करणे. कामाची अंदाजे किंमत: 41,13,362.00 रुपये बयाणा रक्कम: 82,300.00 काम पूर्ण करण्याचा कालावधी: 06 महिने देखभाल कालावधी: 03 महिने www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ. 06/08/2025 रोजी 15.00 पर्यंत www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ 06/08/2025 रोजी 15.30 पर्यंत. या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुध्दीकरण लक्षात घेण्यासाठी संभाव्य निविदाकारांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटवर वारंवार भेट देण्याचा सल्ला दिला जातो. वेबसाइट: www.ireps.gov.in.

सोलापूर १४/०७/२५
डीआरएम (वर्क्स), सोलापूर 50

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है

दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि पंढरपूर

प्रधान कार्यालय, नवी पेठ, पंढरपूर फोन नं. (०२१८६) २२८४५१,२२३००८

जाहीर प्रसिद्धीकरण

झेड नोटीस

स्थावर मालमत्ता जप्त करणे संबंधीची उदघोषणा नियम १०७ (११) (ड-१)

ज्या अर्थी दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि. पंढरपूर ने खालील थकबाकीदारा विरुद्ध रक्कम वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे हुकुमनामा, आदेश ॲवार्ड मिळवला आहे. कलम ९८ व १०१ (१) १०१ (२) प्रमाणे वसुली दाखला मिळवला आहे आणि थकबाकीदार यांचे निम्नलिखित स्थावर मालमत्ता विकून वसुली करण्याची विनंती केलेली आहे. यास्तव महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १५६ नियम १०७ (१०) प्रमाणे मला अप्पर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था (वित्त) महाराष्ट्र शासन पुणे यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून **श्री राहुल रमेश जाधव विशेष वसुली व विक्री अधिकारी** यांनी निम्न लिखित स्थावर मालमत्ता रक्कम वसुलीसाठी जप्त केलेली आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ९९ मधील तरतुदीनुसार दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण करण्यात आले असेल किंवा ती दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आली असेल किंवा तिच्यावर कोणताही भार ठेवण्यात किंवा निर्माण करण्यात आला असेल तर त्या सर्व गोष्टी बँकेच्या बाबतीत रद्द होतील, निरर्थक ठरतील.

अ. नं.	हुकुमनामा ॲवार्ड आदेश दाखला दिनांक	ज्याचे विरुद्ध हुकुमनामा आदेश दाखल केला आहे त्यांची नावे	येणे बाकी ३०/०६/२०२५ मु. + व्याज + दं.व्याज + को. खर्च + नो फी + सरचार्ज	गावाचे नांव	सिटी सर्वे नंबर/ गट नंबर	क्षेत्रफळ हे. आर/चौ.मी.
१	१०१/२०९५/ २०२२-२३ ०६/१०/२०२३ ७११८/९६	१) सुवर्णा सदानंद घोडके २) हरी सदाशिव घोडके ३) सदानंद हरी घोडके ४) मारुती नारायण जाधव	२०,६०,२४६/	मौजे कुरुल ता. मोहोळ मौजे. कुरूल	सि स नं -१०९९ गट नं-७०५/१/अ	७९.३० चौमी ० हे ८४ आर चौमी
२	१०१/५६७/ २०२३-२४ १६/०२/२०२४ ७३९८/३७०	१) विलास भीमराव माने २) प्रवीण भीमराव माने ३) दत्तात्रय अरुणपवार	४,७६,६३९/-	मौजे सौंदणे, ता. मोहोळ मौजे सौंदणे, ता मोहोळ मौजे सौंदणे, ता मोहोळ मौजे तांबोळे, ता. मोहोळ	गट नं-२९०/१/अ गट नं-२९२/१/अ गट नं-२९०/१/ब गट नं २०८	० हे ७० अर चौमी ० हे ७० अर चौमी १ हे ६९ आर चौमी ० हे ८६ आर चौमी
३	१०१/५६६/ २०२ ३-२४ १६/०२/२०२४ ७३९८/३९०	१) विशाल मधुकर जाधव २) लतिका मधुकर जाधव ३) मधुकर रामचंद्र जाधव	५६,७११/-	मौजे कुरुल, ता. मोहोळ मौजे कुरुल, ता. मोहोळ मौजे कुरुल, ता, मोहोळ मौजे कुरुल, ता, मोहोळ मौजे कुरुल, ता, मोहोळ	गट नं-१९९ गट नं-१९४/१/ब गट नं -१९२/१/अ गट नं -१९२/१/अ गट नं -१९२/१/ब	१ हे ०१ आर चौमी ० हे ६० आर चौमी १ हे ६२ आर चौमी ० हे ८४ आर चौमी २ हे ६३ आर चौमी
४	१०१/४८९/ २०२२-२३ १२/१२/२०२२ ७३९८/२११	१) प्रशांत प्रल्हाद सुतकर २) प्रमोद प्रल्हाद सुतकर ३) ब्राबृवानसिताराम सुतकर	३१,४०४/-	मौजे मोहोळ, ता. मोहोळ मौजे मोहोळ, ता. मोहोळ मौजे शेजबाभूळगाव, ता. मोहोळ	गट नं-१४७ गट नं-१४७ गट नं १६०/२/ब	१ हे ५७ आर चौमी पैकी त्यांचा हिश्यावर १ हे ५७ आर चौमी पैकी त्यांचा हिश्यावर ० हे ४१ आर चौमी
५	१०१/४९७/ २०२२-२३ १२/१२/२०२२ ७३३९८/२१२	१) प्रमोद प्रल्हाद सुतकर २) प्रशांत प्रल्हाद सुतकर ३) बब्रुवान सीताराम सुतकर	३२,८९०/-	मौजे सौंदाने, ता. मोहोळ मौजे सौंदाने, ता. मोहोळ मौजे शेजबाभूळगाव ता. मोहोळ	गट नं-१४७ गट नं-१४७ गट नं-१६०/२/ब	१ हे ५७ आर पैकी ० हे ३३ आर हिश्यावर १ हे५७ आर पैकी हे ३२ आर हिश्यावर ० हे ४१ आर चौमी पैकी त्यांचा हिश्यावर
६	१०१/५००/ २०२ २-२३ १२/१२/२०२२ ७३९८/१९१	१) नागनाथ सखाराम आठवले २) प्रमोद आण्णासाहेब आठवले ३) प्रकाश संभाजी बचुटे	१,६६,५७७/-	मौजे, वदडेगाव, ता. मोहोळ मौजे, वदडेगाव, ता. मोहोळ मौजे. औंढी, ता. मोहोळ	गट नं-७५/१/क गट नं -१४ गट नं-२२/२	०१ हे ५० आर चौमी पैकी त्यांच्या हिश्यावर १० हे ३९ आर चौमी पैकी त्यांच्या हिश्यावर २ हव ८० आर चौमी पैकी त्यांच्या हिश्यावर
७	१०१/५३१/ २०२२-२३ १२/१०/२०२३ ७३९८/२२	१) श्रीनिवास भैरु माने २) धनाजी राजाराम इंगळे ३) राजाराम नारायण माने ४) विजयराजाराम माने	१,५९,६६७/-	मौजे. अंकोली, ता. मोहोळ मौजे. शेजबाभूळगाव, ता. मोहोळ मौजे. शेजबाभूळगाव, ता. मोहोळ	गट नं ४२५/१/ड गट नं-१९२/१ गट नं-१८२/१	१ हे ६० आर चौमी १ हे ९९ आर चौमी १३ हे २२ आर चौमी पैकी त्यांच्या हिश्यावर
८	१०१/५०१/ २०२ २-२३ १२/१२/२०२२ ७३९८/१९०	१) प्रमोद आण्णा आठवले २) प्रकाश संभाजी बचुटे ३) तानाजी ज्ञानोबा सुरवसे	२,३०,६७१/-	मौजे. वडदेगाव, ता. मोहोळ मौजे. औंढी, ता. मोहोळ मौजे. वडदेगाव, ता. मोहोळ	गट नं-१७/१ गट नं - १४/५ गट नं-२२/२ गट नं ८७/१/ब/२	० हे ८१ आरचौमी पैकी त्यांच्या हिश्यावर १ हे ०० आर्त चौमी पैकी त्यांच्या हिश्यावर २ हे ८० आर चौमी पैकी त्यांच्या हिश्यावर १ हे ५९ आर चौमी पैकी त्यांच्या हिश्यावर
९	१०१/५६५/ २०२३-२४ १६/०२/२०२४ ७३९८-३४८	१) श्री शंकर पांडुरंग पडवळकर २) श्री महदेव पांडुरंग पडवळकर ३) श्री हनमंत आप्पाराव सलगर	२,४२,८४१/-	मौजे. औंढी, ता. मोहोळ मौजे. औंढी, ता. मोहोळ मौजे परमेश्वर पिंपरी ता. मोहोळ	गट नं - ७७ गट नं-५८/२ गट नं-२५/१/ड गट नं-२५/१/क गट नं-४४/३/ब/२ गट नं-५०/०१/अ	३ हे ४५ आर चौमी २ हे ०२ आर चौमी पैकी त्यांच्या हिश्यावर १ हे ०४ आर चौमी ० हे ३४ आर चौमी ०हे ५७ आर चौमी ० हे ६४ आर चौमी पैकी त्यांच्या हिश्यावर
१०	१०१/४९०/ २०२२-२३ १२/१२/२०२२ ७३९८/२२०	१) श्री सुकुमार सुभाष वाघमोडे २) श्री सुभाष निवृत्ती वाघमोडे ३) श्री प्रवीण भिमराव माने	६,३९,२५१/-	मौजे तांबोळे, ता. मोहोळ मौजे तांबोळे, ता. मोहोळ मौजे सौंदणे, ता. मोहोळ	गट नं-४८८ गट नं-४९२ गट नं-२९०/१/ब	३ हे ६९ आर चौमी २ हे १२ आर चौमी १ हे ६९ आर चौमी
११	१०१/

महत्त्वाचे

इंग्लंड, न्यूझीलंडविरुद्ध भारत सराव सामने खेळणार

दुबई : यावर्षी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये भारत आणि श्रीलंकेने संयुक्तपणे आयोजित केलेल्या महिला एकदिवसीय विश्वचषकापूर्वी भारत बंगळुरूमध्ये इंग्लंड आणि न्यूझीलंडविरुद्ध सराव सामने खेळणार आहे. पाकिस्तान त्यांचे सराव सामने आणि विश्वचषक सामने श्रीलंकेत खेळेल. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि पाकिस्तान क्रिकेट मंडळ यांनी परस्पर संमतीने हा निर्णय घेतला आहे. २५ सप्टेंबर रोजी बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्स ए मैदानावर भारताचा पहिला सराव सामना इंग्लंडविरुद्ध होईल आणि ३० सप्टेंबर रोजी चिन्नास्वामी स्टेडियमवर स्पर्धा सुरू होण्याच्या तीन दिवस आधी २७ सप्टेंबर रोजी त्याच ठिकाणी न्यूझीलंडविरुद्ध खेळेल. २५ आणि २८ सप्टेंबर रोजी कोलंबो येथील कोलंबो क्रिकेट क्लब येथे पाकिस्तान अनुक्रमे श्रीलंका आणि श्रीलंका अ संघाविरुद्ध सराव सामने खेळेल. २५ ते २८ सप्टेंबर दरम्यान एम चिन्नास्वामी स्टेडियम, बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स आय ग्राऊंड (दोन्ही बंगळुरू), आर प्रेमदासा स्टेडियम आणि कोलंबो क्रिकेट क्लब (दोन्ही कोलंबो) येथे एकूण नऊ डे-नाईट सामने खेळले जातील, असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने मंगळवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे. ■

हरिका, वैशाली उप-उपांत्य पूर्वमध्ये

बटुमी (जॉर्जिया) : भारतीय ग्रॅण्डमास्टर्स डी. हरिका आणि आर. वैशाली यांनी सोमवारी येथे झालेल्या फिडे जागतिक महिला बुद्धिबळ चषकाच्या टाय-ब्रेकरमध्ये अनुक्रमे ग्रीसच्या त्सोलाकिडो स्टॅव्होला आणि अमेरिकेच्या कॅरिसा यिपचा पराभव करून उप-उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला. हरिकाने टाय-ब्रेक गेमच्या दुसऱ्या सेटमध्ये स्टॅव्होलाचे आव्हान संपवले तर वैशालीने सर्वोत्तम कामगिरी करत पहिल्या सेटमध्येच यिपचा पराभव केला. कोनेरू हम्पी आणि दिव्या देशमुख यांनी आधीच अंतिम १६ मध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे अंतिम १६ मध्ये चार भारतीय खेळाडू आहेत. ग्रॅण्डमास्टर वंतिका ग्रेवाल मात्र रशियाच्या कॅटेरिना लॅग्नोकडून पराभूत झाल्यानंतर बाहेर पडली. तिने खूप संयम दाखवला परंतु लॅग्नोचा अनुभव भारी पडला. या स्पर्धेतील विजेत्याला ५०,००० अमेरिकन डॉलर्सची बक्षीस रक्कम मिळेल. याशिवाय, पहिल्या तीनमधील खेळाडू पुढील उमेदवार स्पर्धेसाठी पात्र ठरतील.

पंजाब एफसीचा डिफेंडर बिजॉय वर्गीसशी करार

मोहाली : पंजाब एफसीने मंगळवारी इंडियन सुपर लीग (आयएसएल) फुटबॉल स्पर्धेच्या आगामी हंगामासाठी इंटर काशीकडून डिफेंडर बिजॉय वर्गीसशी करार करण्याची घोषणा केली. पंचवीस वर्षीय सेंटर बॅक बिजॉयने २०२८ पर्यंत संघासोबत करार केला आहे. बिजॉय २०२१-२२ हंगामात केरळ ब्लास्टर्समध्ये सामील झाला आणि त्या वर्षी उपविजेता राहिलेल्या संघाचा भाग होता. त्यानंतर तो २०२३-२४ हंगामासाठी आय-लीग फ्रँचायझी इंटर काशीमध्ये सामील झाला आणि २०२४-२५ हंगामात १० सामने खेळला. बिजॉय म्हणाला, पंजाब एफसीमध्ये सामील होण्यास मी खूप उत्सुक आहे आणि माझ्या कारकीर्दीच्या या नवीन अध्यायाची मी उत्सुकतेने वाट पाहत आहे. क्लबमध्ये डिफेंडर लाईनमध्ये स्थान मिळविण्यासाठी कठीण स्पर्धा आहे जी माझ्या विकासासाठी उत्तम आहे आणि ती मला दररोज माझे सर्वोत्तम देण्यास प्रेरित करेल.

वेस्ट इंडीजसाठी लॉईड, रिचर्ड्स आणि लारा आमंत्रित

किंग्स्टन (जमैका) : क्रिकेट वेस्ट इंडिजने मंगळवारी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत ०-३ असा पराभव झाल्यानंतर कॅरिबियन देशांमध्ये क्रिकेट पुनरुज्जीवित करण्याच्या मार्गांवर चर्चा मजबूत करण्यासाठी माजी महान खेळाडू क्लाईव्ह लॉईड, व्हिव्हियन रिचर्ड्स आणि ब्रायन लारा यांना आमंत्रित केले आहे. ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या कसोटीत वेस्ट इंडीजला २७ धावांत गुंडाळले. जी मिशेल स्टार्क (नऊ धावांत सहा बळी) आणि स्कॉट बोलँडच्या हॅटट्रिकमुळे कसोटी क्रिकेटमधील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत कमी धावसंख्या आहे. चुकीच्या क्षेत्ररक्षणामुळे वेस्ट इंडीजचा संघ आतापर्यंतच्या सर्वांत कमी धावसंख्येची बरोबरी करण्यापासून वाचला. सबिना पार्क येथे झालेल्या दिवस-रात्र कसोटीत यजमानांना बाद करण्यासाठी ऑस्ट्रेलियाला फक्त १४.३ षटके हवी होती. अध्यक्ष किशोर शैलो यांनी एका निवेदनात म्हटले आहे की, चर्चा मजबूत करण्यासाठी, मी आमचे तीन महान फलंदाज सर क्लाईव्ह लॉईड, सर व्हिव्हियन रिचर्ड्स आणि ब्रायन लारा यांना आमंत्रित केले आहे. ते म्हणाले, ते माजी दिग्गज डॉ. शिवनारायण चंद्रपॉल, डॉ. द मोस्ट ऑनरेबल डेसमंड हेन्स, इयान ब्रॅडशॉ यांच्यासोबत सामील होतील जे आधीच समितीचा भाग आहेत. शैलो म्हणाले, ही बैठक औपचारिकता नाही. हे असे लोक आहेत ज्यांनी आपला सुवर्णकाळ परिभाषित करण्यास मदत केली आहे आणि त्यांचे विचार आपल्या क्रिकेट विकासाच्या पुढील टप्प्याला आकार देण्यासाठी अमूल्य असतील. या बैठकीतून ठोस आणि अंमलबजावणीयोग्य सूचना येतील असा आमचा हेतू आहे. वेस्ट इंडीजसाठी गोलंदाजी ही चिंताजनक बाब नाही परंतु फलंदाजी विभागात सुधारणा आवश्यक आहे. ■

विजयी लय कायम राखणार महिला संघ

आज भारत-इंग्लंड पहिला एकदिवसीय सामना

◆ **साउथॅम्प्टन, १५ जुलै**

इंग्लंडविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील ऐतिहासिक विजयानंतर, आत्मविश्वासाने भरलेला भारतीय महिला संघ बुधवारपासून येथे सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतही हीच लय कायम ठेवण्याच्या उद्देशाने मैदानात उतरेल.

भारतीय संघाने टी-२० मालिका ३-२ अशी जिंकून नवा इतिहास रचला. खेळाच्या सर्वांत लहान स्वरूपात इंग्लंडविरुद्ध भारताने मालिका जिंकण्याची ही पहिलीच वेळ होती.

या वर्षाच्या अखेरीस भारतात एकदिवसीय विश्वचषक खेळला जाणार आहे आणि त्या दृष्टीने हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघ ५० षटकांच्या स्वरूपातही आपली कामगिरी सुधारू इच्छितो. भारताने मे महिन्यात श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या तिरंगी मालिकेत शेवटचा एकदिवसीय सामना जिंकला. इंग्लंडविरुद्ध मालिका जिंकल्याने विश्वचषकापूर्वी भारतीय संघाचे मनोबल आणखी उंचावेल.

अलिकडच्या वर्षांत भारताने आपला दृष्टिकोन बदलला आहे आणि ३०० पेक्षा जास्त धावा करण्यावर अधिक भर दिला आहे. तिरंगी मालिकेत भारताने २७६, २७५, ३३७ आणि ३४२ धावा केल्या.

कर्णधार हरमनप्रीत म्हणाली, गेल्या काही वर्षांत आम्ही खेळलेल्या एकदिवसीय सामन्यांमध्ये ३०० पेक्षा जास्त धावा करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे आमच्या गोलंदाजांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

हरमनप्रीत कौर, नॅट सायव्हर-ब्रंट

सलामीवीर प्रतिका रावलला पुन्हा एकदा अनुभवी शेफाली वर्मापेक्षा प्राधान्य देण्यात आले आहे. रावलने तिरंगी मालिकेतील तिच्या कामगिरीने प्रभावित केले जिथे तिने महिला एकदिवसीय सामन्यात सर्वांत जलद ५०० धावा करणारी फलंदाज बनून विक्रम नोंदवला.

कर्णधार हरमनप्रीत कौर, उपकर्णधार स्मृती मंधाना, फिनिशर ऋचा घोष आणि विश्वासार्ह जेमिमा रॉड्रिग्ज आणि हरलीन देओल सारख्या मजबूत फलंदाजांच्या उपस्थितीत भारताची टॉप आणि मिडल ऑर्डर मजबूत दिसते.

दरम्यान, इंग्लंड संघाचे दोन प्रमुख खेळाडू परतल्याने संघ अधिक मजबूत होईल. दुखापतीतून सावरल्यानंतर कर्णधार नॅट सायव्हर-ब्रंट पुन्हा संघाची जबाबदारी स्वीकारेल. जगातील नंबर वन वनडे गोलंदाज सोफी एक्लेस्टोन देखील गुडघ्याच्या दुखापतीमुळे बराच काळ बाहेर राहिल्यानंतर पुनरागमन करत आहे. हा सामना साउथॅम्प्टन येथील द एजिअस बाऊल मैदानावर भारतीय वेळेनुसार सायंकाळी ५.३० वाजता सुरू होईल. ◀(वृत्तसंस्था)

प्रतिस्पर्धी संघ

भारत : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), प्रतिका रावल, हरलीन देओल, जेमिमा रॉड्रिग्ज, ऋचा घोष (यष्टिरक्षक), यास्तिका भाटिया (यष्टिरक्षक), तेजल हसबनीस, दीप्ती शर्मा, स्नेह राणा, श्री चरणी, शुची उपाध्याय, अमनजोत कौर, अरुंधती रेड्डी, क्रांती गौड, सायली सातघरे.

इंग्लंड : नॅट सायव्हर-ब्रंट (कर्णधार), एम अलॉट, टॅमी ब्यूमोंट, लॉरेन बेल, माया बाउचियर, एलिस कॅप्सी, केट क्रॉस, एलिस डेव्हिडसन-रिचर्ड्स, चार्ली डीन, सोफिया डंकले, सोफी एक्लेस्टोन, लॉरेन फाइलर, एमी जोन्स, एम्मा लॅम्ब, लिन्सी स्मिथ. ■

ऋषभ पंत मँचेस्टर कसोटी खेळेल; कर्णधार शुभमन गिलचा विश्वास

◆ **लंडन, १५ जुलै**

यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंत मँचेस्टरमधील चौथ्या कसोटीत खेळण्यासाठी सज्ज राहील. त्याच्या बोटात कोणतीही मोठी दुखापत दिसून आली नाही, तो पूर्णपणे तंदुरुस्त आहे, असा विश्वास भारतीय कर्णधार शुभमन गिलने सोमवारी व्यक्त केला.

इंग्लंडविरुद्ध नुकत्याच संपलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी दुसऱ्या सत्रात डाव्या तर्जनीला दुखापत झाल्यानंतर पंतला मैदान सोडावे लागले. सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत गिल म्हणाला, पंत स्कॅनसाठी गेला होता. कोणतीही मोठी दुखापत नाही म्हणून तो मँचेस्टरमधील चौथ्या कसोटीसाठी सज्ज असेल.

नऊ दिवसांच्या अंतरानंतर सुरू होणाऱ्या पुढील कसोटीसाठी जसप्रीत बुमराह उपलब्ध असेल की नाही हे देखील गिलने स्पष्ट केले नाही. इंग्लंडच्या डावाच्या ३४ व्या षटकात जसप्रीत बुमराहच्या चेंडूवर डाव्या बाजूला डायव्हिंग केल्यानंतर पंतला वेदना होत होत्या. त्यानंतर त्याने यष्टिरक्षण केले नाही. ध्रुव जुरेलने त्याच्या जागी यष्टिरक्षण केले

तथापि, भारताच्या दुसऱ्या डावात फलंदाजी करताना पंत आरामदायी दिसत नव्हता. तो नऊ धावा करून बाद झाला. पाच सामन्यांच्या मालिकेत इंग्लंड २-१ ने आघाडीवर आहे आणि चौथा कसोटी सामना २३ जुलैपासून खेळला जाईल. ◀(वृत्तसंस्था)

भारतीय खेळाडूंसाठी भूमिकांमध्ये स्पष्टता महत्त्वाची

हरमनप्रीत कौरचे मत

◆ **लंडन, १५ जुलै**

यावर्षी भारतात होणाऱ्या महिला एकदिवसीय विश्वचषकाच्या पृष्ठभूमीवर, कर्णधार हरमनप्रीत कौरने सोमवारी संघाच्या खेळाडूंसाठी भूमिकांमध्ये स्पष्टता महत्त्वाची असल्याचे अधोरेखित केले.

इंग्लंडमध्ये पहिली टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका (३-२) जिंकल्यानंतर, भारत आता बुधवारपासून साऊथॅम्प्टनमध्ये सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी सज्ज आहे. विश्वचषकाची तयारी करण्यासाठी दोन्ही संघांसाठी ही मालिका खूप महत्त्वाची आहे.

हरमनप्रीतने येथे माध्यमांना सांगितले की, कर्णधार म्हणून हे खूप रोमांचक असणार आहे. आम्ही गेल्या वेळी (२०१३ मध्ये) येथे खेळलो होतो तेव्हा मला वाटते की महिला क्रिकेट इतके लोकप्रिय नव्हते. तथापि, आम्ही आता आमचा स्तर उंचावला आहे आणि आता आमच्याकडे ज्या प्रकारच्या चाहत्यांच्या संख्येमुळे, आम्हाला वाटते की ते खूप रोमांचक होणार आहे.

हरमनप्रीत म्हणाली, जर मी गेल्या दोन-तीन वर्षांबद्दल बोलले तर, आता सर्व काही व्यवस्थित आहे. प्रत्येकाला त्यांच्या भूमिकेबद्दल माहिती आहे. मला माझी भूमिका माहीत आहे. आता संघात पूर्वीपेक्षा खूप स्पष्टता आहे. एक संघ म्हणून आणि एक खेळाडू म्हणून, हे खूप महत्त्वाचे आहे. जेव्हा तुम्ही देशासाठी खेळत असता तेव्हा तुम्हाला नेहमीच तुमच्या भूमिकेत स्पष्टता हवी असते. मला वाटते की सर्व श्रेय आमच्या संघाला आणि सपोर्ट स्टाफला जाते.

भारताकडे आता अंतिम अकराची निवड करण्यासाठी बरेच पर्याय आहेत आणि ही संघासाठी एक सुखद परिस्थिती आहे. बऱ्याच काळानंतर ही चांगली गोष्ट आहे की प्रत्येकजण चांगली कामगिरी करत आहे. आम्हाला सर्वोत्तम संघ निवडण्याचा पर्याय मिळत आहे. पूर्वी आमच्याकडे इतके पर्याय नव्हते. याचे श्रेय प्रतिका रावल आणि शेफाली वर्मा यांनाही जाते. दोघीही उत्तम कामगिरी करत आहेत, असे गौरवोद्गार हरमनप्रीतने काढले. ◀(वृत्तसंस्था)

मंगळवारी लंडनमधील क्लेरेन्स हाऊस येथे किंग चार्ल्स तिसरे यांच्यासोबत झालेल्या भेटीदरम्यान भारतीय पुरुष आणि महिला क्रिकेट संघाचे सदस्य.

जपान ओपन बॅडमिंटनमधून ऋतुपर्णा-श्वेतापर्णा जोडी बाहेर

◆ **टोकियो, १५ जुलै**

मंगळवारी जपान ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिल्या फेरीत भारतीय महिला जोडी ऋतुपर्णा पांडा आणि श्वेतापर्णा पांडा यांना कोकोना इशिकावा आणि मायको कावाझोई यांच्याकडून सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला.

जागतिक क्रमवारीत ३९ व्या क्रमांकावर असलेली भारतीय जोडी जपानी जोडीला कोणतेही आव्हान देऊ शकली नाही. इशिकावा आणि कावाझोई यांनी सुरुवातीपासूनच सामन्यावर वर्चस्व गाजवले आणि फक्त ३२ मिनिटांत २१-१३, २१-७ असा एकतर्फी विजय मिळवला. दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू, लक्ष्य सेन आणि पुरुष दुहेरीत सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी बुधवारी त्यांच्या मोहिमेला सुरुवात करतील. ◀(वृत्तसंस्था)

गिल नेहमीसारखा तांत्रिकदृष्ट्या मजबूत नव्हता : मायकेल वॉन

◆ **लंडन, १५ जुलै**

जेव्हा भारतीय कर्णधार शुभमन गिल तिसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी आला तेव्हा तो तांत्रिकदृष्ट्या मजबूत दिसत नव्हता आणि त्याच्यात संयमाचीही कमतरता होती, असे इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉन म्हणाला.

गिलने मालिकेतील पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये शानदार कामगिरी केली. त्याने हेडिंग्ले येथील पहिल्या कसोटीत शतक झळकावले आणि नंतर बर्मिंगहॅममध्ये शतक आणि द्विशतक झळकावून अनेक विक्रम मोडले. त्याच्या शानदार फलंदाजीमुळे भारताने हा सामना ३३६ धावांनी जिंकला.

तथापि, लॉर्ड्स कसोटीत तो फक्त १६ आणि सहा धावा करू शकला, ज्यामध्ये अष्टपैलू रवींद्र जडेजा आणि तळातली उत्कृष्ट कामगिरी असूनही भारताचा २२ धावांनी पराभव झाला.

वॉन म्हणाला की, जेव्हा तिसऱ्या दिवशी सामन्यात स्पर्धा शिगेला पोहोचली तेव्हा मला वाटले की यामुळे इंग्लंड संघ उर्वरित सामन्यात सर्वोत्तम कामगिरी करू शकेल. चौथ्या दिवशी शुभमन गिल फलंदाजीसाठी आला तेव्हा तो तांत्रिकदृष्ट्या मजबूत दिसत नव्हता आणि त्याच्यात संयमाचीही कमतरता होती, परंतु सोमवारी या रोमांचक कसोटी सामन्यात त्याच्या संघाने जोरदार झुंज दिली.

इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सचे कौतुक करताना तो म्हणाला की यजमान संघाचा रोमांचक विजय कर्णधाराच्या विजयी मानसिकतेवर आधारित होता, जो संपूर्ण संघात दिसून येत होता. ◀(वृत्तसंस्था)

एशियन चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धेत आश्लेषा बागडेला ब्राँझ

भाजप महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल-कोलते यांच्या हस्ते सत्कार

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि. १५ जुलै-

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची कुस्तीपट्टू आश्लेषा कल्याण बागडे हिने कजाकिस्तान येथे झालेल्या एशियन चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धेत ब्राँझ पदक मिळवले. यशवंत परिवाराच्या वतीने आश्लेषाचा भाजप महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्ष रश्मी दीदी बागल-कोलते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील हे होते. यावेळी विचारपीठावर विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, मिलिंद फंड, डॉ. अनिल साळुंखे, संभाजीराव किर्दाक, कल्याण बागडे व सत्कारमूर्ती आश्लेषा बागडे हे उपस्थित होते.

यावेळी बागल म्हणाल्या, आश्लेषा बागडेने कुस्ती स्पर्धेत मिळवलेले यश कौतुकास्पद असे आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनी कुस्ती स्पर्धेत यश मिळवू शकते हे तिने दाखवून दिले. यावेळी रश्मी दीदी बागल-कोलते यांनी आश्लेषास प्रोत्साहनपर दिगंबरराव बागल प्रतिष्ठानच्या वतीने ५१हजार रुपये देण्यात आले. याप्रसंगी यशवंत या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाच्या वार्षिक अंक स्पर्धेत ललित गद्यात्म विभागात हिंदी विभागाचा विद्यार्थी अमित सरवदे यास तृतीय क्रमांक मिळाला याबद्दल महाविद्यालयाच्यावतीने त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. राम काळे यांनी केले. सूत्रसंचालन मुक्ता काटवटे यांनी केले. प्रा. नितीन तळपाडे यांनी आभार मानले.

ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे पुनरागमन

लॉस एंजेलिस : ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे पुनरागमन आता निश्चित झाले आहे. त्याचे वेळापत्रकही जाहीर झाले आहे. २०२८ मध्ये अमेरिकेतील लॉस एंजेलिस शहरात होणाऱ्या ऑलिम्पिक सामन्यांमध्ये, पोमोना शहरातील फेअरग्राऊंड्स स्टेडियमवर क्रिकेट सामना खेळला जाईल. हे शहर लॉस एंजेलिसपासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर आहे. हे सामने १२ जुलैपासून सुरू होतील, तर पदकांचे सामने २० आणि २९ जुलै रोजी खेळले जातील. पुरुष आणि महिला दोन्ही गटात एकूण ६-६ संघ सहभागी होतील.

सदानंद मोहोळ संघ देवधर चषकाचा मानकरी

तिसऱ्या फेरीचे दोन्ही सामने अनिर्णित

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम आणि दयानंद कॉलेज मैदानावर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित आणि सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या सौजन्याने झालेल्या डी.बी.देवधर चषकाचा मानकरी सदानंद मोहोळ इलेव्हन संघ ठरला.

पारितोषिक वितरण जिल्हा क्रिकेट संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश भुतडा यांच्या हस्ते व एमसीए वरिष्ठ गट निवड समिती प्रमुख अक्षय दरेकर, सदस्य रोहित जाधव, सलील आगरकर, सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु, राजेंद्र गोटे आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.

तिसऱ्या दिवशी इंदिरा गांधी पार्क स्टेडियम वर सदानंद मोहोळ संघाने कालच्या २ बाद २० वरून डाव पुढे सुरू केल्यावर जेवणाला खेळ थांबला

तोपर्यंत ४ बाद ११० (२८ षटके) धावा केल्या, त्यात यश क्षीरसागर ने संयमी अर्धशतक लगावले तर सचिन धस सोबत ५५ धावांची भागीदारी केली आणि सचिन नंतर मेहुल बाद झाला आणि त्यानंतर पुन्हा खेळ झाला नाही व सामना अनिर्णित अवस्थेत संपला. पहिल्या डावाच्या आघाडीवर हेमंत कानिटकर संघ विजयी ठरला. तर दयानंद कॉलेजच्या मैदानावर कालच्या ८ बाद १५० वरून पुढे खेळताना सदू शिंदे संघ १९३ पर्यंतच मजल मारू शकला, २४१ धावांची आघाडी मिळवत वसंत रांजणे संघाने पुन्हा फलंदाजी करत लंच पर्यंत ११ षटकात ५७ धावा केल्या आणि चहापानाला खेळ थांबला तेव्हा ३ बाद १६८ धावा केल्या होत्या त्यात सलामीला ८० धावा करताना अनिरुद्ध साबळे ने पुन्हा अर्धशतक लगावले आणि ३ रा गडी किरण बाद होई पर्यंत चोरमलेने जय पांडे सोबत ६४ धावांची भागीदारी केली, त्यापुढे खेळ होऊ शकला नाही आणि सामना अनिर्णित अवस्थेत संपला व पहिल्या डावाच्या आघाडीवर वसंत रांजणे इलेव्हन संघ विजयी ठरला.

संक्षिप्त धावफलक

इंदिरा गांधी पार्क स्टेडियम

- **सदानंद मोहोळ संघ:** सर्व बाद २६२.
- **हेमंत कानिटकर संघ:** सर्वबाद २७७.
- **सदानंद मोहोळ संघ :** २८ षटकांत ४ बाद ११० (यश क्षीरसागर नाबाद ५३, सचिन धस २५, मेहुल पटेल १६. अर्शिन कुलकर्णी २९/२ बळी, आयुष बिरादार व जगदीश झोपे प्रत्येकी १ बळी).

दयानंद कॉलेज ग्राउंड

- **वसंत रांजणे संघ :** ९ बाद ४३४.
- **सदू शिंदे संघ:** १९३/१० (अभिनव तिवारी नाबाद ५१, अक्षय वाईकर ३१. प्रदीप दाढे ३५/३ बळी, तनय संघवी ३४/२ बळी, ओमकार मोहिते २३/३ बळी, शमशुझमा काझी ४१/२ बळी.
- **वसंत रांजणे संघ:** १६८/३(३१.३) अनिरुद्ध साबळे ५०, जय पांडे नाबाद ५६, किरण चोरमले ४७, हर्षल काटे १४, अक्षय वाईकर ४०/२ बळी, निमिर जोशी १ बळी.

मेहता शाळेत २७ जुलैला जिल्हा योगासन स्पर्धा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन, जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि जिल्हा योग परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा योगासन स्पर्धा २६ व २७ जुलै रोजी जुळे सोलापूर येथील वि. मो. मेहता माध्यमिक शाळेत आयोजित केल्याची माहिती स्नेहल पेंडसे यांनी दिली.

ही स्पर्धा सब ज्युनिअर (१० ते १४ वर्षे), ज्युनियर (१४ ते १८ वर्षे), सीनियर (१८ ते २८ वर्षे), सीनियर ए गट (२८ ते ३५ वर्षे), सीनियर बी गट (३५ ते ४५ वर्षे), सीनियर सी गट (४५ ते ५५ वर्षे) या वयोगटांमध्ये होणार आहे.

आर्टिस्टिक योगासन सिंगल, आर्टिस्टिक योगासन पेयर, रिदमिक योगासन पेयर अशा स्पर्धा घेण्यात येणार आहेत. ट्रॅडिशनल इव्हेंट, कलात्मक एकल, कलात्मक युगल, तालात्मक युगल, फॉरवर्ड बेंड, बॅक बेंड, हॅन्ड बॅलेन्स, लेग बॅलन्स, ट्विस्टिंग बॉडी, स्पाइन पोश्चर अशा प्रकारात या स्पर्धा होतील. स्पर्धेसाठी खेळाडूंनी आधार कार्डची छायांकित प्रत, वयाचा पुरावा, डॉक्टर फिटनेस प्रमाणपत्र, पासपोर्ट आकारातील छायाचित्र, जोखीम प्रमाणपत्र सादर करायचे आहे. नोंदणीसाठी भावना गुंफेकर (८३९०९६५५४५), रोहन घाडगे (८६०५१७१७१३) अथवा चारुलता कुलकर्णी (९४२०४९०९८४) यांच्याशी संपर्क साधावा.

महत्वाचे...

अक्कलकोट तालुक्यात ५८ गावे महिलांच्या हाती; ११८ ग्रा.पं.ची आरक्षण सोडत जाहीर

अक्कलकोट, दि १५ जुलै-

अक्कलकोट तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण मंगळवारी तहसिलदार विनायक मगर यांनी जाहिर केले. तब्बल ५८ ग्राम पंचायतीचे सरपंचपद महिलांसाठी राखीव आहे. यासह ३४ खुल्या प्रवर्गातही महिला लढू शकतात. यामुळे तालुक्यात महिला सरपंचाच्या ताब्यात बहुतांश ग्रामपंचायतीचा कारभार असणार आहे. तालुक्यातील ११८ ग्रामपंचातपैकी अनुसुचित जाती सरपंच आरक्षण १५ असुन यामध्ये गांधीनगर पितापूर, कुरनुर, नागनाळी, जकापुर, सिंदखेड, शिरवळवाडी ७ महिलासाठी राखीव आहेत. अनुसुचित जमाती सरपंच पदासाठी ३ ग्रामपंचायती राखीव असून यामध्ये हसापुर, हालहळी, महिला राखीव देवीकवठा ग्रामपंचायत सरपंच पदासाठी आरक्षित झाले आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी ३२ ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण सोडत निघाले आहे. यामध्ये गळोरगी, बनजगोळ, कुमठे, संगोगी आ, साफळे, निमगाव कलहिप्परगे, अरळी, नागोरे, संगोगी ब, चप्पळगाववाडी, नावदगी, डोंबरजवळगे, गोगाव, सिन्नुर, हालचिंचोळी या १६ ग्रामपंचायत नामा प्रवर्ग महिलासाठी आहेत. ना.मा. प्र. मध्ये खैराट, चिकेळी, आंदेवाडी ज, बादोले ब्रु ।, नन्हेगाव, हंजगी, कंठेहिळळी, बोरोटी खु, बोरगाव दे, भुरीकवठा, सलगर, गौडगाव बु, कडबगाव, दहिटणेवाडी, कोर्सेगाव, दोडयाळ. सर्वसाधारण साठी ३४ ग्रामपंचायत सरपंच आरक्षित आहेत यामध्येही महिला सरपंच पदासाठी महिला भाग्य आजमावू शकततात. तालुक्यात ११८ ग्रामपंचायत पैकी बहुतांश ग्रामपंचायत कारभार महिला कारभाऱ्यांकडे असणार आहे.

डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या मुंबई महानगर कार्याध्यक्षपदी शशिकांत देशमुख

सांगोला, दि.१५ जुलै-

डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्राच्या मुंबई महानगर कार्याध्यक्षपदी मूळचे जवळा, (ता.सांगोला) येथील शशिकांत देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कल्याण येथील विशेष कार्यक्रमात संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, मुंबई अध्यक्ष संजय भैरे व राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक नलावडे यांच्या हस्ते देशमुख यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सिद्धेश्वर डुकरे हे उपस्थित होते. डिजिटल पत्रकारांची देशातील पहिली संघटना म्हणून ओळख असलेल्या संघटनेचे काम मुंबई महानगरात अधिक गतिमान करण्याची ग्वाही यावेळी शशिकांत देशमुख यांनी दिली. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय काटे, सुनील कसबे, संतोष पाटील, प्रवीण खडतरे यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी विविध प्रश्नांनी वेधले विधानसभेचे लक्ष

सांगोला, दि. १५ जुलै-

सांगोल्याचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी पावसाळी अधिवेशनात विविध प्रश्नांनी विधानसभेचे लक्ष वेधले. आ. डॉ. देशमुख यांनी सांगोला शहरातील अंतर्गत रस्त्यासाठी सरकारने निधी उपलब्ध करुन द्यावा, तसेच सांगोला नगरपालिकेला नालेसफाई, कचरा संकलन व घनकचरा व्यवस्थापनासाठी निधी वाढवुन द्यावा. शहरातील ट्रामा सेंटरमध्ये हवी ती पदे भरुन आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करुन ते सेंटर सुरु करावे. तालुक्यातील अनेक जि.प.शाळेच्या तसेच आंगणवाडीच्या खोल्या दुरुस्तीसाठी निधी मिळावा. स्व.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत योजनेअंतर्गत प्रस्तावित गावांना ग्रामपंचायत कार्यालय बांधकामासाठी निधी द्यावा. रत्नागिरी ते नागपूर

हायवेचे काम केलेल्या कंपनीने सांगोला व मंगळवेढा तालुक्यात गौणखनिजाचे अवैधरित्या खोदकाम केले असून त्या कंपनीने शासनाचा महसुल बुडवलेला आहे. त्या कंपनीवर त्वरित कारवाई करावी. सांगोला तालुक्यातील डाळींब, द्राक्ष बागांचे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरीत आर्थिक मदत मिळावी. तालुक्यातील विविध रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. २०२५ च्या लोकसंख्येनुसार तालुक्याचा ईष्टांक जास्तीचा आहे. तो ईष्टांक शहरी भागासाठी ४७.५० टक्के व ग्रामीण ७६.४२ टक्के मंजुर केल्यास नागरीकांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेता येईल. सांगोला शहरातील संजय नगर झोपडपट्टीला संरक्षित झोपड्या म्हणुन घोषीत करुन शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. बौध्द समाजाची अनेक दिवसांची लॉर्ड बुध्दा युनिव्हर्सिटीची मागणी आहे. त्याही मागणीचा विचार करुन त्यासाठी सरकारने पावले उचलावीत अशी सभागृहात मागणी केली. आ. देशमुख यांनी विधीमंडळात सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील थकीत चारा छावणीची बिले ताबडतोब देण्याची राज्यसरकारकडे मागणी केली. सुशिक्षित बेरोजगार वर्गासाठी एमआयडीसी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे हे निदर्शनास आणून दिले. शक्तीपीठ महामार्गासाठी शेतकरी वर्गाचा तीव्र विरोध असून शेतकऱ्यांची बहुमूल्य असणारी जमीन अधिग्रहित करू नये. संजय गांधी निराधार योजनेमधून अनेकांना वेळेवर पैसे मिळत नाहीत ते पैसे वेळेवर मिळावेत यासाठी शासनाने तातडीने दखल घ्यावी, अशा विविध मागण्या राज्य शासनाकडे करण्यात आल्या.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक सुनील खेडकर यांचे निधन

पुणे, दि. १५ जुलै-

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक सुनील खेडकर (वय ६४ वर्ष) यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुली, जावई असा परिवार आहे. खेडकर यांनी पुणे महानगराचे बौद्धिक प्रमुख, पुणे महानगर प्रचार प्रमुख, महाराष्ट्र एज्युकेशन संस्थेचे नियामक मंडळ सदस्य, भारतीय विचार साधनाचे सहकार्यवाह, मुंबई येथील सांताक्रूझ भाग सहकार्यवाह, संभाजी भागाचे बौद्धिक प्रमुख या व अशा विविध जबाबदारी सांभाळल्या.

शीख संप्रदायचा त्यांचा विशेष अभ्यास होता. ते मूळचे मुंबईचे होते पण मागील ३० वर्षे पुण्यात वास्तव्यास होते. ते अभियंता होते. वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी श्रद्धांजली सभेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संभाजी भाग संघचालक अनिल व्यास, विनायकराव डंबीर, एमईएसचे माजी अध्यक्ष राजीव सहस्त्रबुद्धे, अजिंक्य कुलकर्णी यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

जिल्ह्यातील ५०० गावात 'लाडकी बहिण'च असणार सरपंच

१ हजार २५ सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

अनेक गावपुढाऱ्यांचा हिरमोड

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या निर्देशानुसार तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, राज्यातील ग्रामपंचायतींमधील सरपंचपदाच्या आरक्षणासाठी ५ वर्षाच्या कालावधीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, महिलावर्ग व खुल्या प्रवर्गासाठी आरक्षणाचे फेरवाटप करण्यात आले आहे. त्याअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये आज १६ जुलै रोजी सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत प्रक्रिया पार पडली. दरम्यान, यामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण पूर्ववतच ठेवल्याने अनेक गावपुढाऱ्यांचा हिरमोड झाला आहे.

ग्रामपंचायत सरपंचपदासाठी आरक्षण हे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाअंतर्गत वेळोवेळी फेरवाटपाने निश्चित केले जाते. यावर्षी २०२५-३० या पंचवार्षिक कालावधीसाठी नव्याने आरक्षण निश्चित करण्यासाठी तालुकास्तरावर तहसील कार्यालयांमध्ये सोडत पद्धतीने आरक्षण सोडत झाली. या प्रक्रियेत महिलांसाठी ५० टक्के आरक्षण कायम ठेवण्यात आले असून, अनुसूचित जाती व जमातींसाठीही संविधानानुसार आरक्षण निश्चित केले आहे. या सोडतीची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि उपस्थित अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली झाल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. १०२५ सरपंचपदाच्या आरक्षणामध्ये करमाळा १०८, माढा १०८, बार्शी १२९, उत्तर सोलापूर ३६, मोहोळ ९०, पंढरपूर ९५, माळशिरस १०३, मंगळवेढा ७९, सांगोला ७६, द. सोलापूर ८३, अक्कलकोट ११८ असे जिल्ह्यातील १ हजार २५ सरपंचपदाची सोडत काढली आहे. यामध्ये अनुसूचित जातींसाठी १५५, अनुसूचित जमाती १८, नागरिकांचा मागास प्रवर्ग २७७, सर्वसाधारण ५७५ जणांची सोडत काढली आहे.

माळशिरसमधील 103 पैकी ५१ गावांवर महिलाराज

तभा वृत्तसेवा,
सदाशिवनगर, दि. १५ जुलै-

तालुक्यातील १०३ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे सन २०२५-२०३० साठी आरक्षण आज पंचायत समिती सभागृहात प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ, नायब तहसीलदार अमोल कदम, अजित जाधव, दशरथ माळी यांच्या उपस्थितीत काढण्यात आले.

तालुक्यात १०३ ग्रामपंचायती असून अनुसुचीत जातीसाठी २४ जागा आरक्षीत करण्यात आल्या त्यामधून अनुसुचीत जाती महिलासाठी १२, नागरीकांच्या मागास प्रवर्गासाठी २८ जागा आरक्षीत करण्यात आल्या. त्यामधून १४ जागा नागरीकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षीत करण्यात आल्या. ५० जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी असुन त्यामध्ये महिला प्रवर्गासाठी २५ जागा आरक्षीत करण्यात आल्या. आरक्षणाच्या चिठ्ठ्या लहान मुलांच्या हस्ते काढण्यात आल्या. अनुसुचीत जमातीसाठी एक जागा असून ती माळीनगरसाठी आरक्षित झाली.

संरपच आरक्षण पुढील प्रमाणे :

अनुसुचित जाती महिला (१२) : १) संगम, २) बिजवडी, ३) खळवे, ४) कोंढारपट्टा, ५) मांडवे, ६) पठाणवस्ती, ७) संग्रामनगर, ८) भांब, ९) मोटेवाडी (माळशिरस), १०) मोटेवाडी (फोंडशिरस), ११) पिलीव, १२) खुडूस

अनुसुचित जाती (१२) : १) कदमवाडी, २) देशमुखवाडी, ३) उंबरे दहीगाव, ४) मेडद, ५) मांडकी ६) मळोलीसाळमुखवाडी, ७) कोळेगाव, ८) तामसिदवाडी, ९) तांदुळवाडी, १०) जाधववाडी, ११) भांबूर्डी, १२) बचेरी.

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला (१४) : १) पिरळे, २) बागेचीवाडी, ३) गणेशगांव, ४) झंजेवाडी (खु), ५)

पिसेवाडी, ६) लोणंद, ७) गोरडवाडी, ८) सुळेवाडी, ९) बोंडले, १०) तोंडले, ११) लवंग, १२) निमगाव, १३) कोथळे, १४) डोंबाळवाडी (खु)

नागरिकांचा मागास प्रवर्ग (१४) : १) पानीव (घुलेनगर), २) डोंबाळवाडी (कुरबावी), ३) झिंजेवस्ती (पिलीव), ४) हनुमानवाडी, ५) कुरबावी, ६) कचरेवाडी, ७) चाकोरे प्रतापनगर, ८) चौंडेश्वरवाडी, ९) सवतगव्हाण.१०) फळवणी, ११) सदाशिवनगर, १२) कारुंडे, १३) तांबवे, १४) एकशिव.

सर्वसाधारण महिला (२५) : १) तांबेवाडी, २) मोरोची, ३) कण्हेर, ४) तिरवंडी, ५) इस्लामपूर, ६) जळभावी, ७) कोंडबावी - वटपळी, ८) आनंदनगर, ९) विझोरी, १०) बाभूळगाव, ११) नेवरे, १२) विठ्ठलवाडी, १३) शेंडेचिंच, १४) चांदापुरी, १५) कुसमोड.१६) काळम वाडी, १७) गुरसाळे, १८) विजयवाडी, १९) यशवंतनगर, २०) गिरझनी, २१) शिंदेवाडी, २२) वेळापूर, २३) शिंगोर्णी, २४) वाघोली, २५) पळसमंडळ

सर्वसाधारण (२५) : १) कळंबोली, २) बांगार्डे, ३) फडतरी शिवारवस्ती निटवेवाडी, ४) लोंढेमोहितेवाडी, ५) पुरादावडे, ६) येळीव) ७) गिरवी, ८) रेडे, ९) बोरगाव, १०) पिंपरी, ११) तरंगफळ, १२) गारवाड-मगरवाडी, १३) वाफेगाव, १४) उंबरे वेळापूर, १५) मारकडवाडी, १६) माळखांबी, १७) जांभूड, १८) उघडेवाडी.१९) दसुर, २०) माळेंवाडी (बो), २१) धानोरे, २२) मिरे, २३) धर्मपुरी, २४) खंडाळी (दत्तनगर), २५) दहीगाव,

अनुसुचित-जमाती (१) : माळीनगर. वरील प्रमाणे आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी तालूक्यातील नागरिक उपस्थित होते.

मोहोळ तालुक्यातील ४५ गावाच्या कारभारी महिलाच

५२ गावात सर्वसाधारण तर परमेश्वर पिंपरीत अनु.जमातीसाठी आरक्षण

तभा वृत्तसेवा,
मोहोळ, दि. १५ जुलै-

मोहोळ तालुक्यात ग्रामपंचायत आरक्षण सोडत काढण्यात आली. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्ग ५२ गावे यात २६ महिला सर्वसाधारण प्रवर्ग तर २६ सर्वसाधारण पुरुष प्रवर्गासाठी, ओबीसी पुरुष १२ आणि महिला १२ अशा २४ तर अनुसूचित जाती १३ यामध्ये महिलांसाठी ६ आणि पुरुषांसाठी ७ तसेच अनुसूचित जमातीसाठी १ परमेश्वर पिंपरी हे आरक्षित करण्यात आले आहे. मोहोळ तालुक्यातील ९० ग्रामपंचायतचे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोमवार दिनांक १५ जुलै रोजी मोर्चा पंचायत समितीच्या सभागृहात घेण्यात आला. यावेळी मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक, महसूल नायब तहसीलदार सुधाकर धाईंजे, निवासी नायब तहसीलदार संदेश भोसले, निवडणूक नायब तहसीलदार अनिल शहापुरेसह अनेकजण उपस्थित होते. यावेळी मोहोळमधील चंद्रमौळी गणेश जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थींनी सावी समाधान क्षीरसागर हिच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या. त्यानुसार आरक्षण पुढीलप्रमाणे :

अनुसूचित जाती महिला : जामगाव (बु), सारोळे, विरवडे खुर्द, मनगोळी -भैरववाडी, भोयरे, बैरागवाडी,

***अनुसूचित जाती** : लांबोटी, शिरापुर मो, तेलंगवाडी, कुरणवाडी, (आष्टी), वडाचीवाडी, मुंढेवाडी, सिद्धेवाडी

अनूसूचित जमाती : परमेश्वर पिंपरी,

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला : वाफळे, येणकी, आष्टी, जामगाव खुर्द, पेनुर, बोपले, रामहिंगणी, खंडाळी, मिरी, कोथाळे, टाकळी सिकंदर, कोरवली

***नागरीकाचा मागास प्रवर्ग** : भांबेवाडी, सोहाळे, नांदगाव, वडदेगाव, नजीक पिंपरी, हिवरे, दादपूर, वरकुटे, अर्जुन सोंड, येवती, सौंदणे, कामती बुद्रुक,

सर्वसाधारण महिला : अर्धनारी, घाटणे, आढेगाव, कुरुल, सय्यद वरवडे, हिंगणी निपाणी, कातेवाडी, देगाव वा, सावळेश्वर, अंकोली, एकुरके, डिकसळ, शिंगोली-तरटगाव, चिखली, वडवळ, मसले चौधरी, मलिकपेठ- दाइंगडेवाडी, बिटले, पोफळी, पीरटाकळी, पापरी, नरखेड, पाटकुल, देवडी, कोन्हेरी, लमाणतांडा.

सर्वसाधारण : गोटेवाडी, पोखरापूर, मोरवंची, विरवडे बुद्रुक, औंढी, आष्टे, कामती खुर्द, घोडेश्वर, इंचगाव, खुनेश्वर, वाघोली, वाघोली वाडी, शेज बाभुळगाव, गलंदवाडी, पासलेवाडी, वटवटे, तांबोळे, शेटफळ, आरबळी, शिरापूर (सो), ढोक बाभुळगाव, येळमवाडी, यावली, चिंचोली काटी, हराळवाडी, खवणी, वाळूज, कोळेगाव.

सांगोला तालुक्यात ३८ गावात महिलाराज

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि.१५ जुलै-

सांगोला तालुक्यातील ७६ ग्रामपंचायतींच्या सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक निवडणुकीसाठी सरपंचपदाचे आरक्षण मंगळवार दि.१५ जुलै रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन, सांगोला येथे जाहीर करण्यात आले. यावेळी सांगोला तहसीलदार संतोष कणसे, नायब तहसीलदार ज्ञानेश्वर साळुंखे, गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरपंचपदाचा आरक्षण तपशील पुढील प्रमाणे :

सर्वसाधारण- चोपडी, डोंगरगाव, घेरडी, हातीद, कोळा, महूद बु., मेडशिंगी-बुरलेवाडी, नराळे, पाचेगाव बु., उदनवाडी, वाकी -घेरडी, वझरे, वासुद-केदारवाडी, अनकढाळ, गौडवाडी, आलेगाव, तिप्पेहाळी, वाणीचिंचाळे, वाढेगाव.

सर्वसाधारण स्त्री-डिकसळ, जुनोनी-काळुबाळूवाडी, कमलापूर-गोडसेवाडी, कटफळ, किडेबिसरी, मेथवडे, पारे, शिरभावी, वाटंबरे, य.मंगेवाडी, चिंचोली, चिणके, खवासपूर, सावे, बलवडी, लोटेवाडी, महिम, सोमेवाडी, हंगिरगे-गावडेवाडी.

ना.मा.प्र-बामणी, कडलास, पाचेगाव खुर्द, अचकदाणी, अकोला, बुध्देहाळ-करांडेवाडी, एखतपुर, जवळा, मानेगाव, बागलवाडी, सोनलवाडी.

ना.मा.प्र.स्त्री- सोनंद, देवळे, ह.मंगेवाडी, हलदहिवडी, संगेवाडी, गायगव्हाण, जुजारपूर-गुणाप्पावाडी, लोणविरे, इटकी, शिवणे.

अनु.जाती-भोपसेवाडी, बुरंगेवाडी, हणमंतगाव, खिलारवाडी, तरंगेवाडी, राजुरी, मांजरी-देवकतेवाडी, अजनाळे-लिगाडेवाडी.

अनु.जाती स्त्री-गळवेवाडी, राजापूर, आगलावेवाडी, निजामपूर, चिकमहुद, नाझरे-सरगरवाडी, लक्ष्मी नगर, वाकी-शिवणे.

अनु.जमाती स्त्री-धायटी.

पंढरपूर तालुक्यातील ९५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची नव्याने सोडत

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. १५ जुलै -

पंढरपूर तालुक्यातील सन २०२५ -२०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी ९५ ग्राम पंचायतींच्या सरपंच पदाचे पुनश्चः नव्याने सोडतीचे आरक्षण निश्चिती मंगळवारी (दि.१५ जुलै) दुपारी १२.०० वाजता शेतकी भवन, पंचायत समिती येथे पंढरपूर तहसीलदार सचिन लंगुटे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये आरक्षण सोडतीव्दारे करण्यात आले. या सोडत कार्यक्रमासाठी तालुक्यातील विविध गावांमधून इच्छुक सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. दरम्यान सोडतीव्दारे निश्चिती करण्यात आलेले तालुक्यातील ९५ ग्रामपंचायतींचे आरक्षण पुढील प्रमाणे.

ना.मा.प्र. - आव्हे तरटगाव, उंबरगाव, भटुंबरे, शिरढोण, शेवते, कोंढारकी, तिसंगी, तुंगत, शेटफळ, सिध्देवाडी-तरटगाव कासेगाव, रांझणी, पुळूजवाडी, चिंचणी,

सर्वसाधारण महिला - खरसोळी, पळशी, चळे, ईश्वरवठार, फुलचिंचोली, तारापूर, गुरसाळे, टाकळी, अनवली, कोर्टी, पटवर्धनकुरोली, नांदोरे, पुळूज, करकंब, कान्हापूरी, शिरगाव, गोपाळपूर, शेळवे, देवडे, खरातवाडी, जाधववाडी, लोणारवाडी, सुगावखुर्द,

सर्वसाधारण - नेपतगाव, बाभुळगाव, शंकरगाव-नळी, टाकळीगुरसाळे, पेहे, पिराचीकुरोली, कासेगाव, रोपळे, आंबे, देगाव, जळोली, एकलासपूर, उंबरे, बिटरगाव, मगरवाडी, तनाळी, ओझेवाडी, कौठाळी, केसकरवाडी, खेडभोसे, पांढरेवाडी, चिलाईवाडी, जैनवाडी.

ना.म.प्र.महिला - मेंढापूर, सुस्ते, आंबेचिंचोली, सोनके, बार्डी, मुंढेवाडी, पोहोरगाव, तावशी, सरकोली, खेडभाळवणी, उजनीवसाहत, भोसे, वाडीकुरोली,

अनुसूचित जाती - शेगावदुमाला, गादेगाव, भंडीशेगाव, सुगावभोसे, नेमतवाडी, विटे, व्होळे, सुपली, चिंचोलीभोसे, शेंडगेवाडी,

अनुसूचित जाती महिला - नारायणचिंचोली, अजनसोंड, भाळवणी, धोंडेवाडी, आढीव, करोळे, खर्डी, गार्डी, उपरी,

अनुसूचित जमाती - वाखरी, अजोती,

अनुसूचित जमाती महिला- सांगवी- बादलकोट.

ग्रामपंचायत सरपंच आरक्षण सोडत निश्चितीच्या वेळी तहसीलदार सचिन लंगुटे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड, निवडणूक नायब तहसीलदार वैभव बुचके, सहाय्यक गट विकास अधिकारी विकास कौलगे व तालुक्यातील ग्रामस्थ उपस्थित होते.

बार्शी तालुक्यात ६५ गावात असणार महिलराज; १२९ ग्रामपंचायत आरक्षण सोडतीतून २१ गावात झाला बदल

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. १५ जुलै-

तालुक्यातील सन एप्रिल २०२५ ते मार्च २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी तालुक्यातील १२९ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण हे सोडत काढून तहसीलदार एफ. आर. शेख यांनी जाहीर केले. नियंत्रण अधिकारी सदाशिव पडदुणे हे होते. येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात आरक्षण सोडतीचा कार्यक्रम झाला. यावेळी निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे, निवडणूक नायब तहसीलदार संजीवन मुंडे, महसूल नायब तहसीलदार रविंद्र सानप आदी उपस्थित होते.

बार्शी तालुकयातील एकूण १२९ सरपंचपदापैकी ६५ ग्रामपंचायतीचे आरक्षण हे महिलांसाठी तर ६४ ग्रामपंचायतीचे आरक्षण हे सर्वसाधारण जाहीर झाले. बार्शी तालुक्यात सरपंचपदासाठी अनु.जातीसाठी एकूण ११ ग्रामपंचायती राखीव असून त्यापैकी ६ ग्रामपंचायती या महिलांसाठी राखीव आहेत. तर अनु. जमातीसाठी शेलगाव मा. गावचे सरपंच निश्चित करण्यात आले. सरपंचपदासाठी नामाप्र प्रवर्गासाठी एकूण ३५ ग्रामपंचायती आरक्षित असून त्यापैकी १८ ग्रामपंचायती महिलांसाठी राखीव आहेत. तालुक्यातील ८२ ग्रामपंचायतीचे सरपंचपद खुल्या प्रवर्गासाठी असून यापैकी ४१ ग्रामपंचायती महिलांसाठी राखीव आहेत. १२९ पैकी ४१ ग्रामपंचायतीचे सरपंचपद सर्वांसाठी खुले असून संबंधित गावातील सर्वच प्रवर्गातील पुरुष व महिला सरपंचपदासाठी रिंगणात उतरु शकतात. हे आरक्षण काढताना निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार काढण्यात आले. यात २१ गावांच्या आरक्षणात बदल झाला. यात चिठ्ठीद्वारे मागील वेळेस नामाप्रमधून खुल्यात तर काही खुल्या जागात बदल होऊन नामाप्र झाल्या. महिला आरक्षण बदलून खुले झाले. सावरगाव अनु. जाती स्त्री होते तर अनु. जातीसाठी निश्चित झाले. धामणगाव आ. अनु. जातीचे आरक्षण अनु. जाती स्त्रीसाठी बदलले गेले. बार्शी तालुक्यातील सरपंच आरक्षण सोडत सन- २०२५-२०३०



अनुसूचित जाती- वांगरवाडी, गौडगांव, मंडिगांव, मळेगांव, सावरगांव.

अनुसूचित जाती महिला- जामगांव (पा), दडशिंगे, तांदुळवाडी, गोरमाळे, धामणगाव आ, दहिटणे

अनुसूचित जमाती- शेलगांव (मा). **निरंक अनुसूचित जमाती महिला**- नाही

नागरिकांचा मागास प्रवर्ग- खडकोणी, भानसळे, वाणेवाडी, घारी, कापशी, महागांव, पिंपळगांव (पानगांव), बोरगांव (झाडी), हळदुगे, मुंगशी (आर), रातंजन, ज्योतीबाचीवाडी, सुर्डी, पुरी, इर्ले, उंबरगे, हत्तीज, चिंचखोपन, हिंगणी (आर).

नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला- कोरेगांव, काटेगांव, भोयरे, चिचोली, ढेंबरेबाडी, ममदापूर, अरणगांव, घाणेगांव, ढोराळे, मालेगांव, संगमनेर, तुळशीदासनगर, तडवळे, आंबेगाव, कारी, चिखडे, नांदणी, धोत्रे, जामगाव (आ)

सर्वसाधारण- आगळगांव, पिंपळगांव (आ), गाडेगांव, बाभुळगांव, चारे, पिंपळवाडी, उक्कडगांव, वाघाचीवाडी, शिराळे, धानोरे, जहानपुर, पांगरी, पांढरी, घोळवेवाडी, नारी/नारीवाडी, सौदरे, कव्हे, कळंबवाडी (पा), गाताचीवाडी, फपाळवाडी, खांडवी, गोडसेवाडी, श्रीपतपिंपरी, साकत, मानेगांव, इलेवाडी, तुर्कपिंपरी, यावली, मुंगशी (वा), भातंबरे, उपळे दु., झरेगांव, सर्जापूर, भांडेगांव, सारोळे, लाडोळे, पिंपरी आर, नागोबाचीवाडी, लक्ष्याचीवाडी, कासारवाडी, गुळपोळी, रस्तापूर, राळेरास, रऊळगाव, कासारी.

सर्वसाधारण महिला- चुंब, कळंबवाडी (आ), बेलगांव, देवगाव, बोरगांव (खुर्द), वालवड, पाथरी, पिपळगांव पा, पांगरी, येळंब, खामगांव, इंदापूर, तावडी, बळेवाडी, बावी, पानगांव, कोरफळे, अलिपुर, उपळाई (ठोंगे), शेंद्री, उंडेगांव, काळेगांव, मालवंडी, सासुरे, तांबेवाडी, हिंगणी (पा), निंबळक, शेळगांव (आर), धामणगांव (दु), भालगांव, अंबाबाईचीवाडी, आळजापूर, ताडसौंदणे, रुई, खडकलगाव, कांदलगाव, शेलगाव व्हळे, कुसळंब, पिंपरी पान, झाडी, मिर्झनपूर.

महत्वाचे...

विविध सामाजिक संघटनेतर्फे सूर्यनारायण रघोजी यांचा सत्कार

सोलापूर, दि. १५ जुलै-

येथील रघोजी मोटार गुड्स ट्रान्सपोर्ट कंपनीचे मुख्य प्रवर्तक सूर्यनारायण रघोजी यांच्या ८६ व्या वाढदिवसानिमित्त एएमपीएम ग्रुप व विविध सामाजिक संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला. शेळगी येथील रघोजी मोटार गुड्स ट्रान्सपोर्टच्या दालनात झालेल्या या कार्यक्रमासाठी सुमारे ५०० हून अधिक कर्मचारी, चालक, क्लिनर, समाजिक संघटनेचे प्रतिनिधी, ट्रान्सपोर्ट व्यावसायिक उपस्थित होते. एएमपीएम मित्र परिवारातील संजय रघोजी, मोहन वैद्य, पारस गोयल, प्रतिक उत्तरकर, गुरुदास वडतिले, सागर शिंदे, राहुल उत्तरकर आदींसह अन्य उपस्थित होते. संजय रघोजी व हरकिशन रघोजी यांनी यावेळी स्वागत केले. परमेश्वर कृपेने मनुष्य जीवन मिळते. सुखदु:खाचा सामना करत कर्तव्य तत्परता ठेवून संस्कारक्षम जीवन जगणाऱ्यांना सुखी, समाधानी राहता येते. सर्वांना अशीच सद्बुद्धी मिळावी, असे प्रतिपादन रघोजी यांनी सत्काराला उत्तर देताना केले.

शिक्षिका पूनम व्यवहारे यांच्या नवस्फूर्ती पुस्तिकेचे कृषी मंत्र्याच्या हस्ते प्रकाशन

सोलापूर, दि. १५ जुलै-

नवी दिल्ली येथे रक्षा मंत्रालय भारत सरकार व जम्मू कश्मीर सरकार यांच्या संयुक्त वतीने येथील शरदचंद्र पवार पूर्व प्राथमिक बालक मंदिर सहशिक्षिका पूनम किरण व्यवहारे यांना राष्ट्रीय आयकॉन पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यवहारे यांनी लिहिलेल्या नवस्फुर्ती पुस्तकाचे प्रकाशन केंद्रीय कृषी मंत्री रामनाथ ठाकूर, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री जगदंबिका पाल, उत्तर प्रदेशचे रोजगार मंत्री रघुराज सिंग, एनडीए आघाडीचे मुख्य राष्ट्रीय समन्वयक डॉ. अभिषेक वर्मा, माजी शिक्षणमंत्री डॉ. सतीश चंद्र त्रिवेदी या मान्यवरांच्या हस्ते नवी दिल्ली येथील प्रधानमंत्री संग्रालय येथे करण्यात आले.

धनगर समाज बाधवांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांचा सन्मान

सोलापूर, दि. १५ जुलै-

नुकत्याच पार पडलेल्या आषाढी वारीमध्ये प्रशासनाने केलेल्या योग्य नियोजनामुळे वारकऱ्यांना अनेक सेवा सुविधा सहज उपलब्ध झाल्या तसेच वारी निर्विघ्न पार पाडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य नियोजन केले. तसेच पंढरपूर शहरात नव्याने उभारत असलेल्या अहिल्या भवनासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य ती मदत केल्यामुळे धनगर समाज बांधवांच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा पारंपारिक पध्दतीने सत्कार करण्यात आला. यावेळी फेटा, शाल, पारंपारिक घोंगडी, काठी आणि राजमाता अहिल्यादेवीचे मुर्ती देवून जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सभापती प्रमोद वाघमोडे, माऊली हळवणकर, अमोल कारंडे, संजय लवटे, आकाश बोरकर, माणिक माने, बापू आटकळे, सुदर्शन यमगर, प्रल्हाद कांबळे, मैनोद्दीन पठाण, सुदर्शन खांडेकर आदी उपस्थित होते.

एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी महेबूब तांबोळी

सोलापूर, दि. १५ जुलै-

शासकीय विश्रामगृह येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारी एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेची बैठक राज्य अध्यक्ष बापूसाहेब आडसूळ यांच्या अध्यक्षतेखालील पार पडली. सदर बैठकीत पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी महेबूब तांबोळी यांची निवड करण्यात आली आणि राज्य अध्यक्ष आडसूळ सरांच्या हस्ते निवडीचे पत्र देऊन सत्कार करण्यात आले. सूत्रसंचालन राज्याचे प्रवक्ते एजाज शेख यांनी केले. यावेळी संघटनेचे सल्लागार दिलीप राव चौगुले, राज्य संघटक अमित बक्षी, शहर कार्य अध्यक्ष जुबेर हिप्परगी, रसूल पठाण, रईस रामपूरे, अशफाक शेख, अख्तर रामपूरे, अशफाक सातखेड, इरफान पठाण उपस्थित होते.

सार्वजनिक नळ टप्प्याटप्प्याने बंद करून वैयक्तिक व ग्रुप नळ कनेक्शन द्या

- पाणीपुरवठा सुधारण्यासाठीच्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त कारंजे यांच्या सूचना

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १५ जुलै -

विभागीय हद्दीत सध्या कार्यरत असलेले सार्वजनिक नळ टप्प्याटप्प्याने बंद करून त्या ठिकाणी संबंधित नागरिकांना वैयक्तिक व ग्रुप (खाजगी) नळ कनेक्शन देण्यात यावे. यामुळे पाणी वाचवण्यास मदत होईल आणि पाणीपुरवठा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होईल, असे आदेश अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिले.

महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या अध्यक्षतेखाली आज शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थापन व सुधारणा विषयक बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्व विभागीय कार्यालयांच्या अधिकाऱ्यांना कारंजे यांनी पाणीपुरवठा संदर्भातील विविध सूचना दिल्या.मुख्य कार्यालय पाणीपुरवठा विभाग यांचेकडून तीन दिवसांआड पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. या नियोजनाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय कार्यालये आणि

पाणीपुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी समन्वय साधून कार्यवाही करावी. प्रत्येक विभागीय कार्यालयाने सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाकडून दिलेल्या सूचनानुसार आपआपल्या हद्दीत पाणी वितरण वेळापत्रकानुसार पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा.

शहरातील ड्रेनेज लाईन व चेंबर कव्हरची तपासणी करून अडथळा असल्यास त्वरित दुरुस्ती करावी, अशी सूचना देण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी पाणीपुरवठा व्यवस्थापनात चांगले कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. अशा प्रकारच्या सकारात्मक योगदानामुळे नागरिकांना योग्य वेळेत व पुरेसा पाणीपुरवठा मिळण्यास मदत होत असल्याचे त्यांनी नमूद केले. या बैठकीस वैद्यकीय रजेवर असताना सुद्धा कार्यकारी अभियंता वेंकटेश चौबे हे उपस्थिती राहून त्यांनीही मार्गदर्शन केले. या बैठकीस प्रभारी कार्यकारी अभियंता सतीश एकबोटे, हिदायत मुजावर, सिद्धेश्वर उस्तूरगे सर्व विभागीय अधिकारी तसेच पाणीपुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता यावेळी उपस्थित होते.

दूषित पाणीपुरवठा संदर्भातील तक्रारींचे त्वरित निराकरण करा

दूषित पाणीपुरवठा संदर्भात काही भागांतून तक्रारी प्राप्त होत असल्याने अशा तक्रारींचे त्वरित निराकरण करावे. पाणी परीक्षण करून आवश्यकतेनुसार उपाययोजना कराव्यात, असे आदेशही त्यांनी दिले. पाणीपुरवठा होणाऱ्या दिवशी पाणी वाया जाऊ नये यासाठी उपाययोजना राबवण्यावर त्यांनी भर दिला.विभागीय अधिकारी आणि पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन दर तीन दिवसांआड नियोजित पाणीपुरवठा यशस्वीरीत्या कसा करता येईल यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

जागतिक युवा कौशल्य दिन...
सोलापूर : विजापूर रोड हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज येथे जागतिक युवा कौशल्य दिनी कौशल्य विकास आणि स्वयंरोजगार मेळाव्यात सहभागी झालेले युवा व युवती.

आषाढानिमित्त लक्ष्मी मंदिरात भाविकांची गर्दी...
सोलापूर : छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय परिसरातील महालक्ष्मी मंदिरात आषाढ निमित्त भाविकांनी नैवेद्य दाखवण्यासाठी गर्दी केली होती. (छायाचित्रे : केवल तिवारी)

मावशीच्या घरी जाऊन तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

मंगळवारी दुपारची सलगरवाडी येथील घटना

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १५ जुलै -

शहरातील डोणगाव रोडवरील सलगरवाडी येथील मावशीच्या घरी जाऊन तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना दुपारी उघडकीस आली.

आनंद दादाराव शिंदे (वय ३६, रा. दमाणी नगर, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. मंगळवारी दुपारी एकच्या सुमारास आनंद शिंदे हा सलगरवाडी येथील त्याच्या मावशीच्या घरी गेला होता. मावशीच्या घरातील छताच्या वाशाला दोरीच्या सहाय्याने आनंदने गळफास घेतल्याचे नातेवाईकांना निदर्शनास आल्याने नातेवाईकांनी याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्याला माहिती दिली. त्यावेळी सलगर वस्ती पोलिस ठाण्यातील पोलिस शिपाई सागर गायकवाड यांनी घटनास्थळी येऊन नातेवाईकांच्या मदतीने आनंद यास खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. पुजा लवटे यांनी आनंद यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

दोघांवर गुन्हा दाखल...

आनंद दादाराव शिंदे यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरल्याप्रकरणी आनंद यांची आई अंजना दादाराव शिंदे (वय ५३, रा. पाटील चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर सध्या रा. दमाणी नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शकलेश जाधव व अरूण रोडगे (दोघे रा. सोलापूर) यांच्याविरूध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक कुतवळ पुढील तपास करीत आहेत.

नाट्य परिषद सोलापूर शाखेच्यावतीने

बालगंधर्वांच्या स्मृतीस अभिवादन

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १५ जुलै -

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्या वतीने नटसम्राट बालगंधर्वांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार होते.याप्रसंगी बालगंधर्वांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.

नाट्य परिषदेचे जेष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात बालगंधर्वांच्या आठवणींना उजाळा दिला. बालगंधर्वांचा सोलापूरशी असलेला ऋणानुबंध आणि आठवणी त्यांनी विशद केल्या. नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष अशोक किल्लेदार यांनी बालगंधर्वांच्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय नाट्य कौन्सिलच्या सचिव पदी निवड झाल्याबद्दल परिषदेचे सहकार्यवाह सुमित फुलमामडी यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर परिषदेचे उपाध्यक्ष अशोक किल्लेदार हे नाट्यशास्त्र या विषयात एम.ए.ची पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार परिषदेच्या वतीने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.जोतिबा काटे यांनी केले. याप्रसंगी परिषदेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, उपाध्यक्ष विठ्ठल बडगंची व अशोक किल्लेदार, प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे, सहकार्यवाह सुमित फुलमामडी व सुहास मार्डीकर, कोषाध्यक्ष विद्या काळे, ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी,शांता येळंबकर, ज्येष्ठ रंगकर्मी राजा राजेशचंद्र, सल्लागार मंडळ सदस्य शरद कुमार एकबोटे, निमंत्रित सदस्य संतोष उदगीरी, किरण फडके आदी मान्यवर उपस्थित होते.

संतोष कुलकर्णी बनले एनएचएआयचे कार्यकारी अभियंता

सोलापूर : जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग क्रमांक दोनचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांची राष्ट्रीय महामार्ग सोलापूर विभागाचे कार्यकारी अभियंता म्हणून नियुक्ती झाली.

जिल्हा परिषदेतील तीन वर्षे कार्यकाळ पूर्ण झाल्याने त्यांची बदली करण्यात आली. तत्कालीन सीईओ दिलीप स्वामी, मनीषा आव्हाळे व सीईओ कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची त्यांना जिल्हा परिषदेत संधी मिळाली. वारीचे त्यांनी चांगले नियोजन केले. आषाढी वारीत जर्मन हँगर व नॉन प्लॅनमधील १६ रस्त्यांची कामे झाल्याने वारकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले. कुलकर्णी यांनी वारकऱ्यांची सेवा म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे.

स्वच्छता मोहिमेत 'सिंहगड'च्या १०० विद्यार्थ्यांचा सहभाग

३० पिशव्या कचऱ्याचे संकलन

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १५ जुलै -

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने संपूर्ण भारतामध्ये १ जुलै ते १५ जुलै २०२५ पर्यंत भारत पेट्रोलियम च्या अंतर्गत स्वच्छता पखवाडा स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यात केगाव येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एनएसएस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली यात सहभाग नोंदविला.

श्री सिद्धेश्वर ए.पी.एम.सी मार्केट यार्ड, सोलापूर येथे एक भव्य स्वच्छता मोहीम आणि आरोग्य तपासणी शिबिर राबवण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपण सोहळ्याने झाली. बी पी सी एल टेरिटरी मॅनेजर सौरभ शर्मा, डेपो इन्चार्ज सचिन रावत, सेल्स ऑफिसर तिलकराज, नीरज कुमार, फ्लीट सेल्स ऑफिसर आर्यन चंदा, विद्याधर हतागळे, डॉ. करुणा कबाडी एम सी एच न्यूरोसर्जन, डॉ. गुल्फाम पटेल एम डी मेडिसिन ,एन. बी. नवले सिंहगड महाविद्यालयाचे प्रा. माणिक शिंदे (एनएसएसचे कार्यक्रम समन्वयक), ए.पी.एम.सी मार्केट यार्ड, प्रभारी सचिव अतुलसिंह राजपूत, वाहतूक सेल अध्यक्ष इरफान शेख आदी उपस्थित होते. श्री सिद्धेश्वर ए.पी.एम.सी मार्केट यार्ड, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसह स्वच्छता शपथ घेतली.

श्री सिद्धेश्वर ए.पी.एम.सी मार्केट यार्ड, सोलापूर मुख्यतः महाराष्ट्र, तेलंगणा, आणि उत्तर कर्नाटका येथे कांद्याची वाहतूक सुलभ करते. १०० एकरां पेक्षा अधिक विस्तृत असलेल्या या एपीएमसीमध्ये दररोज ४०० पेक्षा जास्त ट्रक शेती उत्पादने आणि फळांची वाहतूक करतात. त्यामुळे वाहतूकदार आणि ड्रायव्हर्समध्ये स्वच्छतेचे महत्त्व प्रोत्साहित करण्यासाठी हे एक पाऊल उचलले आहे.यानंतर ए.पी.एम.सी मार्केट यार्ड, आसपासच्या १०० एकर भागात सर्व विद्यार्थ्यांसह एक वॉकाथॉन आयोजित केला. ''स्वच्छ भारत, सुंदर भारत'' हा घोषवाक्य एपीएमसी परिसरात घुमला आणि आमच्या उपक्रमाची जागरूकता वाढली. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड सौजन्य एन. बी. नवले सिंघगड महाविद्यालय, सोलापूर येथील एनएसएस विद्यार्थ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभागी केले. १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात भाग घेतला. एपीएमसी शेड क्रमांक १ ते ५ मध्ये एक तासाची स्वच्छता मोहीम पार पडली. ज्यामुळे ३० पिशव्या कचरा गोळा झाला.

सोलापूर स्वच्छ ठेवण्यासाठी त्यांच्या सम पर्णाबद्दल कृतज्ञतेच्या प्रतीक म्हणून सर्व सफाई कर्मचाऱ्यांना हायजेनिक किट देण्यात आले, या शिबिराचा १०० हून अधिक जणांनी लाभ घेतला. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या सौजन्याने आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले. या शिबिरामध्ये रक्तदाब, रक्तातील साखर, हाडांचा खनिज घनता आणि ईसीजी चाचण्यांसह व्यापक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. तसेच, डोळ्यांची तपासणी देखील करण्यात आली आणि ज्यांना नंबर लागले आहेत अशा कर्मचाऱ्यांना मोफत चष्मे देण्यात येणार आहेत.

तालुका पोलिस ठाण्याच्यावतीने सेंद्रीय शेतीविषयक कार्यशाळा

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १५ जुलै -

नान्नज (ता. उत्तर सोलापूर) येथे सोलापूर तालुका पोलिस ठाण्याच्यावतीने सेंद्रीय शेती विषयक कार्यशाळा घेण्यात आली.

पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचे संकल्पेनेतुन सोलापूर ग्रामीण जिल्हयातील शेतकरी बांधवा करीता सेंद्रीय शेतीचा विकास करणे करीता वेगवेगळया कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्यावतीने नान्नज येथील ग्रामपंचायत कार्यालयात कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेकरीता नान्नज व आजुबाजुच्या परिसरातील सुमारे २५० ते ३०० शेतकरी उपस्थित होते. यावेळी मंगळवेढा येथील कृषीभुषण पुरस्कार अंकुश पडवळे यांनी जमीनीचे आरोग्य व विषमुक्त सेंद्रीय शेती या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी कार्यशाळाच्या कार्यक्रमांची प्रस्तावाना केली. रोजगार हमी परिषदेचे अध्यक्ष शहाजी पवार यांनी यावेळी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी सहायक पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम पूर्ण नियोजन केले. सदरची कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडणे करीता युथ संकल्प फौंऊडेशन संभाजी दडे यांनी सहकार्य केले.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

अज्ञात वाहनाच्या धडकेने तरूणाचा मृत्यू

पुणे महामार्गावरील हॉटेल मधुबनसमोरील अपघात

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

पुणे महामार्गावरील हॉटेल मधुबनसमोर अज्ञात वाहनाच्या धडकेत तरूणाचा मृत्यू झाला. हा अपघात मंगळवारी पहाटेच्या सुमारास झाला. निलकंठराय गौडाप्पगौडा पोलिस पाटील (वय ३३, रा. नविन पेठ, निमगाव केतगी, ता. इंदापूर, जि. पुणे) असे तरूणाचे नाव आहे.

१५ जुलै रोजी पहाटे सहाच्या सुमारास हॉटेल मधुबनसमोरील महामार्गावर सोलापूरकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मेन हायवेवर निलकंठराय पोलिस पाटील यास अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने पोलिस पाटील हे रस्त्यावर जखमी व बेशुध्दावस्थेत पडले होते. त्यावेळी त्यास फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील हवालदार एम एल गायकवाड यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. ओंकार तवकोक्कुल यांनी पोलिस पाटील यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

महत्वाचे...

इमारतीवरून पडून तीन वर्षीय बालकाचा मृत्यू

सोलापूर, दि. १५ जुलै-

मंगळवेढा रोडवरील देगाव येथील इमारतीच्या बांधकामावरून पडून बांधकाम कामगाराच्या तीन वर्षिय बालकाचा मृत्यू झाला. ही घटना मंगळवारी दुपारी एकच्या सुमारास घडली. वेद प्रकाश चव्हाण (वय ३, रा. मुकुंदपूर, जि. बिलासपूर, राज्य छत्तीसगड, सध्या रा. देगाव, ता. उत्तर सोलापूर) असे मरण पावलेल्या बालकाचे नाव आहे. देगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे राहणाऱ्या गोविंद थोरात यांच्या घराच्या इमारतीचे बांधकाम सुरु आहे. या बांधकामावर मयत वेद याचे आई-वडील कामगार म्हणून काम करतात व तिथेच राहतात. नविन इमारतीच्या बांधकामाच्या पहिल्या मजल्यावरील पायऱ्यांवर वेद हा मंगळवारी दुपारी खेळत होता. त्यावेळी त्याचा तोल गेल्याने तो खाली पडल्याने त्याच्या सर्वांगास मार लागल्याने तो बेशुध्द पडला. त्यावेळी बेशुध्दावस्थेत वेदला बांधकामावरील सुपरवायझर कृष्णा राठी यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. ही घटना मंगळवारी दुपारी एकच्या सुमारास मंगळवेढा रोडवरील देगाव येथे घडली. त्यावेळी डॉ. पुजा लवटे यांनी वेद यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

पाकणीजवळ रस्ता ओलांडताना उत्तर प्रदेशचा एकजण जखमी

सोलापूर, दि. १५ जुलै-

पाकणीजवळ रस्ता ओलांडताना उत्तर प्रदेशचा एकजण जखमी झाला. कमलेश श्रीधर मसा (वय ४०, रा. शिपान, उत्तर प्रदेश) असे जखमीचे नाव आहे. कमलेश मसा हे १४ जुलै रोजी रात्री साडेआकराच्या सुमारास पाकणी जवळ रस्ता क्रॉस करीत होते. त्यावेळी अज्ञात वाहनाने जोरदार धडक देऊन मसा यास जखमी केले. त्यामुळे मसा यास जखमी अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

रेल्वेचा दरवाजा लागून महिला जखमी

सोलापूर, दि. १५ जुलै-

कुर्डूवाडी रेल्वे स्टेशनजवळ रेल्वेचा दरवाजा लागून महिला जखमी झाली. ज्योती सुनिल मन्सावाले (वय ३०, रा. बेडरपूर, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. १४ जुलै रोजी सकाळी ज्योती मन्सावाले या पुणे येथून सोलापूरकडे होस्पेट या रेल्वेगाडीने दरवाजाजवळ उभे राहून येत होत्या. कुर्डूवाडी रेल्वे स्टेशनजवळ अचनाक रेल्वेचा दरवाजा डोक्याला लागल्याने ज्योती यांच्या डोक्याला मार लागून त्या जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

रेवणसिध्देश्वर नगरात १६ हजारांची घरफोडी

सोलापूर, दि. १५ जुलै -

शहरातील रेवणसिध्देश्वर नगरात चोरट्याने १६ हजारांचा ऐवज चोरून नेला. याबाबत बसवराज गुरूपादप्पा माळी पाटील (वय ६३, रा. रेवणसिध्देश्वर नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ जुलै रोजी रात्री बसवराज माळी पाटील हे राहत्या घराचा दरवाजा उघडा ठेऊन झोपले असताना चोरट्याने त्यांच्या खोलीचा दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेऊन खोलीत प्रवेश केला. खोलीतील एक मोबाइल, स्टील बॉडी असलेला बोर्ड असा १५ हजार ६५३ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

लकी चौकातून ७० हजारांची दुचाकी चोरीस

सोलापूर, दि. १५ जुलै -

लकी चौकातून चोरट्याने ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत राकेश अशोक सिंदगीकर (वय ४९, रा. माशाळ वस्ती, विजापूर रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ जुलै रोजी सकाळी राकेश सिंदगीकर यांनी त्यांची एमएच १३ बीएक्स ६६५५ क्रमांकाची दुचाकी ही लकी चौक येथे पार्क करून ठेवली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार परीट तपास करीत आहेत.

अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा थाळीनाद

● विविध मागण्यांसाठी आंदोलन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि. १५ जुलै -

अंगणवाडी कर्मचाऱ्यांची विविध मागण्या प्रलंबित असल्याने महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाकडून अध्यक्ष सूर्यमणी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली थाळीनाद आंदोलन करण्यात आले.

यावेळी सरकारच्या धोरणाविरोधात घोषणा देण्यात आल्या. मागण्यांचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी व महिला बालविकास अधिकारी यांना देण्यात आले. अंगणवाडी कर्मचा-यांना विनाविलंब ग्रॅच्यूईटी देण्याचे शासकीय आदेश काढण्यात यावे, सेवानिवृत्तीनंतर पेन्शन लागू करण्यात यावे, ऑक्टोबर पासूनचे थकित प्रोत्साहन भत्ता देण्यात यावे, आजारपणाची भरप्रभारी रजा देण्यात यावे, थकित रजेचे मानधन देण्यात यावे, मदतनीसांना थेट नियुक्ती देताना, मागील सेवा ग्राहय धरण्यात यावी, दरमहा पोषण ट्रॅकर ॲपचे प्रशिक्षण देण्यात यावे, फेस रेकॉगनेशनची अट काढण्यात यावे, मोबाईल रिचार्ज निधी देण्यात यावे, प्रोत्साहन भत्याची रक्कम मिळावे, दरमहा सीबीईने पैसे देण्यात यावे, योजनेव्यतिरिक्त कोणतेही काम देण्यात येऊ नये, अंगणवाडी कार्यकर्तींना टीएडीएचे आदेश देण्यात यावे, एप्रिल महिन्याच्या सर्वेनुसार, नवीन अंगणवाडी केंद्र उघडण्यात यावे या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

बोगस डॉक्टरांबाबतची माहिती महापालिकेला कळवा

मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांचे आवाहन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

बंगाली किंवा शासनाच्या वैद्यकीय विभागाकडे नोंदणी नसलेल्या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश शासनाने दिले आहेत. त्यानुसार महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. शहरातील नागरिकांनी बोगस डॉक्टरांबद्दल माहिती असल्यास महापालिकेच्या आरोग्य विभागाकडे कळवावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

शासनाच्या संबंधित विभागाकडे नोंदणी नसलेले बंगाली अथवा अधिकृत पदवी नसलेले बोगस डॉक्टर उपचार करतात. अशा डॉक्टरांकडून दवाखाना, ओपीडी मध्ये उपचार अथवा छोटे छोटे ऑपरेशनही केले जातात. अशा बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश महाराष्ट्र शासनाने दिले आहेत. त्यानुसार महापालिकेच्या आरोग्य

विभागाकडून कारवाई करण्यात येत आहे. या अंतर्गतच सोमवारी एका बोगस डॉक्टरावर महापालिका आरोग्य विभागाकडून कारवाई करण्यात आली. गुन्हा दाखल केला आहे. पुढील कारवाई नियमानुसार होईल, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

सोलापूर शहरातील नागरिकांनी कुठलाही दवाखाना ओपीडी तसेच छोट्या छोट्या सर्जरी करणाऱ्या डॉक्टरांचे नोंदणी पत्र पहावे. शहरातील हद्दवाढ भागामध्ये अशा प्रकारचे डॉक्टर्स आढळून येऊ शकतात. त्यानंतर खातर जमा करून अधिकृत डॉक्टरांकडूनच उपचार घ्यावेत. तेव्हा नागरिकांनी बोगस डॉक्टर बद्दल माहिती असल्यास तत्काळ महापालिकेच्या आरोग्य विभागाला कळवावे. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

सहा शिक्षकांना विस्तार अधिकारीपदाची पदोन्नती

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै

जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील व प्राथमिक शिक्षण अधिकारी कादर शेख यांनी मंगळवारी जिल्ह्यातील सहा शिक्षकांना समुपदेशनाने विस्तार अधिकारी पदाची पदोन्नती दिली.

सिध्दापूरचे मुख्याध्यापक संभाजी शिंदे, पंढरपूरच्या केंद्रप्रमुख महादेवी गुंड, जातेगावचे प्रभावती जगताप, तिल्हेहाळचे मुख्याध्याप सैपन अळगी, घोडातांडाचे मुख्याध्यापक कल्लाप्पा अजावडरे, बार्शिचे भारत बावकर यांना पदोन्नती देण्यात आली. जिल्हा प्रशासनाने ग्रामसेवक, शिक्षक, आरोग्य विभाग यांच्या बदली सुरळीत पार पडल्यानंतर शिक्षकांना विस्तार अधिकारी पदी पदोन्नती देण्यात आल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, शिक्षणाधिकारी कादर शेख यांचे आभार मानले.

जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील व प्राथमिक शिक्षण अधिकारी कादर शेख यांनी सहा शिक्षकांना समुपदेशनाने विस्तार अधिकारी पदाची पदोन्नती दिली.

दीपक काटेसह त्याच्या साथीदारावर मकोका अंतर्गत कारवाई करा

संभाजी ब्रिगेडची उपमुख्यमंत्री अजितदादांकडे मागणी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर शाईफेक करून खुनी हल्ला करणारा गुन्हेगार असलेला दिपक काटे व त्याच्या साथीदार यांच्यावर मोक्कांतर्गत गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्याबाबतचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सोलापूर विमानतळावर आज (दि. १५) दिले.

यावेळी अजितदादांनी दोन्ही सभागृहामध्ये सदस्यांनी आवाज उठवलेला आहे; सरकार कोणालाही पाठीशी घालणार नाही त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन

दिले आहे. जीव घेण्या हल्ल्यामध्ये अक्कलकोट मधील स्थानिक ३० ते ४० जमाव प्रत्यक्षदर्शी व्हिडिओ दिसून येत आहे; त्या स्थानिक शिवधर्माच्या पदाधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात यावी अन्यथा संभाजी ब्रिगेड संघटनेच्या वतीने महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष अरविंद शेळके, जिल्हाध्यक्ष वकील आघाडी ॲड. गणेश कदम, जिल्हा सचिव सिद्धाराम सावळे, जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप निंबाळकर, शहर कार्याध्यक्ष सतीश वावरे, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, शहर उपाध्यक्ष बाळासाहेब भोसले, श्रेयस माने, राज स्वामी, गजानन शिंदे, मल्लू भंडारे उपस्थित होते.

डॉक्टरांचे आजपासून मुंबईत आझाद मैदानान आंदोलन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

Modern Farmaclogy म्हणजेच (सी.सी.एम.पी) certificate course केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांच्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल मधील नोंदणी प्रक्रिये संदर्भात सरकारने घेतलेल्या निर्णयांच्या निषेधार्थ होमिओपॅथिक डॉक्टरतर्फे १६ जुलै रोजी उपोषण आंदोलन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र होमिओपॅथिक कौन्सिलचे सध्याचे प्रशासक डॉ बाहुबली शहा हे आझाद मैदान मुंबई येथे उपोषण करून करणार असून त्यामध्ये महाराष्ट्रतील होमिओपॅथिक डॉक्टर आंदोलनात सहभागी होणार असल्याचे होमिओपॅथिक संघटना संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनील वरळे यांनी सांगितले. सोलापूर शहर व जिल्ह्यातून एक ते दीड हजार होमिओपॅथिक डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. आजपासून तीन दिवस दवाखाना बंद ठेवून निषेध नोंदविणार आहेत. कोर्स पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरची नोंदणी करण्यात येणार होती. मात्र या नोंदणीला खच संघटनेने विरोध केला. या विरोधाच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात येणार आहे असे डॉ. सुनील वरळे म्हणाले.

अधिवेशनाच्या मधल्या सुट्टीत उपमुख्यमंत्री अजितदादा सोलापुरात

- स्व. संभाजी सिनगारे यांच्या कुटुंबियांचे केले सांत्वन
- जुना सहकारी गमावल्याचे केले दु:ख

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ जुलै-

राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून मुंबईतील विधान भवनात सुरू झाले असून, ते १८ जुलैपर्यंत चालणार आहे. या अधिवेशनात सत्ताधार्यांना रोज नवनव्या गोष्टींना तोंड द्यावे लागते. विरोधकांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यासाठी तयारीही तगडीच करावी लागते. याच अधिवेशन काळात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे सोलापुरातील जुने सहकारी संभाजी सिनगारे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दि. १४ जुलैला निधन झाल्याची वार्ता ऐकताच अजितदादांनी दुसर्याच दिवशी अधिवेशन काळाच्या मधल्या सुटीत (दि. १५) विमानाने थेट सोलापूर गाठले आणि सिनगारे यांच्या उत्तर सोलापूर तालुक्यातील

कुमठ्यातील घरी जावून त्यांच्या कुटुंबियांचे सात्वंन करून माणुसकी जोपासली. इतकेच नाहीतर त्यांच्या कुटुंबियांना धीर देवून लगेच मुंबईकडे विमानाने मार्गस्थ झाले.

उपमुख्यमंत्री अजितदादा हे राजकारणातील त्यांचे कट्टर कार्यकर्ते-पदाधिकारी, विरोधी पक्षातील सहकारी, प्रशासनातील महत्वाचे अधिकारी यांच्या प्रत्येक सुख-दु:खाच्या कार्याला धावून येणारे व्यक्तीमत्व असल्याचे आज सिध्द झाल्याची भावना सोलापुरातील राजकीय गोटातून व्यक्त होत होती. स्व. संभाजी सिनगारे हे कुमठे येथील रहिवासी असून, माजी आमदार तथा जेष्ठ राजकीय नेते स्व. ब्रम्हदेवदादा माने यांचे ते जुने सहकारी आणि विश्वासू होते.स्व.ब्रम्हदेव दादानंतर माजी आमदार दिलीप माने, माजी नगरसेवक बाळासाहेब माने यांच्याशीही त्यांची चांगली मैत्री होती. स्व. संभाजी सिनगारे यांचे चिरंजीव सचिन सिनगारे हेही अजितदादा पवार यांच्याकडेच मोठ्या पदावर काम करतात. या सिनगारे कुटुंबियांना धीर द्यावा म्हणून अधिवेशन काळातही उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सोलापुरात येण्यासाठी अचानक दौरा ठरला आणि दुपारी दोन वाजून पंधरा मिनिटांनी त्यांचे सोलापूर विमानतळावर आगमन झाले. यानंतर त्यांनी कुमठे येथे कै. संभाजी दत्तात्रय सिनगारे यांच्या कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. यानंतर ते लगेच तीन वाजता परत मुंबईला रवाना झाले. यावेळी माजी आमदार दिलीप माने, माजी नगरसेवक बाळासाहेब माने, जयकुमार माने, युवा नेते पृथ्वीराज माने, राष्ट्रवादीचे नेते आनंद चंदनशिवे, संतोष पवार, किसन जाधव, अजित माने व कुमठे ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

जुना सवंगडी गेल्याचे दु:ख

गेल्या ५०-५५ वर्षांपासून स्व. संभाजी सिनगारे यांची व माझी दोस्ती व नातेसंबंध होते. सोमवारी अचानक त्यांचे हृदयविकाराने निधन झाल्याने धक्काच बसला. त्यांचा स्वभाव चांगला असल्याने सर्वांनाच ते हवेहवेसे वाटायचे. त्यांच्या अचानक जाण्याने माने परिवारातील सर्वच सदस्यांना दु:ख झाले आहे.

– बाळासाहेब माने, माजी नगरसेवक

पादचाऱ्यास मारहाण; १६ हजारांचा मुद्देमाल लुटला

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १५ जुलै -

शहरातील सुपर मार्केट समोरील एमएसईबी कार्यालयाकडे जाणाऱ्या रोडवर पहाटेच्या सुमारास पादचाऱ्यास मारहाण करून त्यांच्याकडील १६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल लुटून नेण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दुचाकीवरील तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मयुर बसवराज व्हट्टे (वय ४२, रा. राजदीप मेडीकलजवळ, चौपाड, उत्तर कसबा, सोलापूर सध्या रा. धरमशी लाईन, अमृततुल्य हॉटेलच्या गल्लीमध्ये, मुरारजी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ जुलै रोजी पहाटे चारच्या सुमारास मयुर व्हट्टे हे परगावाहून सोलापूरमध्ये येऊन पायी चालत घराकडे जात होते. त्यावेळी सुपर मार्केटसमोरील एमएसईबी कार्यालयाकडे जाणाऱ्या रोडवर मोटारसायकलवरून आलेल्या तीन अनोळखी व्यक्तींनी व्हट्टे यांना मारहाण करून त्यांच्याकडील मोबाईल व रोख रक्कम असा १५ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरून नेला. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.

निंबर्गी येथील तरुण शेतकऱ्यास सर्पदंश

सोलापूर : निंबर्गी (ता. दक्षिण सोलापूर) येथे शेतात काम करताना तरूण शेतकऱ्यास सर्पदंश झाल्याने त्यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. धरेप्पा परमेश्वर दुपारगडे (वय २०, रा. निंबर्गी) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. १५ जुलै रेजी दुपार एकच्या सुमारास निंबर्गी शिवारातील रानात शेतात धरेप्पा हा काम करीत असताना उजव्या हाताच्या बोटास साप चावला. त्यामुळे धरेप्पा यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

ज्ञानामृत आनंदलहरी - ११७९

नाना वेंटाळूनि जीवितें । गुणागुण उखीतें ।
प्राणनाथा उचितें । दिधलें प्रिया ।।

आर्जवाबद्दल बोलून झाल्यानंतर भगवंत आता गुरुभक्तीकडे वळले आहेत. गुरुभक्ती हा माऊलींचा अत्यंत आवडता विषय आहे. माऊलींचे वैशिष्ट्य असे आहे की, त्यांना जो विषय अत्यंत आवडतो, त्याचबरोबर ज्या विषयात त्यांना समर्पण, विश्वास पटवून द्यावयाचा असतो, तसेच ज्या विषयांत प्रेम, आपूलकी, भावना स्पष्ट करावयाची असते. त्या विषयात माऊली हमखास स्त्रीचा दृष्टांत देत असतात. त्यागाची, नि:स्वार्थ प्रेमाची मूर्ती म्हणून माऊली स्त्रिकडे पाहतात. गुरुभक्ती मध्ये समर्पण, त्यागाची, निस्वार्थ सेवेची अत्यंत गरज असल्याने माऊली गुरुभक्ती बद्दल बोलतांना म्हणतात,

नाना वेटाळूनि जीवितें । गुणागुण उखीतें ।
प्राणनाथा उचितें । दिधलें प्रिया ।।.

अर्थात, आपल्या अंगी असलेल्या सर्व गुणांसह, आयुष्यासह, अवगुणांसह पत्नी आपल्या प्रिय पतीला योग्य प्रकारे सर्व अर्पण करते, पत्नीला सर्वस्व अर्पण करण्यात ती संकोच करीत नाही किंवा काहीही झाकून ठेवत नाही. त्याप्रमाणे शिष्याने गुरुभक्तीसाठी आपले सर्वस्व मन:पुर्वक अर्पण करायला हवे. सर्व जलसंपत्ती बरोबर घेऊन गंगा नदी सागराकडे जाते, आपल्याकडे असलेल्या जलाबरोबर ती सर्व जलसंपदाही सागराच्या हवाली करते. त्याप्रमाणे शिष्याने आपल्याकडे काहीही न ठेवता सर्वस्व गुरुचरणी अर्पण करायला हवे. सर्व प्रमुख सिध्दान्तासह वेदविद्या क्रमपदी स्थिर होतात, तसे शिष्याने गुरुचरणी स्थिर होणे आवश्यक असते. गुरुच्या दिशेने येणारा वारा, गुरुकडून येणारा कोणीही व्यक्ति, गुरुचे संदेश, गुरुच्या आज्ञा इत्यादी सर्व शिष्याला मन:पुर्वक आवडत असते, प्रिय वाटत असते. श्रीगुरुचे आसन, वाहन, वस्त्र, शस्त्र, सेवा बाबी सर्व म्हणजे सर्व कांही आपणच व्हावे व त्या साधनांच्या माध्यमातून त्यांची मनोभावे आपणच सेवा करावी अशी शिष्याकडून वृत्ती जोपासली जाते. गुरुभक्ती हा केवळ सांगण्याचा विषय नाही, तर तो अनुभवण्याचा विषय आहे. माऊलींनी आपल्या सदगुरु श्री. निवृत्तीनाथाबद्दल श्री. ज्ञानेश्वरी मध्ये अधून-मधून खूप उत्कृष्ट प्रकारे मनोभावे पूजा केल्याचे आपणाला दिसून येते. सद्गुरु नाथांची कृपा नसती तर आपण हे गीताख्य पूर्ण करुच शकलो नसतो असेही माऊली म्हणतात. आपण केलेल्या कार्याचे ते स्वत:कडे थोडेसुध्दा श्रेय घेत नाहीत. सर्वभावे गुरुभक्ती करण्यांत त्यांना मोठेपण व आनंद वाटतो. गुरुभक्ती मध्ये आपण कोठेही कमी पडणार नाही, असा आत्मविश्वास माऊली जोपासतात. गुरुंना हे कर, ते कर म्हणण्याची वेळच येऊ न देता, त्यांच्या मनीचा भाव जाणून सर्व प्रकारे आपण सेवा करतो. ही सेवा खरे म्हणजे गुरु माऊलीच करुन घेतात, असेही माऊली म्हणतात. श्री. ज्ञानेश्वर माऊलींची गुरुभक्ती आपल्या जीवनात उतरावी व माऊलींप्रमाणे आपल्याकडून गुरुभक्ती व्हावी. तसेच आपणासही माऊलींप्रमाणे आनंद मिळावा अशी माऊली चरणी प्रार्थना करु या.

जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

सुप्रभात

आजचा दिवस

वार : बुधवार
दि. १६ जुलै २०२५
विक्रम संवत् २०८१
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - आषाढ
कृ. षष्ठी (२१.०१)
ऋतु - ग्रीष्म
नक्षत्र - उ. भाद्रपदा (२८.४९)
योग - शोभन (११.५६)
करण - गर (११.५६)

दिनविशेष- चांगला दिवस
कर्क संक्राती
मरिमाता यात्रा करमाळा
....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

राशीभविष्य

मेष : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

वृषभ : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

मिथुन : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

कर्क : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

सिंह : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

कन्या : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

तुळ : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

वृश्चिक : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

धनु : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निमर्ण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

मकर : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

कुंभ : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

मीन : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

राज्यात शिक्षकांच्या ५५ हजार जागा रिक्त

रिक्त जागा भरण्याची भावी शिक्षकांची मागणी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-



शासनाकडून राज्यात २० हजार शिक्षकांच्या जागा भरण्यात आले आहेत. तसेच आठ हजार शिक्षकांची मुलाखतीमधून निवड होणार आहे. तरीही राज्यात शिक्षकांच्या जवळपास ५५ हजार जागा रिक्त राहणार आहेत. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होणार असल्याने रिक्त जागा भरावेत, अशी मागणी भावी शिक्षकांतून होत आहे.

शासनाने नियमित भरतीला चालना देऊन शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यावर भर देणे गरजेचे आहे. शिक्षकांची नियमित भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करणे, शिक्षकांना आवश्यक सेवा-सुरक्षा आणि योग्य वेतन देणे, तसेच शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास शाळेतील गुणवत्ता सुधारणार आहे. मात्र, त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप भावी शिक्षकांतून होत आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील शिक्षण विभागाने शिक्षक भरती प्रक्रियेत सातत्याने विलंब होत असल्याने कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती सुरू केली. परंतु या निर्णयामुळे राज्यातील शिक्षण व्यवस्थेत गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. नियमित भरतीला प्राधान्य न देता अल्प मानधनावर शिक्षकांची तात्पुरती नेमणूक केल्याने गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होणार आहे.

राज्यात टप्याटप्याने शिक्षक भरती सुरू असताना कंत्राटी शिक्षक भरती सुरू केली आहे. ही भरती रद्द करावी. कमी पटसंख्या शाळेत कंत्राटी पद्धतीने भरती झाल्यास त्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता टीईटी, सीईटी असणे आवश्यक आहे. मानधनसुद्धा योग्य असावे. कंत्राटी शिक्षकांचे दरमहा अध्यापन पद्धतीचा मूल्यांकन शिक्षण विभागातील अधिकारी, तज्ज्ञ व्यक्तीकडून व्हावे. जेणेकरून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक व चांगले ज्ञान मिळू शकेल.

- प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष, पवित्र पोर्टल शिक्षक भरती संघटना

शासनाने राज्यात सुमारे २० हजार शिक्षकांची भरती केली आहे. आठ हजार शिक्षक मुलाखतीमधून भरती होणार आहेत. तरीही राज्यात ५५ हजारांपेक्षा जास्त जागा रिक्त राहणार आहेत. त्या रिक्त जागांची भरती प्रक्रिया तातडीने राबवावी. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगार शिक्षकांना नोकरी मिळणार आहे.

- संतोष मगर, अध्यक्ष, डीएड, बीएड स्टुडंट असोसिएशन महाराष्ट्र

अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदाचा प्रा. कदम यांनी स्वीकारला पदभार

सोलापूर, दि. १५ जुलै-

सोलापूर विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीची बैठकअकलूज येथील शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयात संपन्न झाली. या बैठकीमध्ये नूतन कार्यकारिणीचे अध्यक्ष प्रा. डॉ. संतोष कदम यांनी पाच वर्षासाठी परिषदेचा कार्यभार स्वीकारला. यावेळी नूतन सचिव प्रा. डॉ. अमोल खडे उपस्थित होते. प्रा. डॉ. कदम यांनी यापूर्वी परिषदेचे सचिव म्हणून पाच वर्ष काम काज केला आहे. याशिवाय त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात व्यावसायिक अर्थशास्त्र अभ्यासमंडळाचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे. यावेळी परिषदेच्या १८ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. राजाराम पाटील, परिषदेचे मावळते अध्यक्ष प्राचार्य डॉ दत्तात्रय बागडे, मावळते सचिव डॉ. शशिकांत शिंदे, डॉ. उत्तमराव हुंडेकरी, प्रा. पी के शाह, प्रा. डॉ अण्णासाहेब नलावडे, प्रा. डॉ. शोभा खंदारे, डॉ. वेदपाठक, डॉ. वाघमारे उपस्थित होते.

बी.फार्मसी प्रवेश २१ जुलैपर्यंत मुदतवाढ

सांगोला, दि.१५ जुलै-

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता बारावी शास्त्र उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता बी.फार्मसी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु असून त्यास शासनाने दि.२१ जुलै पर्यंत मुदतवाढ दिली आहे अशी माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी दिली. सर्व विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी केले आहे. संपर्क डॉ. एस. एम. मोरे (९७६६८१५१२३), डॉ. एन. ए. तांबोळी (९४२२६४४८७६), पी.एस. लोखंडे (९८२३१०७३७१).

आधार प्रतिष्ठानच्या वृक्षसंवर्धन स्पर्धेचा जि.प. मनगोळी शाळेत शुभारंभ

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

मनगोळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे आधार प्रतिष्ठान आयोजित वृक्षसंवर्धन स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी शासनाच्या 'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत शाळेतील ११० विद्यार्थी स्पर्धकांना केशर आंब्याची रोपे विस्तार अधिकारी अय्युब कलबुर्गी व केंद्रप्रमुख आमसिध्द म्हेत्रे यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लाडलेमशाक शेख होते. तर प्रमुख उपस्थिती उपाध्यक्ष लक्ष्मी हातेकर, सरपंच तेजस्विनी गायकवाड, ग्रा.पं.सदस्या नूरजहान शेख, आधार प्रतिष्ठान चे अध्यक्ष शंकर नळे, सचिव प्रा डॉ जवाहर मोरे, खजिनदार कलप्पा हेळवी व संचालक आप्पासाहेब कोळी यांची होती.

प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक करताना सहशिक्षक राजेंद्र कांबळे यांनी केले. सहभागी स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात येणार आहेत.त्यानंतर शंकर नळे यांनी प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती दिली. जवाहर मोरे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मल्लिकार्जुन पाटील व लक्ष्मी हातेकर यांनी शाळेसाठी दोन पंखे भेट दिले. सूत्रसंचालन राजकुमार म्हेत्रे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक सुरेश डफळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक शिवकांत साबळे, आनंदराव शिंदे, दत्तात्रय हांडे यांनी परिश्रम घेतले.

वाफळे येथे महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर, दि. १५ जुलै-

वाफळे (ता. मोहोळ) येथे महिलेने घरगुती वादातून विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. शैला गेबू चव्हाण (वय ४५, रा. वाफळे) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव असून त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. १४ जुलै रोजी सायंकाळी राहत्या घरी शैला चव्हाण यांनी घरगुती वादातून पिकावर फवारण्याचे औषध प्राशन केले. त्यामुळे चव्हाण यांना त्रास होऊ लागल्याने त्यांना मुलगा सचिन चव्हाण यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

स्व. राजेश कोठे यांच्या जयंतीनिमित्त

एक मूठ धान्य गरिबांसाठी उपक्रम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

राज मेमोरियल इंग्लिश स्कूलमध्ये स्वर्गीय राजेश कोठे यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंतीचे औचित्य साधून शाळेतील इयत्ता नर्सरी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांकडून एक मूठ धान्य गरिबांसाठी या उपक्रम ांतर्गत गहू, तांदूळ व तुरदाळ हे धान्य घेऊन आस्था सामाजिक संस्थेला मुख्याध्यापिका रोहिणी सुरा व विद्यार्थ्यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार अश्विनी तडवळकर, आस्था संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, सहसचिव सिद्धू बेऊर, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष शोभा कुलकर्णी यांच्या हस्ते तसेच मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्येची देवता सरस्वती, आदरणीय स्व. विष्णुपंत तात्यासाहेब कोठे, स्वर्गीय राजेश अण्णा कोठे, स्वर्गीय महेश कोठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी विद्यार्थिनी श्रेया होनकळस व सहशिक्षिका सुरेखा काळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांकरिता विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. स्पर्धा व उपक्रम चित्रकला शिक्षक सुनील कंटी, चित्रकला शिक्षिका अदिती मंठाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे डॉ. राधिका चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, आमदार देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्राध्यापक विलास बेत यांचे मार्गदर्शन लाभले.

राष्ट्ररत्न फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

सोलापूर, दि. १५ जुलै-

राष्ट्ररत्न सोशल फाउंडेशनतर्फे संस्कार संजीवनी फाउंडेशन आयोजित आदिवासी वंचित विद्यार्थी आश्रम हगलूर या ठिकाणी धान्य वाटप तसेच मुलांसाठी खाऊ वाटप शैक्षणिक आणि क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले. या आश्रमातील चिमुकल्यांसाठी गहू, ज्वारी, तांदूळ, रव्याचे लाडू, बिस्किट आणि बरेच खाद्यपदार्थ, खेळण्यासाठी बॉल, फुगे मुलांना टी-शर्ट, नागपंचमी जवळ आली असल्यामुळे सर्व मुलींसाठी नेलपेंट आणि मेंदीचे कोन आदी अनेक वस्तू राष्ट्ररत्न फाउंडेशनतर्फे देण्यात आल्या. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रेमचंद मेने यांच्या हस्ते परमेश्वर काळे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तुळशीचे रोप देण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष प्रांजली मोहीकर यांनी मनोगत व्यक्त केले. उपक्रमासाठी संस्थेचे विश्वस्त ज्योती मेने, डॉ. अनिश मोहीकर, संस्थेचे सदस्य दीपक कांबळे, सुहास भोसले, प्रकाश शिंपी, सुवर्णा कांबळे, अनुराधा निकम, वैशाली गायकवाड, पल्लवी स्वामी, तनुजा शिंपी उपस्थित होते.

आषाढी वारीचे उत्कृष्ट नियोजन केल्याने जिल्हाधिकाऱ्यांचा पत्रकारांकडून गौरव

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १४ जुलै-

यंदा आषाढी वारी सुरू होण्यापूर्वी १ महिन्यापासूनच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आषाढी वारीत वारकऱ्यांसाठी करावयाच्या नवनव्या उपाययोजनांचा अभ्यास करून यंदा आषाढी वारी नीटनेटकी आणि उत्साहात पार पाडल्याने त्यांचा सोलापूर जिल्हा श्रमिक पत्रकार संघ आणि सोलापूर महसूल विभाग पत्रकार संघाच्या वतीने आज (दि. १४) सत्कार करण्यात आला.

यावेळी पत्रकार बांधवांनी वारीबाबतचे आपले अनुभव कथन केले आणि जिल्हाधिकाऱ्यांनी वारी काळात केलेल्या परिश्रमाचे आणि मेहनतीचे वर्णन केले. इतकेच कायतर या यशस्वी वारीचे बुकलेट तयार करण्याचीही मागणी पत्रकारांनी केली. या सत्कार सोहळ्यासाठी जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, महसूल बीट पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश गायकवाड, सचिव मनोज हुलसुरे, प्रमोद बोडके, महेश पांढरे, बाळकृष्ण दोड्डी, शिवाजी सुरवसे, सागर सुरवसे, किरण बनसोडे, संतोष आचलारे, संगमेश जेऊरे, आफताब शेख, प्रशांत कटारे, चंदू मिराखोर, विष्णू सुरवसे, विश्वनाथ बिराजदार, दीपक सोमा, रोहन श्रीराम आदींची उपस्थिती होती.

निविदा चौकशीतील कामाची देयके त्वरीत अदा करा

जलजीवन मिशन कॉन्ट्रॅक्टर संघटनेची विविध मागण्यासाठी सीईओंना निवेदन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

जलजीवन मिशनचे काम करणाऱ्या ठेकेदारांना येणाऱ्या विविध अडचणीचे निवेदन जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांना ग्रामीण पाणी पुरवठा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष मोतीलाल राठोड, अभिमन्यू पवार व राहुल कौलगे यांनी दिले.

निविदा चौकशीतील कामाची देयके त्वरीत अदा करा, जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेची निवीदा चौकशीच्या नावाखाली एकुण १८९ पैकी ९५ कामांची देयके मार्च २०२३ पासून प्रलंबित आहे. यामधील १६ कामांची चौकशी गंभीर स्वरुपाचे असल्याचे सांगून ही कामे बंद करण्यासाठी तोंडी सांगितले. त्यामुळे ९५ कामे आर्थिक अडचणीमुळे सध्या बंद स्थितीत आहेत. आठ दिवसात शासनाकडून परवानगी आल्यानंतरच आपली देयके अदा करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु अद्यापर्यंत देयके देण्यात आली नाहीत. शासनाकडे पाठविलेले १२ कामाच्या फाईल्स अद्यापपर्यंत विभागाकडे मागवून घेण्यात आले नाही. त्यामुळे ९५ कामापैकी चौकशीतून बाहेर निघाल्याने अनेक कामांची देयके देता आले नाहीत. तसेच चौकशीमधील सर्व कामांना देयके अदा देण्याबाबत शासनाकडून परवानगी दिली नाही. यासह जल जीवन मिशन पाणी पुरवठा योजनेच्या सर्व कामांना विना दंडाने मुदत वाढ देणे व ज्या कामांना दंड झाला आहे, त्यांचा दंड माफ करावे, ज्यादा दराच्या निवीदेंना शासन स्तरावरून त्वरीत मान्यता देण्यात यावे, जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेची कामे करताना अचानकपणे पाईपच्या किंमतीमध्येवाढ झाल्याने शासनाकडून जादा दराने निविदा मंजूर करून कार्यारंभ आदेश विभागामार्फत देण्यात आले. त्यापैकी अनेक कामे पूर्ण झाली आहेत. सदरचे प्रस्ताव शासनाकडे कार्योत्तर मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहेत. आजतागायत सदर जादा दराची निविदेला मंजूरी मिळाले नाही. तसेच झालेल्या कामाची देयके तयार करण्यास संबंधितांकडून विलंब होत आहे. म्हणून शासनाने कॉन्ट्रॅक्टरच्या अडचणींची माहीती घेऊन जलजीवनची बिले त्वरीत अदा करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

कॉन्ट्रॅक्टरांची अवस्था दयनीय

जलजीवन मिशनची कामे करून वर्षे होउन गेली, तरी शासनाकडून अद्याप बिल मिळाले नाही. काम करताना मोठ्या प्रमाणात स्वताकडील रक्कम गुंतवणूक केल्याने व वेळेवर बिल मिळत नसल्याने कॉन्ट्रॅक्टर आर्थिक संकटात सापडले आहेत. म्हणून त्यांची अवस्था दयनीय झाली आहे.

- मोतीलाल राठोड, अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन

भारत विकास परिषद शाखेतर्फे सिद्धेश्वर पॉलिटेक्निकमध्ये वृक्षलागवड

सोलापूर, दि. १५ जुलै-

भारत विकास परिषद शाखेच्या वतीने श्री सिद्धेश्वर वुमेन पॉलीटेक्निक या ठिकाणी मोठ्या वृक्षांच्या लागवडीचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सिद्धेश्वर पंच कमिटीचे सदस्य काशिनाथ ढोले, ॲड. आर. एस. पाटील, भारत विकास परीक्षेच्या पर्यावरण गतिविधिचे प्रमुख डॉक्टर अजित देशपांडे, प्राचार्य गजाननराव धरणे, भारत विकास परिषदेचे अध्यक्ष महादेव न्हावकर, रा. स्व. संघाचे शहर संघ चालक राजेंद्र काटवे, सचिव महेश देशपांडे, कोषाध्यक्ष लक्ष्मीकांत कुर्रा, गौरी आमडेकर, किशोरी भट, स्मिता देशपांडे, महेश साठे, प्रवीण तळे, एन.एस.कुलकर्णी, हेमा मोडक, आनंद मोहोळकर, सुधीर देव, संतोष कुंभारे, संस्कार प्रमुख नरहरी अघोर, आरती फडके, नंदिता साठे आदी मान्यवरांच्या हस्ते सुमारे ७० झाडांचे वृक्षारोपण संपन्न झाले. परिसरात वर्षभरात सुमारे ५०० वृक्षारोपण करण्याचा संकल्प प्राचार्य धरणे यांनी सांगितले.

महत्वाचे...

चिंचोलीकाटीत अवैध मुरूम उत्खनन; ग्रा पं. सदस्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

मोहोळ, दि.१५ जुलै-

चिंचोली काटी एमआयडीसीत अवैध मुरूम उत्खननास मंडल अधिकाऱ्याकडून अभय मिळत असल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्या यल्लूताई वाघमारे यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी काय कारवाई करणार ? याकडे लक्ष लागले आहे. मोहोळ तालुक्यातील अवैध मुरूम उपसा प्रकरण दोन वेळा विधान सभेत गाजले आहे माजी आमदार यशवंत माने व विद्यमान आमदार राजू खरे यांनी मांडले त्यामुळे काही काळ अवैध मुरूम उत्खनन करणाऱ्यावर चांगलाच वचक बसला होता काही काळ गेल्या नंतर पुन्हा चोरी छुप्या मार्गाने हळू हळू मुरुमाचाचे टिपर धावू लागले आणि सद्याच्या परिस्थितीत तर कहरच चालू आहे नावालाच रॉयल्टी काढायची अन पाचपट मुरूम उचलायचा ही सवय नित्याचीच होवू लागली असून त्यास तलाठी व मंडल अधिकारी सामील होवू लागले अन या गोष्टीकडे लागेबाधे निर्माण झाल्याने तक्रारदारास टाळण्याचे प्रकार होवू लागले . असाच काहीसा प्रकार चिंचोली काटी एमआयडीसीत होवू लागला .तक्रारदाराची दखल न घेणे जास्तच तक्रारी होवू लागल्या तर तक्रारदाराचे फोन नंबर ब्लॅक लिस्ट मध्ये टाकणे असेही प्रकार यापूर्वी झाल्याचे तक्रारदार सांगतात समोरा समोर भेट झालीच तर तुम्ही लेखी तक्रार दया कारवाई करतो म्हणून सांगयचे तक्रार दिल्यानंतर माझ्याकडे तुमचा अर्जआलाच नाही म्हणून थांबल्याच सांगयच अन ज्यांच्या विरोधात तक्रार आहे त्यांच्या भेटी गाठी अधिकारी घेतात अन कारवाई चालू असल्याची बतावणी करतात .असाच प्रकार वारंवार सावळेश्वर परिसरात होत असल्याचे मंडल मधील नागरिक सांगतात .ग्राम पंचायत सदस्या वाघमारे यांनी अवैध मुरूम उत्खननाबाबत तक्रार केल्या फोन वरून मंडल अधिकारी यांना सांगितले असता मला काय तेवढेच काम नाही अशी उत्तर देत पाठराखण केली जाते .या अवैध मुरूम उपसा प्रकरणाची चौकशी व्हावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा वाघमारे यांनी दिला आहे.त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय काय कारवाई करणार ? याकडे या भागातील नागरीकांचे लक्ष लागून राहिले आहे .

सांगोल्यात मूत्ररोग व किडनी विकारांवर मोफत उपचार उपलब्ध

सांगोला, दि. १५ जुलै-

शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजना अंतर्गत सांगोला शहरातील कडलास

रोडवरील खंडागळे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आता मूत्ररोग, किडनीचे आजार आणि संबंधित शस्त्रक्रियांचे मोफत निदान व उपचार उपलब्ध झाले आहेत अशी माहिती डॉ.परेश खंडागळे यांनी दिली. मूत्ररोग, प्रोस्टेट ग्रंथीची सूज, मूतखडा, किडनी व मूत्रपिंडाचे आजार, किडनीतील खडे, मूत्रमार्गातील खडे या सर्व प्रकारच्या रुग्णांवर उपचार व निदान केले जाणार आहे. यामध्ये पात्र लाभार्थ्यांनी पांढरा, केशरी किंवा पिवळा रेशनकार्ड, आधारकार्ड, बँक पासबुक आणि जन्माचा दाखला ही आवश्यक कागदपत्रे सोबत आणावी असे आवाहन डॉ.परेश खंडागळे यांनी केले आहे.

लायन्स क्लब ऑफ बार्शी टाउन पदग्रहण सोहळा; उपक्रमांची दिली माहिती

बार्शी, दि. १५ जुलै-

लायन्स क्लब ऑफ बार्शी टाउन लायन्स क्लब ऑफ बार्शी टाउन तेजस्विनी तसेच लिओ क्लब ऑफ बार्शी टाऊन या तीनही क्लबचा सन २०२५-२६ या वर्षाकरिता नूतन कार्यकारिणीचा सदस्यांचा पदग्रहण सोहळा रविवारी लिंगायत बोर्डिंग बार्शी येथे पार पडला. याप्रसंगी माजी प्रांतपाल लायन अशोक मेहता यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना शपथ देण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार दिलीप सोपल तसेच माजी आमदार राजेंद्र राऊत, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र दास, विभागीय सभापती श्रीनिवास कटकुर तसेच लिओचे मल्टिपल अध्यक्ष पवन श्रीश्रीमाळ, उपविभागीय सभापती विनोद बुडूख उपस्थित होते. सुरुवातीला मावळते अध्यक्ष महावीर कदम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तसेच वर्षभर राबवलेल्या विविध उपक्रमांची आढावा सचिव हेमंत जमदाडे, प्राची जमदाडे, आविश बांबोली यांनी सादर केला. व्यासपीठावरील मान्यवराचे स्वागत तेजस्विनी क्लबचे अध्यक्ष विद्या काळे, लिओ गौरव देडिया यांनी केले. नूतन अध्यक्ष लायन रवी राऊत यांनी येणाऱ्या वर्षभरामध्ये राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती सभागृहाला दिली. तसेच तेजस्विनी चे अध्यक्षा पल्लवी बजाज यांनीही महिलांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. लीओ क्लबचे अध्यक्ष तेजस रायचूरकर यांनीही येणाऱ्या वर्षभरामध्ये विविध समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आपल्या मनोगतामध्ये सांगितले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रदीप जाधव आणि प्रकाश फुरडे यांनी करुन दिला. याप्रसंगी सुखाचा शोध या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र दास यांनी सभागृहाला आपल्या मंत्रमुग्धवाणीने प्रबोधन केले. सूत्रसंचालन अर्चना आवटे व अजित देशमुख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अतुल सोनिग्रा, राजा काळे, रवी बजाज, भरत परमार, प्रीतम सुरवसे, शंभू भाई भानुषाली यांनी परिश्रम घेतले. आभार शितल परमार यांनी मानले.

न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व पालकांचा गुणगौरव

पिलीव, दि. १५ जुलै-

भाळवणी येथील न्यु इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज आफ सायन्स मध्ये पाचवी व आठवी शिष्यवृत्तीधारक विदयार्थी व पालक यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. इयत्ता पाचवी मधील ९८ विदयार्थी या परीक्षेस बसले होते त्यापैकी समृद्धी सोनवणे २६५ गुण व राधेश माने २३८ हे दोन विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक ठरले .तर इयत्ता आठवी मधील श्रेया हातगिने २३८ गुण, साक्षी शिंदे २२२ ,साक्षी ऐवळे २२२,विराज म्हेत्रे २२२,वैष्णवी माळी २१६, पार्थ जाधव १९४,सिमरन शेख १९४, सिद्धार्थ सरतापे १८४ गुण मिळवुन शिष्यवृत्ती धारक ठरले .स्थानिक स्कूल कमीटीचे चेअरमन संभाजीराजे शिंदे,सदस्य भगवान चौगुले, वामन पाटील, प्राचार्य शिंदे,उपसरपंच नितीन शिंदे, उपप्राचार्य पि बी मोरे, पर्यवेक्षक बेसिकराव आदी उपस्थित होते.

दोन महिन्यात निरा-देवधरचे काम सुरु करणार

- माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर
- भाजपा माळशिरस तालुका प्रमुख कार्यकर्ता संवाद मेळावा

तभा वृत्तसेवा,
पिलीव, दि. १५ जुलै-

यावेळी माळशिरस तालुक्यातील कारुंडे या ठिकाणी दोन महिन्यांच्या आत निरा देवघरचे काम सुरू करणार असल्याचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सांगितले. तसेच नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या १६ गावांना नवीन उपसा सिंचन योजना मंजूर करून पंप हाऊसचे काम दोन महिन्यांच्या आत सुरू करणार असा शब्द नाईक-निंबाळकर यांनी दिला

भारतीय जनता पार्टी माळशिरस तालुका प्रमुख कार्यकर्ता संवाद मेळावा जाधव हॉटेल, माळशिरस-म्हसवड रोड येथे उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. या मेळाव्याच्या माध्यमातून तालुक्यातील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि स्थानिक नेतृत्व एकत्र येत, संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

पुढे बोलताना निंबाळकर म्हणाले, मागील महिन्यात जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या सोबत या विषयावर मिटींग झाली त्यासाठी माळशिरस तालुक्यातुन माजी आमदार राम सातपुते आणि पाण्यासाठी संघर्ष करणारे शिवराज पुकळे त्यासाठी उपस्थित होते त्याचवेळी सर्व मार्ग निघालेला आहे त्यामुळे कोणी नाही म्हटलं तरी पाणी येणारच, असेही ते म्हणाले. या बैठकीत केंद्र आणि राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे गावागावांत, घराघरांत पोहचवण्यासाठी ठोस कृती आराखडा आखण्यावर भर देण्यात आला. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, बूथस्तरापासून पक्ष संघटना मजबूत व्हावी, यावर मंथन करण्यात आले.

यावेळी माळशिरस तालुक्यातील प्रत्येक नगरपालिका / नगरपरिषद, ग्रामपंचायत आणि पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचा झेंडा अभिमानाने फडकवण्यात आपण निश्चितपणे यशस्वी होऊ, असा आत्म विश्वास पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये जागवला. यावेळी माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर, फलटण विधानसभेचे आमदार सचिन पाटील, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, भाजपा युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष शिवराज पुकळे, कार्यक्रम संयोजक व माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब देशमुख, भाजपचे जेष्ठ नेते हनुमंत सुळ, ॲड. बी. वाय. राऊत, सोपान नारनवर, जिल्हा उपाध्यक्ष बाजीरावजी काटकर, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, ॲड. शरद मदने, संजय देशमुख, नितीन मोहीते, सुजय माने-देशमुख उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यात खरिपाची १११ टक्के पेरणी

- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले
- पावसाने ओढ दिल्याने बळीराजा हतबल
- काही भागात दुबार पेरणीचेही संकट

तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड
सोलापूर, दि. १५ जुलै-

यंदा हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर ऋतुचक्रातच बदल होऊन वर्षातील तीनही हंगाम साधारणपणे १५ दिवस ते १ महिन्याच्या कालावधीने उशिरा सुरू होऊ लागले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अवकाळीचा तुफान पाऊस 'मे' महिन्यात कोसळला आहे. यामुळे त्याच पावसाच्या ओलिवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या पेरण्या जूनमध्ये उरकल्या आहेत. आता या पिकांना जूनमध्ये पडणाऱ्या सरींचाही तितकाच फायदा होत आहे. मात्र या पिकांना आता मोठ्या पावसाची गरज आहे. सध्या जिल्ह्यात सरासरी १११.१६ टक्के पेरणी झाली असून, येत्या महिनाखेरपर्यंत या पेरणीचा टक्का अजून वाढण्याची शक्यता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य

भोसले यांनी वर्तविली. दरम्यान, पावसाने जवळपास महिनाभरापासून ओढ दिल्याने मात्र बळीराजा हतबल झाला आहे. तर काही भागात दुबार पेरणी करावी लागली आहे.

जूनच्या सुरूवातीला ऐन पेरणीच्या काळातच पावसाचा जोर वाढू लागल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. मात्र पावसाने चांगलीच उघडीप दिल्याने जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी पेरण्या उरकल्या आहेत. मे महिन्यातील पावसाच्या ओलीवर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. कारण जूनमध्ये तसा दमदार एकही पाऊस झाला नाही किंवा २-२ दिवसांची संततधारही दिसून आली नाही. मे महिन्यातील मान्सूनपूर्व पावसाच्या ओलीवर कुठलीही मशागत न करता घाईने शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी केली व पाऊस लांबला किंवा लागोपाठ मोठे पाऊस झाले तर केलेली पेरणी वाया जाते. यामुळे महागडे बियाणे व खतांचा अपव्यय होतो, त्यासाठी सुरुवातीचे मोठे पाऊस होऊन गेल्यानंतर खरिपाच्या पिकांची शेतकरी बांधवांनी पेरणी करण्याची गरज कृषी विभागाने पूर्वी व्यक्त केली होती. इतकेच नाहीतर मृग नक्षत्रात पेरणी केली तर पिकांवर कमी रोग पडतात, पाऊसही मोठा पडत नसल्याने पिके बहरून उत्पन्नातही मोठी वाढ होते. यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची गडबड न करता १० जूनपासूनच तिफण उचलावी, असेही आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी केले होते. त्यानुसार जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मृग नक्षत्रानंतरच पेरणी केल्याने यंदा उत्पन्नाचा टक्का चांगला वाढेल, असा आशावाद भोसले यांनी व्यक्त केला आहे. मात्र आता पाऊसच गायब झाल्याने बळीराजा चांगलाच धास्तावल्याचे चित्र आहे.

जिल्ह्याच्या ३७५६७३.७ हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी

उत्तर सोलापूर १८ हजार ७२९ हे. क्षेत्रावर १५१.१ टक्के, दक्षिण सोलापूर ३४ हजार २८३-९४.४४, बार्शी १ लाख ७६ हजार-१३६.७३, अक्कलकोट ६२ हजार २६१ हे. वर ८४.९२, मोहोळ १७ हजार २७ -१३०.८४, माढा ३० हजार १५३-१२६.१५, करमाळा ४२ हजार ६६९-१५५.५, पंढरपूर ४ हजार २८-६७.८७, सांगोला २६ हजार ५१७-८६.२७, माळशिरस १० हजार ८६४-७४.१४ आणि मंगळवेढा १० हजार ८६४-७४.१४ टक्के पेरणी झाली आहे. तर जिल्ह्याची सरासरी ३ लाख ३७ हजार ९६८ क्षेत्रापेक्षा जास्त म्हणजेच ३ लाख ७५ हजार ६७३.७ हेक्टरवर १११.१६ टक्के इतकी खरिपाची पेरणी झाली आहे.

मार्केट यार्डातून ५० हजारांच्या दुचाकीची चोरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

शहरातील मार्केट यार्डातून चोरट्याने ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत अमोल अविनाश गुरव (वय ३९, रा. संतनाथ मंदीराजवळ, वैराग, ता. बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१० जुलै रोजी अमोल गुरव हे सेलापूरातील मार्केट यार्ड येथे त्यांच्या दुचाकी क्र. एमएच १३ सीएम ८३२३ वरून आले होते. मार्केट यार्ड येथे त्यांनी त्यांची दुचाकी पार्क करून ठेवली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार नदाफ पुढील तपास करीत आहेत.

नागनाथ तलाव कल्लोळ पायऱ्या बांधकामाचे संजयमामा शिंदेंच्या हस्ते भूमीपूजन

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि.१५ जुलै-

शेटफळ (ना) (ता.करमाळा) येथे प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत मंजूर श्री नागनाथ देवस्थान कल्लोळ तलावासाठीच्या पाय-यांच्या बांधकामाचे भूमिपूजन माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यासाठी माजी आमदार शिंदे यांच्या सहकार्याने ९० लाख रूपयांचा निधी मंजूर आहे.

यावेळी चिखलठाणचे माजी सरपंच चंद्रकांत सरडे, जि.प. चे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, सतीश शेळके, उध्दव माळी, आण्णासाहेब पवार, रोहिदास सातव, अशोक तकीक, उमरडचे माजी सरपंच प्रमोद बदे, वांगी नं.३ चे सरपंच मयुर रोकडे, सोमनाथ रोकडे, कुगांवचे चेअरमन सचिन गावडे, समाधान देशमुख आदी उपस्थित होते. शेटफळचे माजी सरपंच विकास गुंड, सरपंच काका गुंड, पांडूरंग लबडे, हभप बापू महाराज, सचिन पोळ, सचिन दिलीप पोळ, शिवसेना तालुकाप्रमुख नवनाथ गुंड, तुकाराम चोरगे, भाऊसाहेब साबळे, पारस गुंड, बाबुराव चोरगे, विठ्ठल गुंड, सुहास पोळ, बापूराव पोळ, राहुल लबडे, आप्पा लबडे, पिल्लू पोळ यांनी परिश्रम घेतले.

रानमसलेत जनावरांचे मोफत लसीकरण शिबीर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय व लोकमंगल वेटरनरी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत रानमसले तालुका उत्तर सोलापूर येथे जनावरांचे मोफत लसीकरण व आरोग्य तपासणी शिबिर राबविण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत पशुतज्ज्ञांच्या मार्गदर्शनात जर्सी व खिलार जातीच्या एकूण ५० जनावरांच्या लंम्पी विषाणूजन्य रोगाचे लसीकरण करण्यात आले. यासाठी डॉ. सत्यजीत पाटील (पशुवैद्यकीय अधिकारी बीबीदारफळ) व डॉ. नागेश भोसले (लोकमंगल वेटरनरी हॉस्पिटल वडाळा) यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या उपक्रमाअंतर्गत डॉ. सत्यजीत पाटील व डॉ. नागेश भोसले यांनी उपस्थित ग्रामस्थांना जनावरांचे विविध आजार, त्यांची लक्षणे व त्यावरचे उपचार याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये लंम्पी, घटसर्प, लाळ्या, जनावरांतील वंध्यत्व, ताप, त्वचारोग आदी रोगांविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी रानमसले सरपंच मनोहर क्षीरसागर, उपसरपंच रमेश सुतार तसेच गावातील महादेव तगारे, सागर तगारे, सागर गरड, रोहन गरड, सुरज तगारे आदी पशुपालक ग्रामस्थ उपस्थित होते.

या उपक्रमासाठी लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन व राष्ट्रीय सेवा योजना प्रा. अधिकारी आशिष सरकाळे यांचे मार्गदर्शन लाभले. हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी स्वयंसेवक नक्षता कांबळे, ओम पवार, सायली परबत, निखिल धुमाळ, गणेश शिंदे, वैष्णवी मागाडे आदींनी मोलाची भूमिका पार पाडली.

बार्शी तालुक्यातील ५० शेतकऱ्यांची विठ्ठलगंगा फार्मर कंपनीस क्षेत्रभेट

- राजेंद्र राऊतांचा पुढाकार
- द्राक्ष, केळी बागेची केली पाहणी

तभा वृत्तसेवा,
कुर्डूवाडी, दि. १५ जुलै-

बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी बार्शी तालुक्यातील विविध गावांतील सुमारे ५० शेतकऱ्यांना सोबत घेऊन रविवारी १३ जुलै रोजी निमगाव टें (ता. माढा) येथील विठ्ठलगंगा फार्मर प्रोडूसर कंपनीच्या प्रक्षेत्रात भेट दिली. यावेळी त्यांनी द्राक्ष व केळी बागेची पाहणी केली. यावेळी त्यांनी धनराज शिंदे यांच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी माजी आमदार राऊत यांनी विठ्ठलगंगा फार्मर प्रोडूसर कंपनीचे कामकाज संस्थापक अध्यक्ष धनराज शिंदे यांच्याकडून जाणून घेतले. तसेच कंपनीचे माती परीक्षण प्रयोगशाळा, अत्याधुनिक कोल्ड स्टोरेज, शेतीपयोगी निविष्ठा केंद्र, नव्याने सुरू होत असलेले शेतकरी प्रशिक्षण केंद्रात जाऊन सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर रमेश शिंदे व धनराज शिंदे यांच्या उपळवाटे (ता. माढा) येथील मालकीच्या द्राक्ष बागेत जाऊन सुमारे दोन तास विविध विषयावर चर्चा केली. यावेळी माजी आमदार राजाभाऊ राऊत यांनी संपूर्ण द्राक्ष बागेत आपल्या सोबत आलेल्या सहकार्यासमवेत फिरून धनराज शिंदे व कृषीनिष्ठ शेतकरी नितीन कापसे व अनंत कंगले यांच्याकडून द्राक्ष व केळी शेतीची माहिती जाणून घेतली. त्यानंतर धनराज दादा शिंदे यांच्या फार्म हाऊसवर माजी आमदार राऊत यांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला. जेवण झाल्यानंतर निमगाव टें चे माजी सरपंच रवींद्र शिंदे यांच्या कंदर येथील केळीच्या बागेला भेट देऊन पाहणी दौऱ्याचा शेवट केला. यावेळी कृषीनिष्ठ शेतकरी नितीन कापसे, माजी सभापती केशव घोगरे, राजाभाऊ देशमुख, तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले, लाला गव्हाणे, डॉ. किरण मांजरे, अनंत कंगले, कृषी अधिकारी सयाजी गायकवाड, राहुल सुरवसे, रमेश पाटील, बिभीषण कदम, सुधीर काशीद, अतुल जगताप , गणेश पाटील, सोनु कदम, सोनु पवार, मदन गव्हाणे, केदार काळे, जयदीप तळे, नागनाथ शिंदे, पप्पू शिंदे, विठ्ठलगंगा फार्मर प्रोडूसर कंपनीचे सर्व संचालक व अधिकारी व बार्शी तालुक्यातील प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

पंढरपूर नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. पांडुरंग नाईकनवरे

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. १५ जुलै-

पंढरपूर नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. पांडुरंग नाईकनवरे तर उपाध्यक्षपदी अनिल कारंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

५६ कोटींच्या ठेवी व वार्षिक २०० कोटींची उलाढाल असलेल्या पंढरपूर नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली होती. सोमवारी नवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीसाठी पंढरपूर नागरी पतसंस्थेच्या कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी जे. एन. जमादार यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची सभा झाली. यावेळी अध्यक्ष पदासाठी ॲड. पांडुरंग नाईकनवरे तर उपाध्यक्ष पदासाठी अनिल कारंडे यांचाच एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी जे. एल. जमादार यांनी केली. यावेळी पतसंस्थेचे जेष्ठ संचालक सुधाकर कवडे, संचालक विश्वास उपासे, डॉ. दत्तात्रय साळुंखे, संचालक दत्तात्रय मोरे, कल्याण नाईकनवरे, सिद्धेश्वर उपासे, विजय डावरे, मोहन कोळी, रोहिणी उपासे, रोहिणी डावरे, ॲड. राहुल नाईकनवरे, ॲड. संतोष नाईकनवरे, सचिव मोहन डावरे, अजय जवारे, राजू साळवे, काशिलिंग लवटे, नितीन बनकर आदी उपस्थित होते.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

रेशनचे पेंडींग कमिशन द्या; जिल्ह्यातील दुकानदारांची मागणी

जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना देण्यात आले निवेदन

तभा वृत्तसेवा,
अकलूज, दि.१५ जुलै-

रेशनचे पेंडिंग एक ते दीड वर्षापासुनचे व चालू नोव्हेंबर २०२४ ते मे २०२५ या काळातील कमीशन मिळावे याबाबतचे निवेदन अखिल राज्य स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक महासंघ सोलापूर ग्रामीण जिल्हा संघटनेकडून जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांना देण्यात आले. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांच्याशी चर्चा करण्यात आली.

मागील एक ते दीड वर्षाखालील पेंडिग कमिशन हे रेगुलर कमिशन जमा झाल्यानंतर दुसऱ्या टप्प्यात जमा करण्यात येईल व चालू नोव्हेंबर २०२४ ते मे २०२५ हे कमीशन सर्वाबरोबर जमा करण्यात येईल असे सांगितले. महासंघ जिल्हा संघटनेकडून यावेळी सर्व ग्रामीण जिल्हा मधील पेडींग धान्य दुकानदार यांचे रजिस्ट्रेशन कामे पुर्ण करुन घेतली. या वेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक, सहसचिव सोमनाथ पवार, पंढरपूर तालुकाध्यक्ष किरण दानोळे, तालुकाध्यक्ष गणेश बागल, पंढरपूर तालुका उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, उपाध्यक्ष महावीर वाकसे, मिलिंद रेडेकर तसेच ज्येष्ठ दुकानदार विठ्ठल महामुरे, नजीर मुलाणी, जे. एच. नलवडे, शिरगिरे, किरण टकले, अरूण जाधव, अक्षय मुंडफणे व जिल्ह्यातील धान्य दुकानदार उपस्थित होते.

महत्वाचे...

बार्शीत घरफोडीचा प्रकार; विठ्ठलनगरमध्ये ३ लाखांचा ऐवज चोरीला

बार्शी, दि. १५ जुलै-

शहरातील विठ्ठलनगर परिसरात एक धक्कादायक घरफोडीची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून घरात घुसत ३ लाखांहून अधिक रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. या प्रकरणी बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बापू केरबा परांडे (वय ५४, व्यवसाय चालक, रा. विठ्ठलनगर, बार्शी) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १३ जुलै रोजी दुपारी ४ वाजता ते स्वतः, पत्नी दैवशाला, मुलगा अमोल, सून भाग्यश्री व नातू शिवांश यांच्यासह शिंदेवाडी (ता. माढा) येथे शेतीच्या कामासाठी आणि देवीच्या यात्रेसाठी गेले होते. घर कुलूप लावून त्यांनी गावाकडे प्रयाण केले होते. १५ जुलै रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास शेजारील रहिवासी निवास भोसले यांनी परांडे यांना फोन करुन त्यांच्या घराचा दरवाजा उघडा असल्याची माहिती दिली. परांडे कुटुंबियांनी तात्काळ गावाहून बार्शीला येत पाहणी केली असता घराचे कुलूप व कडी कोयंडा तुटलेले होते. घरात प्रवेश करताच बेडरुममधील सामान अस्ताव्यस्त आढळले. कपाटावरील बॅगमधील रोख रक्कम व सोन्याचे दागिने चोरीस गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. चोरट्यांनी सुमारे १ लाख ३० हजार रुपयांची रोख रक्कम (५०० रुपयांच्या २०० नोटा व १०० रुपयांच्या ३०० नोटा) आणि सुमारे अडीच तोळ्याचे सोन्याचे गंठण असा एकूण ३ लाखाहून अधिक रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. परांडे यांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

शंकरलिंग प्रशालेत माजी विद्यार्थी विकास जाधव यांच्याकडून वह्या वाटप

वळसंग, दि. १५ जुलै-

वळसंग येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत माजी विद्यार्थी श्री विकास भिमराव जाधव यांच्याकडून २,५५० चांगल्या प्रतीचे वही विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी वळसंग पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, अक्कलकोट स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टीचे अध्यक्ष महेश इंगळे, शंकरलिंग देवस्थान ट्रस्टीचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, शंकरलिंग स्कूल कमिटीचे चेअरमन शिवशरण थळंगे, संचालक विश्वनाथ थळंगे, रमेश दूधगी, प्रकाश दुधगी, जयश्री विकास जाधव, प्रशालेचे मुख्याध्यापक विरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके उपस्थित होते. प्रथम विद्येची आराध्य दैवत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शिष्यवृत्ती पात्र झालेले विद्यार्थी साईगंधा जमादार व श्वेता वळसंगे या दोन्ही मुलींचे शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ट्रस्टीचे संचालक विश्वनाथ थळंगे हे होते. कार्यक्रमासाठी २००५ या शैक्षणिक वर्षाचे माजी विद्यार्थी अनिल बर्वे, पत्रकार कल्लय्या स्वामी, बसवराज कोळी, हजरत कटरे, प्रज्वल कुर्ले, सचिन व्हनाळे,विश्वनाथ भुसणगी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तानाजी जमादार, बाळकृष्ण गुंड, सिद्धारूढ हिरेमठ, नीलकंठ कवटगी, विजयकुमार प्याटी, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, सिद्धाराम भैरामडगी, बसवराज दूधगी, वीरेश थळंगे, कट्टेप्पा कोळी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीमंत भोसले यांनी केले तर आभार गंगाधर बिराजदार यांनी मानले.

जिल्हा परिषदेचे ६८ गट तर पंचायत समितीचे १३६ गण जाहीर

- २१ जुलैपर्यंत आक्षेप नोंदवण्यास मुदत
- माळशिरसमध्ये दोन गट घटले, करमाळा, उत्तरमध्ये एकने वाढ

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै -

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर जिल्हा परिषद गट- गणाचा प्रारुप आराखडा सोमवारी जाहीर झाला. पूर्वी प्रमाणेच जिल्हा परिषदेचे ६८ गट व गण १३६ गणाची प्रारूप रचना जैसे थे ठेवण्यात आली आहेत . २०१७ मधील जिल्हा परिषद निवडणुकीनंतर माळशिरस तालुक्यातील म्हाळुंग-श्रीपूर, नातेपुते, अकलूज व बार्शी तालुक्यातील वैराग, मोहोळ तालुक्यातील अनगर या नगर पंचायती जाहीर झाल्याने नवीन प्रभाग रचनेत गट व गणांची नावे व सीमारेषा बदललेल्या आहेत.

माळशिरस मध्ये पूर्वी ११ गट होते या निवडणुकीत ९ असतील. करमाळ्यात ५ ऐवजी सहा तर उत्तर सोलापूर तालुक्यातील दोन ऐवजी तीन गट झाले आहेत. नव्याने गट-गण बदलल्याम ळे पूर्वीच्या गट व गण रचनेत बराच बदल झाला आहे. २१ जुलैपर्यंत या प्रारूप गटावर आक्षेप नोंदवता येईल. वर्षानुवर्षा पासून जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव असलेले अकलूज हे क्षेत्र जिल्हा परिषद व पंचायत समितीमधून प्रथमच वगळले गेले आहे. या पूर्वीच्या गटांची क्षेत्र रचना बदलावी लागल्याने संबंधित तालुक्यात काही नवे गट तयार झाले आहेत. यशवंतनगर ग्रामपंचायत क्षेत्र पंचायत समिती गणात असल्याने ग्रामीण राजकारणात या क्षेत्रातील मतदार असलेल्या मोहिते कुटुंबाचा ग्रामीण राजकारणावरील वरचष्मा राहणारच आहे. आराखड्यावर आक्षेप नोंदवण्यासाठी मतदारांना दि. २१ जुलैपर्यंत मुदत आहे. नव्याने होऊ घातलेल्या जिल्हा परिषद गटाचा प्रारूप आराखडा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोम वारी प्रसिद्ध केला आहे. २०११ च्या जनगणनेवर आधारित लोकसंख्या असल्याने माळशिरस बार्शीतील काही भाग नागरी क्षेत्रात गेल् तरी गट व गण संख्येत फरक नाही.

जिल्हा परिषदेचे गट	
करमाळा-गट ६	पांडे, वीट, कोर्टी, चिखलठाण, वांगी, केम.
माढा - गट ७	भोसरे, मानेगाव, उपळाईबु., कुर्डु, टेंभुर्णी, बेंबळे, लऊळ.
बार्शी-गट ६	उपळाई ठोंगे, पांगरी, उपळे दुमाला, पानगाव, मालवंडी, शेळगाव आर.
उत्तर सोलापूर-गट ३	नान्नज, दारफळ बीबी, कोंडी.
मोहोळ - गट ६	आष्टी, नरखेड, कामती बु., पोखरापूर, पेनूर, कुरुल.
पंढरपूर-गट ८	करकंब, भोसे, रोपळे, गोपाळपूर, वाखरी, भाळवणी, टाकळी, कासेगाव.
माळशिरस - गट ९	दहिगाव, मांडवे, फौंडशिरस, संग्रामनगर, माळीनगर, बोरगाव, वेळापूर, निमगाव, पिलीव.
सांगोला - गट ७	महूद, एखतपूर, जवळा, कडलास, चोपडी, कोळा, घेरडी.
मंगळवेढा-गट ४	संत दामाजीनगर, हुलजंती, लक्ष्मीदहिवडी, भोसे.
दक्षिण सोलापूर - गट ६	बोरामणी, कुंभारी, वळसंग, हत्तूर, मंद्रुप, भंडारकवठे.
अक्कलकोट - गट ६	चपळगाव, वागदरी, जेऊर, मंगरुळ, नागणसूर, सलगर.

'दक्षिण'च्या ८३ ग्रामपंचायत सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

दक्षिण सोलापूर तालुक्यातील ८३ ग्रामपंचायतीच्या सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी सरपंच आरक्षण जाहीर करण्यात आले. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४४, इतर मागास प्रवर्गासाठी २२, अनूसूचित जाती प्रवर्गासाठी १३ तर अनूसूचित जमातीसाठी ४ असे आरक्षण जाहीर करण्यात आले.

दक्षिणमधील पंचवार्षिक निवडणूकीच्या ८३ ग्राम पंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी मंगळवारी सोलापूरातील जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहामध्ये उपविभागीय अधिकारी सुमित शिंदे व तहसीलदार किरण जमदाडे यांच्या उपस्थितीत आरक्षण जाहीर करण्यात आले. दोन महिन्यांपूर्वी तालुक्यातील सर्व गावातील सरपंचपदाचे आरक्षण काढण्यात आले होते. मात्र न्यायालयाच्या आदेशानुसार ते आरक्षण रद्द करून पुन्हा एकदा नव्याने आरक्षण काढण्यात आले. हे आरक्षण २०२५ ते २०३० या कालावधीत पार पडणाऱ्या ग्राम पंचायत निवडणुकीसाठी काढण्यात आले. यावेळी निवासी नायब तहसीलदार राजाभाऊ भंडारे, नायब तहसीलदार जितेंद्र मोरे यांच्यासह महसूल अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ८३ ग्राम पंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण याप्रमाणे सर्वसाधारण महिला २२ , सर्वसाधारण २२, इतर मागास प्रवर्ग महिला ११ , सर्वसाधारण ११, अनूसूचित जाती ..,महिला ७, सर्वसाधारण ६, अनूसूचित जमाती महिला ४, सर्वसाधारण २ असे आरक्षण सोडत जाहीर करण्यात आले.

सरपंच आरक्षण : २०२५ ते २०३० या पंचवार्षिक निवडणूकीसाठी दक्षिणमधील ८३ गावांचे सरपंच आरक्षण सोडत काढण्यात आली. न्यायालयाच्या नियमानुसार नव्याने आरक्षण काढण्यात आले असून कोणत्याही प्रकारचे हरकती घेण्यात आले नाहीत. तक्रारदारांना आरक्षण नियमांची माहीती देण्यात आली . त्यामुळे हरकती दाखल नाहीत.
– किरण जमदाडे, तहसीलदार, दक्षिण सोलापूर

माळशिरस तालुक्यात तीन गट अन् सहा गण झाले कमी

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक; आता असणार नऊ गट व १८ गण

वेळापूर, दि.१५ जुलै-

माळशिरस तालुक्यात ११ जिल्हा परिषद व २२ पंचायत समिती गण होते. पण महाळुंग-श्रीपुर, अकलूज, माळशिरस व नातेपुते येथे नगरपंचायत झाल्याने या ठिकाणच्या जागा कमी झाल्या आहेत. आता ९ जिल्हा परिषद गट व १८ पंचायत समिती गण झाले आहेत. येथील निवडणुकीसाठी गावांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दहिगाव गट	**गुरसाळे गण** गुरसाळे, शिंदेवाडी, देशमुखवाडी, डोंबाळवाडी, हनुमानवाडी, तांबेवाडी, कुरबावी, एकशिव, **दहिगाव गण** : दहिगाव, मोरोची, कारुंडे, धर्मपुरी.
मांडवे गट	**मांडवे गण** : मांडवे, लोणंद, लोंढे मोहितेवाडी, फडतरी, पिंपरी, कोथळे. **कण्हेर गण** : कण्हेर, रेडे, भांब, गिरवी, इस्लामपूर, जाधववाडी, जळभावी.
फोंडशिरस गट	**भांबुर्डी गण** : भांबुर्डे, सदाशिवनगर, पुरंदावडे, तामशीद वाडी, मारकडवाडी, येळीव. **फोंडशिरस गण** : फोंडशिरस, पिरळे, बांगर्डे, कळंबोली, पळस मंडळ, कदमवाडी.
संग्रामनगर गट	**मेडद गण** : मेडद, तिरवंडी, उंबरे दहिगाव, कचरेवाडी, प्रताप नगर, कोंडबावी. **संग्रामनगर गण** : संग्राम नगर, आनंद नगर, बागेची वाडी, गिरझणी, विजयवाडी, पाणीव.
माळीनगर गट	**माळीनगर गण** : माळीनगर, सवत गव्हाण, खंडाळी, बिजवडी. **लवंग गण** : लवंग, तांबवे, गणेश गाव, वाघोली, संगम, बाभुळगाव, वाफेगाव.
बोरगाव गट	**बोरगाव गण** : बोरगाव, मिरे, माळखांबी उघडेवाडी बोंडले धानोरे, शेंडीचिंच, माळेवाडी बोरगाव. **जांभूड गण** : जांभूड, उंबरे वेळापूर, कोंढारपट्टा, नेवरे, विठ्ठलवाडी, खळवे, दसूर, तोंडले.
वेळापूर गट	**वेळापूर गण** : वेळापूर, पिसेवाडी. यशवंतनगर गण : यशवंत नगर, चौंडेश्वर वाडी, विझोरी.
निमगाव गट	**निमगाव गण** -: निमगाव, खुडूस, डोंबाळवाडी, झंजेवाडी, कुसमोड. **गोरडवाडी गण** -: गोरडवाडी, मांडकी, मोटेवाडी, तरंगफळ, गारवाड, मगरवाडी, पठाणवस्ती, चांदापुरी, झिंजेवस्ती.
पिलीव गट	**पिलीव गण** : पिलीव, सुळेवाडी, शिंगुर्णी, कोळेगाव. **तांदुळवाडी गण**-: तांदुळवाडी, मळोली, काळमवाडी, फळवणी.

गायकवाडांना काळे फासले प्रकरणी दोघांना पोलिस कोठडी

▸▸पाचजण अद्याप फरार

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि. १५ जुलै-

गैरकायद्याची मंडळी जमवून संभाजी ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष प्रविण गायकवाड व सोलापूर जिल्हा अध्यक्ष संभाजी भोसले यांच्या अंगावर शाई वंगण टाकून श्री. छत्रपती संभाजी महाराज की जय अशा मोठमोठ्याने घोषणा देवून सर्वांना धक्काबुक्की करुन हाताने मारहाण केली. इनोव्हा गाडीच्या समोरच्या काचेवर दगड मारून नुकसान केल्याबाबत अक्कलकोट उत्तर पोलीसात दाखल गुन्हयाबाबत संशयित मुख्य आरोपी दिपक काटे व भवानेश्वर बबन शिरगिरे यांना अक्कलकोट उत्तर पोलीसांनी न्यायालयात हजर केले असता संशयित आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली. इतर पाच संशयित फरार आहेत.

संशयित आरोपी दिपक काटे, किरण साळुंखे (रा. भवानी नगर, इंदापूर), भैय्या ढाणे (रा. भवानी नगर, इंदापुर), कृष्णा क्षिरसागर (रा. कसबा बाराम ती, जि.पुणे), अक्षय चव्हाण, (रा. तांदुळवाडी बाराम ती,जि.पुणे), बाबु बिहारी (रा.तांदुळवाडी बारामती, जि.पुणे), भवानेश्वर बबन शिरगिरे (रा. इंदापुर, जि.पुणे) यांनी प्रदेश अध्यक्ष प्रविण गायकवाड व जिल्हा अध्यक्ष संभाजी भोसले यांच्यावर शाई वंगण फेकले होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष गायकवाड गाडीत बसले असता त्यांना गाडीतुन खेचुन बाहेर आणत त्यांच्यावर शाई वंगण टाकले. त्यांना सोडविण्यासाठी आलेल्या व्यक्तींना व त्यांना धक्काबुक्की, मारहाण करण्यात आल्याचे चित्रण समाज माध्यमावर फिरत आहे. याबद्दल शिवप्रेमीमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. इतर संशयिताना तात्काळ ताब्यात घ्यावे आरोपीवर अंत्यत कडक कारवाई व्हावी अशी भावना नागरिकांतुन व्यक्त होत आहे

सूर्यकांत भूजबळ ग्रामपंचायतचे नवे डेप्युटी सिईओ

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१५ जुलै -

सोलापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांची हिंगोलीचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली झाली आहे. तसेच सोलापूर ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सूर्यकांत भुजबळ यांची नियुक्ती झाली.

ग्रामविकास विभागाने राज्यातील जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी दर्जाच्या साधारण ४५ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या तर २१ अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीपर्यंत १ वर्षाची मुदतवाढ दिली आहे. तर सोलापूर जिल्हा परिषदेला ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सूर्यकांत भुजबळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवाय जिल्हा ग्रामिण विकास प्रकल्प संचालक सुधिर ठोंबरे यांनी बचत गटाच्या माध्यमातून जिल्ह्यात लखपती दीदी व ड्रोन दीदी उपक्रम राबवून महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यांचीही मंगळवारी हिंगोली येथे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली झाली असुन त्यांच्या ठिकाणी नवीन नियुक्ती नसल्याने ती जागा रिक्त राहणार आहे.

फूट मसाजर ठरले वारकऱ्यांच्या समाधानाचे रहस्य : डेप्युटी सीईओ पाटील

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १५ जुलै-

यंदाच्या वारीत फूट मसाजरद्वारे वारकऱ्यांची चरणसेवा हा उपक्रम लक्षवेधी ठरला. ग्रामपंचायत विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम यशस्वी करून वारकऱ्यांची सेवा केल्याचे समाधान लाभल्याची प्रतिक्रिया जिल्हा परिषदेच्या प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा ग्रामपंचायत विभागाच्या प्रभारी स्मिता पाटील यांनी व्यक्त केली.

आषाढीवारी यशस्वी केल्याबद्दल उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांचा जिल्हा परिषद बीट पत्रकार संघातर्फे सन्मान करण्यात आला. आषाढी वारीच्या अनुभवाबाबत बोलताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील म्हणाल्या, यापूर्वी वारकरी दमून थकून विश्रांतीच्या ठिकाणी सुविधांअभावी त्यांना त्रास जाणवत असे. शिवाय चालुन चालुन वारकरी दमलेले असायचे. मात्र यावर्षी फूट मसाजरमुळे वारकरी समाधान व्यक्त करीत आनंदाने परतीच्या प्रवासाला लागले. यापूर्वी माळशिरस बीडिओ म्हणून

पालखी सोहळ्याचे नियोजन केल्याचा अनुभव होता. यावर्षी माऊलीच्या पालखीच्या नियोजनाची जबाबदारी होती. पालखी मार्गावरील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांच्या प्रयत्नातून बांधकाम विभागाने पालखी सोहळ्याच्या मुक्कामाच्या ठिकाणी उभे केलेले जर्मन हँगर लक्षवेधी ठरले. जर्मन हँगरमध्ये निवासासाठी आलेल्या वारकऱ्यांसाठी फूट मसाजर सेवा राबवली. पालखी मार्गावरील ८१ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून ४०० फूट मसाजरद्वारे वारकऱ्यांची सेवा करण्यात आली. वारीत पायी चालून दमलेल्या वारकऱ्यांना या सेवेचा चांगला फायदा झाला.धर्मपुरीपासून वाखरी विसाव्यापर्यंत जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी वारकऱ्यांचे सेवा केली. वारकऱ्यांना दिशादर्शक फलकही मार्ग दाखविणारे ठरले. वारीमध्ये महिला वारकऱ्यांसमोर चालण्याचे भाग्य मि ळाले. महिला वारकऱ्यांसमोर फुगडी खेळताना आपण अधिकारी आहोत, आपल्यावर काहीतरी जबाबदारी आहे , हेही काही क्षण विसरता आले. आपला प्रपंच विसरून पांडुरंगाच्या भेटीच्या ओढीने निघालेल्या महिला वारकऱ्यांची संवाद साधल्यानंतर मला स्वतःला नवीन ऊर्जा मिळाली. एक चांगले टीमवर्क झाले. वारकऱ्यांची स्वयंशिस्त पाहण्यासारखी होती. वारकऱ्यांच्या व्यवस्थेत महिनाभर व्यस्त असलेल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनाही कर्तव्याबरोबर सेवेचे पुण्य मिळाले, असेही पाटील म्हणाले .यंदा वारीला मोठी गर्दी होती.

यापूर्वीही आषाढी वारीची सेवा करण्याचे भाग्य मिळाले. पण यंदा ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांनी फूट मसाजरद्वारे वारकऱ्यांची केलेली चरण सेवा लक्षवेधी ठरली, अशी प्रतिक्रिया प्रशासन विभागाचे कक्ष अधिकारी अविनाश गोडसे यांनी दिली. विठू माऊलीच्या आवडीने पंढरीकडे निघालेल्या वारकऱ्यांचे पाय थकले होते. त्यांना आराम देण्याचे भाग्य आम्हाला लाभले. ग्रामपंचायत विभागाचे प्रशासन अधिकारी जहीर शेख यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले हे येथे उल्लेखनीय. वारकऱ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात म्हणून सेवेत कार्यरत असलेले अधिकारीही काही क्षण वारकऱ्यांबरोबर विठ्ठल नामात दंग झाले. झेडपीचे टीमवर्क राज्यात लक्षवेधी ठरले.